स्त्री मनाशी संवाद साधणारी...

# सखी संवादिका



## दिवाळी विशेषांक २०१५

-: संपादक :-

## विशाखा पवार

प्रकाशन : ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com

# अंतरंग


**★ कथा**

१. भरजरी उखाणे - तसेही अन् असेही - संगीता गुळवणी --- ५
२. कर्तृत्ववान -राजश्री रामचंद्र खरे --- ११
३. रॉयल -संगीता गुळवणी --- १७
४. रोपटं कुणाचं ? - वैदेही केवटे --- २५
५. आधार तूच एकला -प्रेरणा प्रदीप उपाध्ये --- २९
६. ती आली तिने जिंकले -कल्पना सुळे --- ३७
७. बडबड - नि. श. गुळवणी --- ४३

**★ लेख**

१. स्त्री मुक्ती -लता लिलाधर बोरोले --- ४९
२. अबला नव्हे सबला - चारुलता कुळकर्णी --- ५३
३. याला जीवन ऐसे नाव -पुष्पा लंकेश्वर --- ५६
४. एका बुफेची गोष्ट - मृदुला मराठे --- ५९
५. पारख -निता कोयंडे --- ६१
६. पर्स - अश्विनी चव्हाण --- ६७
७ . स्त्री शक्ती - अनघा मनमोहन रोगे --- ६९
८. अन्नपूर्णा - जोत्स्ना सोनाळकर --- ७५
९. चिंता -आशा खिल्लारे --- ७८
१०. बहुगुणी मीठ -साक्षी पाटील --- ८१
११. मॅच -शुभांगी निमकर --- ८४
१२. फॅशन काळाची गरज -ओमनी फीचर्स --- ८६
१३. सौंदर्याला आधुनिकतेची जोड - कीर्ती वैती --- ९२
१४. शेवगा - मंजिरी दिलीप सरवटे --- ९५
१५. मोलकरीण - विजया गोरे --- ९८

**★ काव्यविश्व** --- ९६

**★ पाककृती** --- १०२

# संपादकीय !

## आरोग्यदायी होऊन,
## आनंदमार्गी होऊ या!

'आरोग्य धनसंपदा 'या उक्तीप्रमाणे वागण्याचा प्रयत्न आपण सर्व महिलांनी सोडून दिलेला आहे का? असा प्रश्न सध्यातरी निर्माण झालेला आहे. महिलांमध्ये वाढणारे आजाराचे प्रमाण आणि स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाण वाढलेले आहे.

कुटूंब व्यवस्था ही वेळोवेळी स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून ठरलेली आहे मग ती स्त्री कमावित असो नाहितर गृहकृत्यदक्ष असो सगळीकडे तिचे अस्तित्व हे आघाडीवरच असते. आपल्या घरातल्या सगळ्यांच्या आरोग्याची औषधपाण्याची व्यवस्था ती करते परंतू आपण आघाडीवर आहोत आपल्याला तंदूरुस्त रहायला हवे याचा विसर तिला वारंवार पडताना दिसतो. आराम करणे म्हणजे आरोग्य राखणे असा काहीसा सुटसुटीत अर्थ आपल्या सख्यांनी घेतलेला दिसतो. दिवसभर सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या नाहीतर नोकरी करणारी सखी आपली नोकरी, आपला व्यवसाय करणारी सखी या सर्वांना पेलून संध्याकाळी विरंगुळा,करमणूक या नावाखाली टि.व्ही मालिका बघणार. यात गैर काही नाही मनोरंजन कोणी आणि कसं करावं हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो परंतू आपल्या आरोग्यासाठी आपण किती वेळ द्यायला पाहिजे याचे भान आपल्याला राहिलेले नाही किंबहुना आपल्याला याचा विसर पडलेला दिसतो. आरोग्याकडे लक्ष न देण्याचा विसर अनेक समस्यांना निमार्ण करतो. सातत्याने काम करणारे मानवनिर्मित यंत्रसुध्दा कुरबुर करते तर अनेक समस्या, विचार इ. गोष्टी बरोबर घेऊन काम करणारं आपल शरीर तंदुरुस्तीची मागणी करणारच.

अनेक प्रकारची मानसिक आंदोलन मन ती कुटूंबाच्या संबधित असतात किंवा व्यवसाय, नोकरी आणि करियर यांच्याशी सबंधित असतात तर कधी अन्य काही गोष्टींशी जोडलेली असतात. या सर्वांमुळे मनाला भक्कमपणे आधार पुरविण्याचे मानसिक आरोग्याचे पाठबळ मिळावे यासाठी जे काही करायला आवश्यक आहे मग त्यासाठी योगशास्त्राचा आधार असो किंवा अन्य कोणतीही थेरपी असो ती आचरणात आणायला हवी. आवडणाऱ्या गोष्टी ज्यामध्ये सार्वमत असेल , कौटूंबीक सौख्य असेल ,मानसिक आनंद असेल त्या त्या गोष्टी आर्वजून करायला हव्यात.

सख्यांनो एकमेकांना साथ घालून आनंदाची देवाण-घेवाण खरं तर आरोग्यदायी ठरेलच परंतू जगण्यासाठी आवश्यक असलेले सामुहिक बळ निर्माण करणारे ठरेल.त्यामुळे 'आरोग्य हिच धनसंपदा', मानून 'एकमेंका सहाय्य करू अवघे धरू आनंद पंथ' असे ठरवून सर्वांनी मिळून आनंद यात्री होण्याचा या दिवाळी सणाला संकल्प करू या ...

**दिवाळीच्या खूप खुप शुभेच्छा !**

With best compliments from



# Sidhivinayak Transport

*Shubh Deepawali*

# भरजरी उखाणे - तसेही अन् असेही!

**- संगीता गुळवणी**

उखाणे हे सुंदर अलंकारासम असतात. सुंदर, देखणे, मनमोहक, सौंदर्य खुलवणाऱ्या दागिन्याप्रमाणेच सुंदर, काव्यमय उखाणेही नववधूचं सौंदर्य खुलवतात असं मानायला मुळीच हरकत नसावी. खरंतर उखाण्यांशिवाय लग्न म्हणजे मिठाशिवाय आमटी. सपक! मुंबईच्या ऐश्वर्यसंप्पन लग्नात चायनीजपासून ते वेगवेगळ्या देशी-विदेशी पदार्थांची रेलचेल अवश्य असते परंतु त्यात कुठंतरी सुंदर, सलज्ज उखाण्यांची फोडणी नसते. उखाण्यांशिवाय ते लज्जतदार भोजन लग्नातील आमंत्रितांकरिता न वाटता हॉटेलातील केवळ एक मेजवानीच काय ती वाटावी. मी एका मुंबईकर विवाहीतेला उखाणा घेण्याचा आग्रह केला. ती हसली आणि म्हणाली "पुन्हा केव्हातरी", अगंबाई पुन्हा केव्हातरी म्हणजे काय पहिल्या बाळंतपणाच्या वेळी घेणार आहेस का? अगं आत्ता संसाराची झुंजुमुंजु झालीय. ह्या रम्य वेळी उखाणा न घेणारी, महागड्या कपड्यात स्वतःला गुंडाळून घेतलेली अरसिक तरुणी तू संसारसूर्य कासराभर वर आल्यावर त्याच्या धगीनं घामाघूम झाल्यानंतर थोडीच उखाणा घेणार आहेस? खरंतर हे भरजरी उखाणे हे मराठी भाषेचं एक आगळंवेगळं दालनच म्हणावं लागेल परंतु ह्या साऱ्या अर्ध्या हळकुंडानं पिवळ्या झाल्यासारख्या ह्या आजकालच्या अर्ध्या इंग्रजी पोरींकडून उखाण्यांची अपेक्षा करणं म्हणजे फॅशन शोमध्ये मदमस्तपणे वॉकिंग करणाऱ्या सुंदरीकडून हनुमान स्तोत्र म्हणण्याची अपेक्षा करण्यासारखंच वाटावं. ह्या परदेशी जोडप्यांनी उखाण्यांमधल सौंदर्य हेरून त्यांनी त्यांच्या विवाहात अंतर्भूत केलं तर मात्र त्यांचं अनुकरण करताना आपल्या स्वतःला उच्चभ्रू मानणाऱ्या तरुणी बॉयफ्रेन्डस्ना चापट्या मारताना 'ए किसन माय उखाणा' म्हणताना अधीमधी एखादा अँग्लोइंडियन उखाणा तोंडावर फेकत राहतील. अर्थात उखाण्यातील लज्जत ललनेच्या लज्जेतून खरी खुलते. इथं ह्या नवतरुणींनी लज्जाच खुंटीला टांगली असेल तर मात्र त्यांचे ते अँग्लो-इंडियन उखाणे शोभेकरिता मांडून ठेवलेल्या चवहीन लाकडी फळांसारखेच काय ते वाटावेत. परंतु चांगल्या गोष्टी इतक्या सहजासहजी लुप्त होत नाहीत हे खरं. अजूनही कैक मराठमोळ्या लग्नात जागोजागी उखाण्यांच्या फुलझड्या उडताना दिसतात.

**"पहिला उखाणा कधी घेतला असेल हे पहिली ललना कधी लाजली असेल हे शोधण्याइतकंच कठीण ठरावं. त्या साऱ्या फंदात न पडता निदानपक्षी महाभारत काळापासून उखाण्याला सुरुवात झाली"**

पहिला उखाणा कधी घेतला असेल हे पहिली ललना कधी लाजली असेल हे शोधण्याइतकंच कठीण ठरावं. त्या साऱ्या फंदात न पडता निदानपक्षी महाभारत काळापासून उखाण्याला सुरुवात झाली असली पाहिजे असं मानायला मुळीच हरकत नसावी. महाभारत काळात मुलांना टोपलीतून नदीत सोडण्यापासून ते थेट राजसभेत राजस्त्रीचेच वस्त्र खेचण्यापर्यंतच्या अनेक परंपरांची सुरुवात झाली असल्याने ह्या 'ॲक्शनपॅक्ड' काळात उखाण्यांची सुरुवात होणं सहजगत्या शक्य वाटतं. शिवाय पाच

पतींच्या गराड्यात उभ्या सैरंध्रीचा जगावेगळा विवाह ह्याच काळात संपन्न झाला असल्याने त्या पाच शूरवीरांच्या पत्नीच्या मुखातून सहजगत्या पहिला उखाणा अनाहूतपणे म्हणावा उत्स्फूर्तपणे उमटला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. खचितच सलज्ज सैरंध्रीला कृष्णाने आग्रह केला असेल आणि ती पायाच्या बोटाने भूमीवर नक्षीकाम करताना म्हणाली असेल...

"भूमीकन्या मी, कृष्ण माझा सखा; पाच वीरांची मी पत्नी, संसार माझा खरंतर अनोखा महाभारत जगावेगळ्या घटनांचा एक रांजणच म्हणता येईल" आणि अशीच एक घटना म्हणजे अंध पतीकरिता डोळ्यांवर कायमची पट्टी बांधणारी गांधारीदेवी. अशी पतिव्रता झाली नाहीना होणे नाही. अशा तेजस्वी क्षत्रिणीनो हस्तिनापूरकांच्या आग्रहास्तव असा उखाणा घेतला असेल

नक्षीदार कलाकुसर सजली पितामहांच्या रथावर;

पतीदेवांकरिता जन्मभर, बांधते मी पट्टी नयनांवर.

महाभार राक्षसकन्याही बळ अंगी असलेल्या भीमावर फिदा होणं साहजिकच म्हणता येईल. राक्षसविवाहानंतर कुंतीमातेच्या आग्रहास्तव या राक्षसकन्येने ठसक्यात उखाणा घेतलाच

'मुंडकी छाटली म्या शंभर आमच्या भीमरावांची कणगीएवढी कंबर'. महाभारतकालीन उखाण्यांतून जाऊया आता शिवकालीन उखाण्यांत. मला खरं सांगू हे दोन काळ - आणि दुसरे महायुध्द, मनाला सर्वाधिक चटका लावून जातात. जयद्रथ वध हा मला सर्वांत रोमांचकारी क्षण वाटतो तर अफजलखानाचा साऱ्या सैन्यानिशी खातमा ही युध्द इतिहासातील मोठी घटना म्हणावी लागेल. सर्वोत्तम लांबलचक काळाच्या पट्टीला कात्री लावताना आपण थेट शिवकालीन उखाण्यांत पोहोचलो आहोत.



वीरश्रीने भरलेला तो काळ! झुंजार मावळ्यांच्या त्या हिरकणी बुरूज चढणाऱ्या वाघिणीसारख्या धर्मपत्नी! शिवबा त्यांचा देव! आऊसाहेब त्यांचा आदर्श! अशा साऱ्या वीरपत्नींच्या मुखांतून तसेच तेजस्वी, वीरश्रीने ओतप्रोत भरलेले उखाणे बाहेर पडले असतील.

आऊसाहेब म्हणजे साक्षात राक्षसांचा संहार कारणाऱ्या दुर्गामातेचाच अवतार. त्यांनी पतीप्रेमाचा आदर्श मावळात घालून दिला. अशा एका रणरागिणीच्या मुखातून उखाण्याच्या रूपात स्वराज्याचेच रूप शब्दांच्या तप्त अंगाररूपात बरसले असणार

'धर्मभ्रष्ट म्लेच्छांवर करू पलटवार, पतीदेवांबरोबर हाती धरीन मी तलवार.'

खरंच अशी माता होणे नाही, असा पुत्र होणे नाही! शिवबांच्या मनात सदैव आऊसाहेबांच्या धगधगत्या विचारांचा घंटानाद होत राही आणि सोबतच सईच्या अमृतासम मधुर प्रीतीचा शिडकावाही!

शिवबाच्या ह्रदयाची तार सईनं झंकारली होती. तेच त्याचं खरं प्रेम होतं. कसं व्यक्त केलं असेल ते गंगोत्रीच्या निर्मळ, शुध्द जलासारखं प्रेम सईनं त्यांच्या उखाण्यातून ? शिवाय ते प्रेम व्यक्त करताना आपलं रयतेप्रतीचं कर्तव्य ती बाणेदार स्त्री विसरली नसेल. पतीचं रयत प्रेम पतिव्रता सईच्या उखाण्यातून झळकलं नसतं तरच ते नवल ठरलं असतं

'आऊसाहेबांची छत्रछाया, क्षण मोठा भाग्याचा ;
पती माझा आधी, राजा असे रयतेचा'.

अशा ह्या राज्याच्या झुंजार मावळ्यांच्या वाघिणीसम नीडर मावळिणी त्यांच्या उखाण्यातून पतीची शौर्यगाथा मांडणारच की !

'धडामधूम वाजली तोफ,
अन् शिवाजीराजांनी दिला मुघलांना चोप'.

आणि घरी शिवबाराजं येऊन गेल्याचा काय तो आनंद बायजाबाईला झालाय. उखाण्यातून तिचा तो आनंद व्यक्त करताना ही मुरळी म्हणते


'आधी लग्न कोंडाण्याचं मग माझ्या रायबाचं,
धनी झालं धन्य, घरी पाय लागलं शिवबाचं.'

अशा साऱ्या वीरपत्नी आणि मातांचे संस्कार घेऊन आलेल्या आपल्या मराठमोळ्या माता-भगिनी वर्षानुवर्षे, पिढ्या दर पिढ्या त्यांच्या राहिल्या. 'दिवा जळू दे सारी रात, पतीदेवांची लाभो जन्मोजन्मी साथ', अशी त्या पतिप्रेमावरील निष्ठा वेळोवेळी व्यक्त करीत राहिल्या 'संधीकाळी ह्या अशा, धुंदल्या दिशा-दिशा; पतिदेवांच्या प्रीतीने उजळल्या दाही दिशा' असे त्यांचे उखाणे पतिप्रेमाचा मनमोहक रंगात न्हाऊन निघत पुढाकर घेऊ लागले. एक फिलॉसॉफर पती म्हणतो : 'अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे, पत्नीप्रेम बहरले, दृष्ट नको लावू रे.'

उखाण्यांची ही परंपरा अखंड दिव्य स्वातंत्र्यानंतरही चालू राहिली. पती-पत्नी उखाण्यांच्या काव्यभरल्या, रसभरीत नवनव्या अलंकारांनी जोडीदाराला सजवत राहिले. परंतु पुढे कालानुरूप वेगाने स्थित्यंतरे होऊ लागली आणि मग झटपट बदलणाऱ्या ह्या साऱ्या आर्थिक समीकरणांनी आधुनिक काळात विवाह, पती-पत्नी संबंध, नाती-गोती, प्रेमाची नाळ, निष्ठा, विश्वास ह्या साऱ्या मूलभूत स्तंभावरच हातोडा उगारल्याने त्यातून काही वेगळ्याच धाटणीच्या उखाण्यांचा जन्म व्हायला सुरुवात केली. आता घटस्फोटित पती जागोजागी दिसू लागले आणि त्यांच्यापैकी एकाने जुन्याशी नव्याशी तुलना करताना म्हटलं

'सरीवर कोसळल्या सरी, दुसरी पेक्षा पहिलीच बरी.'

बरं पूर्वी पतीचं मुखदर्शन पत्नींना अंतरपाट दूर होऊन वाजवा रे वाजवा झाल्यानंतर काय ते व्हायचं आणि पदरी पडलेलं ते ध्यान त्या प्रमाणिकपणे आयुष्यभर सांभाळायच्या परंतु हल्ली अंतरपाटामधलं अंतर लग्न ठरलेल्या दिवसापासूनच दोघांनी हातात हात घालून मनसोक्त फिरताना मिरवलेलं असल्याने अंतरपाट उभा राहीपर्यंत विवाहानंतरची उत्सुकता काही वेगळ्याच रूपात प्रकट होते. अशी एक लग्नाआधीच कातावलेली तरुणी होणाऱ्या नवऱ्याला खाजगीत उखाण्यातून तंबी देताना म्हणते



'रुबाबदार मनगट त्याच्यात सोन्याचं कडं;
एवढं माप ओलांडू दे, मग बघते



तुझ्याकडं.'

आता ही बुध्दिबळ चँपियन वधूही काही कमीची नाही. ती आपल्या भावी पतीला म्हणते

'नवऱ्यामागून ह्या घडीला घेते मी सप्तपदी,
मग जीवनभर मी वजीर अन् हा माझ्यापुढील प्यादी.'

आता ह्या प्याद्याला आयुष्यभर त्याच्या वजिराची मर्जी सांभाळावी लागणार हेच खरं.

स्वातंत्र्यानंतर झालेल्या ठळक बदलांचा आढावा घेतल्यास सर्वप्रथम शिकणाऱ्या पोरींना प्राधान्य द्यावं लागेल. पोरी शिकल्या अन् पोरांबरोबर नोकऱ्या, व्यवसाय करताना बेधडक घराबाहेर पडू लागल्या. साहजिकच अशा कमावत्या पोरींच्या मनात समानतेचे वारे घोंघावू लागले. नाहीतरी पती-पत्नी संसाररथाची दोन चाकं आहेत असं विद्वान सांगून गेलेत. मग एकाच चक्रानं का सारा भार सोसायचा? दुसरं चाक आरामखुर्चीत पेपर वाचत बसत मजा मारणार काय? ह्या वधूला ते अमान्य आहे. ती तिच्या उखाण्यातून समानता मांडताना म्हणते

'सुबक बंदरावर, नक्षीदार दांडी;
मी करीन स्वैपाक, पण हा धुवील भांडी.'

अशी ही आजची समानता आणि ती आणली मंत्र्यांनी. मंत्री आजचे राजे. त्यांची जनतेवर सत्ता पण त्यांच्यावर सत्ता कोणाची? एका मंत्रिपत्नीने जनतेविषयीचं नवऱ्याचं भाषण मध्येच रोखताना तिच्या माहेरच्या नातेवाईकांना उखाण्यातून सांगितलं

'जनता गेली तेल लावत, मी इशारा करताच मंत्री येतात धावत.'

आता त्या मंत्र्याचे नातेवाईक परदेशात. मुलगा अमेरिकेत तर मुलगी ऑस्ट्रेलियात. त्यांनी इंटरनेटवर विवाहबध्द व्हायचं ठरविलं. कामाच्या व्यापामुळे त्यांना विवाहाकरिता भेटणं परवडणार नव्हतं. बरं आपली संस्कृती ही जपलीच पाहिजे हा मंत्र्यांचा आग्रह. त्यामुळे भारतीय पध्दतीने इंटरनेट विवाह रचून त्या जोडप्याला शुचिर्भूत करून घेण्याची जबाबदारी कोल्हापुरातील वांगी बोळातील जोशी भटावर येऊन पडली आणि बदल्यात त्यानं काही डॉलर धोतराला खोचले. विवाहोत्तर बंडू जोश्यानं उखाणा घेण्यास सांगितले तेव्हा ती न लाजता म्हणाली

'फेसबुकवर आमचं जमलं, ट्विटरवर पक्कं झालं;
पहिल्या भेटीनंतर ठरवू, एकत्र किती राहायचं.'

विटेहूनही मऊ, असा एक वारकरी अखंड विठ्ठलभक्तीत हरविलेला. परंतु पत्नीला त्यांचे ते विठ्ठलप्रेम पसंत नाही. ती नेहमी त्यांना घालून-पाडून बोलते. भक्तगणानं उखाण्याचा आग्रह केला अन् वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात म्हणाले 'जय-जय रामकृष्ण हरी, मला पाजते पाणी आसावरी.'

अन् आमचा दाढी वाढविलेला शेतकरीदादा चक्क आपल्या लाडक्या बैलजोडीला उखाणा ऐकवताना म्हणाला

'ढवळ्या-पवळ्याची ही रं जोडी,
अन् बायजा म्हणते काय हे ध्यान करा दाढी.'

एक क्रिकेटवेड्या तरुणीने क्रिकेटियरशी लग्न केले, साहजिकच तिच्या उखाण्यातून तिचे क्रिकेटप्रेम डोकावते

'लारा-पाँटिंगपेक्षा सचिन आहे सरस,

बबनरावांना खेळापेक्षा मॅचफिक्सिंगमध्ये रस.'

श्मगलर गुंडाच्या बायकोला घरातल्या लांब पल्ल्याच्या गन भावल्या आणि तिनं तिचं ते प्रेम उखाण्यातून व्यक्त केलं

'बंगल्यावर आमच्या चार लांबपल्ली गन,

अन्, पोलिसांना गंडविण्यात माझा गुंडा नंबर वन.'

स्मगलरची झाली तरी तीही एक बायकोच ना? पण काही पोरी आणखी चार पावलं पुढं चालून जाताना मुळी पती-पत्नी हे नातंच मानायला तयार नाहीत. ह्या साऱ्या मुक्त पऱ्यांना बॉयफ्रेन्डस् हे एकच नातं कळतं. उगाच एका दावणीला बांधून घेत सारं आयुष्य रडत-कढत काढण्याला त्यांचा विरोध आहे. विचार नाही जमले तर जोडीदार बदलायलाही ह्या नवतरुणी एका पायावर तयार आहेत. उखाण्यात आपल्या किर्ती नावाच्या बॉयफेन्डबद्दल ही नवविचारवादी तरूणी म्हणते

'बंधन झुगारलं आम्ही, आम्ही मुक्त पऱ्या;

कीर्ती नखरे करेल तर तयार आहे शऱ्या.'

कीर्ती नंतर शदरनं नंबर लावलाय हे किती प्रांजळपणे ही नवतरुणी कबूल करते आणि हे तिला, कीर्तीला आणि शरदला कोणालाही मुळीच बोचत नाही. ते सारेच खेळीमेळीनं घेतात.

पण मग हे उखाणे नव्हते. ते सारं दुसरं काहीतरी ठरेल. उखाणे म्हणजे पती-पत्नींना अतूट प्रेमानं बांधणारा एक धागा. तो विस्कळीत बॉयफ्रेन्ड संस्कृतीचा धागा होऊ शकत नाही फारतर चाटमधून जन्माला आला म्हणून त्याला 'चखाणा' म्हणता येईल. उखाण्याची एक वेगळी परंपरा आहे,संस्कृती आहे. झाशीच्या राणीसारख्या करारी स्त्रीने पतीप्रेमाचं दर्शन त्यांच्या उखाण्यातून घडविलेल्या अशा साऱ्या उखाण्यांची ही उच्च परंपरा आहे. जोडीदारावरील अतूट प्रेम हा तर खरा ह्या उखाण्यांचा आत्मा आहे. तो आत्मा, तो प्राण जेव्हा हे भरजरी उखाणे गमावतील तेव्हा पती-पत्नी ही अतूट मानलेली नातीच नष्ट होतील.



# ओम पब्लिकेशन

- **इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)**
  **संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार**
- **जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे, जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)**
  **लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार**
- **कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक**
- **सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक**
- **सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक**
  **संपादक - विशाखा पवार**
- **श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह**
  **संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार**
- **श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह**

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

संपर्क :
- एम-3, पॅराडाईस टॉवर्स, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प)- **400 602**

दरध्वनी : **022-2536 4141**

**E-mail : vilaspawar@ompublication.com**

# कर्तृत्ववान

- राजश्री रामचंद्र खरे

सरिता सुन्न होऊन बसली होती. गेली ४०/४५ वर्षे सांभाळलेले घर उद्यापासून दुसऱ्याचे होणार. एवढ्या वर्षात आलेल्या संकटांचे, सुखदु:खाच्या क्षणांचे हे घर साक्षीदार होते. सरिताचे आता वय झाले होते... मुले संसारी होऊन वेगवेगळ्या गावी होती.आता मुलांकडे राहिली तरी घर सांभाळण्यासाठी खेपा घालणे तिच्याने होत नव्हते. मुलेही मागे लागली होती. आई, एवढे दिवस कष्ट केलेस आता जरा आराम कर. घर विकून टाक, वाटले तर तुझ्यासाठी येथे वेगळे घर घेऊ. तू एकटीने प्रवास केलास तरी आम्हांला काळजी वाटे. सरिताला हे पटत होते. या घरात सून म्हणून आल्यापासून साऱ्या आठवणी एखाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यांपुढून सरकत होत्या. पण आता घर विकण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. दिवसेंदिवस घर सांभाळणे अशक्य होते.

**“घरातल्यांची रोजची कामे चालू होती पण साऱ्यांचे डोळे आणि कान दरवाजाकडे लागले होते. लग्नानंतर पहिल्यांदाच सरिताची भेट होणार होती. कधी एकदा डोळे भरून लेकीला पाहते असे आईला झाले होते. एवढ्यात आईऽऽ बाबाऽऽ असा दारातून आवाज आला.”**

एका भिक्षुकाच्या सुसंस्कृत घरात सरिताचा जन्म झाला. तीन भावांच्या पाठीवरची एकुलती एक मुलगी. सर्वांची लाडकी, हुशार, धडाडीची पण रूप देण्याच्या बाबतीत मात्र देवाने हात आखडता घेतला. धडाडीने काम करण्याच्या बाबतीत मात्र भावांच्या एक पाऊल पुढेच. वागणं बोलणं सारं रूपासारखचं रांगड पण ह्या रांगड्या रूपातच दडलेले होते एक प्रेमळ मन. सर्वांशी प्रेमाने वागणारं, सर्वांची मने सांभाळणार. अमुक एखादं काम येत नाही असं सरिताच्या बाबतीत कधी घडलंच नाही. म्हणूनच साऱ्यांची लाडकी होती. स्पष्टवक्ती असल्यामुळे कोणी सहसा तिच्या वाटेला जात नसे.

भावंडांबरोबर मस्ती करत, दांडगाई करत सरिता हळूहळू मोठी होत होती. वयाप्रमाणे तिचा रांगडेपणाही वाढत होता. दिसण्यात, वागण्यात, बोलण्यात कोठेही स्त्रीसुलभ हळुवारपणा दिसत नसे. भावांच्या मित्रांबरोबर तिचे मोकळेपणाने वागणे कधी कधी भावांना आवडत नव्हते. आईलाही काळजी वाटायची कसे होणार या पोरीचे? असे वागणे सरिता चालेल का? आई समजावयाचा खूप प्रयत्न करायची पण मी काय चुकीचे करतेय? या तिच्या प्रश्नाला कोणी उत्तर देऊ शकत नसे. म्हणता म्हणता सरिता ग्रॅज्युएट झाली. घरात लग्नाची बोलणी सुरू झाली. मुलीने आपल्या आवडीचा जोडीदार शोधायची पध्दत त्याकाळी नव्हती. शिवाय सरिताचे घराणे भिक्षुकाचे त्यामुळे आईवडिलांनी शोधलेल्या जोडीदाराबरोबरच आयुष्य घालवायचे शिवाय हळूहळू वडील भावंडाचेही लग्नाचे वय झालेच होते. अगोदर मुलीला सासरी पाठवून मगच दुसरी मुलगी घरात आणायची न जाणो तिचा स्वभाव कसा असेल. नणंदा, भावजयीचे नाही जमले तर? असाही एक विचार असायचा. वरसंशोधन काम युध्दपातळीवर चालू होते. वरसंशोधन करताना एक गोष्ट साऱ्यांच्याच लक्षात येऊ लागली येथे गुणांना

किंमत नाही पैसा आणि रूप म्हणजे लग्न जमण्यातला मोठाच अडसर आहे हे सारे लक्षात येऊ लागले. भिक्षुकाची कमाई ती किती असणार ? चौघांची शिक्षणे करताना आधीच वडिलांचा जीव मेटाकुटीला आला होता. कोणी जास्त हुंडा मागितला तर कोठून देणार ? देवा माझी मुलगी गुणाची आहे, तिला चांगले स्थळ मिळू दे. आईवडील रोज देवाची प्रार्थना करीत.

दिवस जात होते. एक दिवस एक लांबचे बिलासपूरचे स्थळ कळले. मुलीला दाखवायला नेले. मुलगा मोठ्या कुटुंबातील होता. सरकारी नोकरी होती. वडिलोपार्जित घर होते. बहिणी सासरी सुखात नांदत होत्या. मुलाचे वडील चांगल्या हुद्यावर असल्यामुळे आर्थिक स्थिती चांगलीच होती. घरात आई आणि मुलगा दोघेच होते. दोन-तीन वर्षांपूर्वीच वडिलांचे निधन झाले होते. सर्व दृष्टीनी स्थळ चांगले होते. सरितालाही सरकारी नोकरी होती. त्यामुळे तिची बदली होऊ शकत होती. दोन्हीकडील पसंती झाली आणि लग्नाचे सूप वाजले. आईवडिलांची चिंता मिटली.

मुलगी सासरी गेली आणि माहेरचे घर सुनेसुने झाले.भावांना चिडवायला, हट्टाने कामे सांगायला कोणी उरले नाही. आईचा मदतीचा हात गेला. एकीकडे बडबड करत कामे उरकली जायची, ते स्वयंपाकघरही सुनेसुने झाले. एकीकडे जबाबदारीतून मोकळे झाले म्हणून आईवडील आनंदात तर दुसरीकडे लेक सुखात असेल ना ? या विचाराने काळजीत .

बघता बघता श्रावण आला. रितीप्रमाणे मंगळागौर करायची. भाऊ बहिणीला आणायला गेला. आज लेक माहेरी येणार. घरातल्यांची रोजची कामे चालू होती पण सार्‍यांचे डोळे आणि कान दरवाजाकडे लागले होते. लग्नानंतर पहिल्यांदाच सरिताची भेट होणार होती. कधी एकदा डोळे भरून लेकीला पाहते



असे आईला झाले होते. एवढ्यात आईऽऽ बाबाऽऽ असा दारातून आवाज आला. आले वाटतं लेक आणि जावई म्हणून सारे दाराकडे धावले पण लेक एकटीच आली होती. सरिताने दारातून प्रवेश केला आणि आईला घट्ट मिठी मारली आणि हुंदके देऊन रडू लागली. अगं काय झालं ? जावईबापू का नाही आले ? सारे ठीक आहे ना ? एकीकडे प्रश्नांची सरबत्ती चालू तर दुसरीकडे खूप दिवसांनी भेटलेल्या मुलीच्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरत होता. आईच्या प्रेमभरल्या आश्वासक हातांनी भावना अधिकच दाटून आल्या. हळूहळू मन शांत झाले आणि हुंदके देत तोंडातून शब्द बाहेर पडले. आई आपण फसवले गेलो ग. त्यांना फिट येतात फिट येऊन ते कोठेही पडतात. काय ? ऐकून सारेच स्तब्ध झाले. अग, मी तुला न्यायला आलो तेव्हाच का नाही सांगितलेस ? चांगले खडसून विचारले असते ना ? पोलीस कंप्लेटही केली असती. दादा, काय उपयोग त्याचा मला! तेथे राहण्याशिवाय पर्याय आहे का ? माझे नशीाब म्हणायचे झाले.

तरीही मंगळागौर झाल्यावर भाऊ तिच्याबरोबर गेला. फसविल्याबद्दल मुलाच्या आईला चांगला खडसावून जाब विचारला. पोलिसात तक्रार

करतो सांगितले. म्हातारी आई गयावया करू लागली. तुम्हांला फसवायचा आमचा हेतू नव्हता. त्याला लहानपणी फिट येत होत्या पण आता पूर्ण बंद झाल्या होत्या. आता लग्नानंतर का येऊ लागल्या खरंच कळत नाही पण तुम्ही काळजी करू नका. तुमच्या मुलीला येथे काही त्रास होणार नाही. आमच्यावर विश्वास ठेवा. तिला परत नेऊ नका. आमच्यावर कृपा करा. काय करावे भावालाच प्रश्न पडला. शेवटी सरिताच म्हणाली जाऊ दे दादा माझ्या नशिबात होते ते मला मिळाले. तू नको काळजी करूस. आई बाबांनाही सांग माझी काळजी करू नका. मी सगळं सांभाळून घेईन. भावाचा नाइलाज झाला. बहिणीला सोडून तो घरी आला. पण त्याच्या जिवाला काळजी लागली. स्थळ त्याने बघितले होते. मीच नीट चौकशी केली नाही. माझ्यामुळे माझ्या बहिणीचे असे झाले, ही टोचणी मनाला कायम लागली.



बघता बघता वर्ष सरलं. अजितरावांची फिट सोडली तर सरिताला खरोखरच काही त्रास नव्हता. सरितानेही सरकारी नोकरी असल्यामुळे बिलासपूरला बदली करून घेतली. हळूहळू घरच्या गोष्टी तिच्या लक्षात येत होत्या. अजितरावांचा स्वभाव चांगला असला तरी खूप आळशी होते. सवयी श्रीमंतीच्या होत्या. आमदनी अठ्ठनी खर्चा रुपय्या अशी वागण्याची तऱ्हा होती. सरिता पदर बांधून कामाला लागली. सारे व्यवहार हळूहळू हातात घेतले. अजितरावांना शिस्त लावली, तसे हळूहळू घरातले व्यवहार सुधारले. अतिरिक्त खर्चावर नियंत्रण ठेवले.

दिवस जात होते. परिस्थितीशी सरिताने चांगलेच जुळवून घेतले. खंबीरपणे परिस्थितीला तोंड दिले. एक वर्षाच्या अंतराने तिने दोन मुलांना जन्म दिला. तिला आता वेळ पुरत नव्हता. पाठोपाठच्या दोन मुलांचे करताना जीव मेटाकुटीला येत होता. मुले, घर, नोकरी सारे सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत होती. पण जिद्दीने सारे करत होती.

त्या दिवशी सासूबाई रोजच्यासारख्या घरात आल्या नाहीत म्हणून सरिता बघायला गेली तर सासूबाई तापाने फणफणल्या होत्या. बहुधाा अंग दुखत असेल त्यामुळे खूप कण्हत होत्या. सरिता धावली. आई, असे काय झाले ? मला हाक का नाही मारली ? सरिता अगं डोकं खूप दुखतयं गं. सहन होत नाहीये. मी चेपून देते हं असे म्हणून हलक्या हाताने डोके चेपून दिले. त्यांना चहा करून दिला. अंगात तापही खूपच होता म्हणून डॉक्टरांना फोन केला आणि यजमानांना सांगायला गेली. डॉ. आले त्यांनी इंजेक्शन दिले, औषधे दिली. सासूबाईंना थोडेसे बरे वाटू लागले पण ते क्षणिकच ठरले. एक दिवस रात्री झोपेतच त्यांचा अंत झाला. साऱ्यांना पोरकं करून त्या गेल्या. सरिताला सासूबाईंचा आधार होता. तोही तुटला. अजितरावांच्या फिटही अलीकडे वाढल्या होत्या.



त्याचा परिणाम त्यांच्या वागण्या बोलण्यात दिसू लागला. मात्र एक गोष्ट चांगली झाली होती सरिताची हुशारी लक्षात आल्यामुळे अजितराव तिला मान देऊ लागले होते. सरिता थोडी सुखावली चला आता दिवस सुधारले. शारीरिक कष्टांना ती डगमगणारी नव्हती पण नियतीने तिची परीक्षाच घेण्याचे ठरविले होते. येणारे प्रत्येक संकट तिच्या सहनशक्तीचा अंत पाहणारे होते.

आज सकाळपासूनच नीलेशची तब्येत ठीक नव्हती. त्याला ताप येत होता. नेहमीसारखाच असेल म्हणून घरगुती औषध दिले पण ताप उतरेना. त्यातून ताप वाढल्यामुळे त्याला फिटही आली. सरिताच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. ती नीलेशला डॉक्टरकडे घेऊन गेली. सगळ्या तपासण्या झाल्या आणि सरिताची शंका खरी ठरली. वडिलांचाच आजार त्याच्यात उतरला होता. डॉक्टरांनी सांगितले कदाचित कायम औषध घ्यावे लागेल किंवा काही वर्षांनी पूर्ण बरेसुध्दा होईल पण आताच निश्चित काही सांगता येणार नाही. नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही हेच खरे. नशिबाने वाट्याला येईल ते स्वीकारण्याशिवाय इलाज नव्हता. सरिताने मनाला बजावले घाबरू नकोस. सारे ठीक होईल. नीलेशला अधून मधून फिट येत होत्या. त्याचा परिणाम मेंदूवर झालेला स्पष्ट दिसू लागला.

हे सारे कमीच होते म्हणून की काय एक दिवस घरात मुलांबरोबर खेळताना अजितरावांना फिट आली. त्यात मेंदूला मार बसून दुर्दैवाने त्यातच त्यांचा अंत झाला. भावाला कळताच भाऊ धावत गेला. कितीही खंबीरपणाचा आव आणला तरी सरिता पूर्ण कोलमडून पडली. पण काही काळातच भानावर आली. जणु तिनेच नियतीला आव्हान दिले की तू कितीही संकटे माझ्यावर आण पण मी हरणार नाही. एक दिवस तुलाच माझ्यापुढे झुकावे लागेल. पदर खोचून पुन्हा नव्याने उबी राहिली. ८ आणि ९ वर्षांची मुले, त्यातलाच एक आजारी, नोकरी सारे जिद्दीने न डगमगता करायचे ठरविले. उलट भावालाच धीर दिला तू काळजी करू नकोस मी सारे निभावेन. मी खंबीर आहे आणि खरोखरच जिद्दीने पुढील अनेक डोंगराएवढी संकटे सोसली.

अजितरावांनंतर दोन्ही मुलांना सांभाळून नोकरी केली. मुलांच्या शाळा सुरूच होत्या. नीलेश फिटमुळे बुध्दीने थोडा मागे होता पण परेश खूप हशार होता. एक दिवस मुले अशीच खेळत होती. पायरीवर बसून सरिता खेळ बघत होती, मध्येच दोघांचे काहीतरी भांडण झाले आणि दोघांची चिडवाचिडवी सुरू झाली. मोठा जरा अशक्तच होता. तो धाकटा मारेल म्हणून पळू लागला. पळता पळता पडला. मागे धाकटा होताच तो त्याच्या अंगावर बसून गुद्दे मारू लागला. सरिता घाबरली धाकटा शिरजोर तर होणार नाही! या विचाराने घाबरली. मग ती रोज धाकट्याला परिस्थिती समजावून सांगू लागली. तुझा भाऊ मोठा असला तरी आजारी असतो. अशक्त आहे. तुम्ही दोघेच घरी असता. तू शहाणा आहेस तेव्हा त्याला सांभाळायची जबाबदारी तुझी आहे. धाकटा

समजूतदार होता, हशार होता. मोठा होऊन तो भावाला चांगला सांभाळू लागला. सरिताची काळजी मिटली.

अजितरावांच्या मिळालेल्या फंडातून सरिताने घराच्या खोल्या वाढवून त्या भाड्याने दिल्या. नीलेश कसाबसा मॅट्रिक झाला. धाकटा मात्र इंजिनिअर झाला. हुशारीमुळे त्याला छान मोठ्या पगाराची नोकरी लागली. सरिताने धडपड करून नीलेशला हिंदी टायपिंग शिकविले आणि वडिलांच्या जागी लावून दिले. लवकरच साधीशी मुलगी बघून नीलेशचे लग्न लावून दिले. पाठोपाठ परेशचेही लग्न लावले. नीलेशला आता क्वचित फिट येत असे. दोघांचे संसार सुरळीत सुरू झाले. पण दुर्दैव अजूनही सरिताची पाठ सोडायला तयार नव्हते. वर्ष दोन वर्ष सुरळीत गेली आणि एक दिवस नीलेशची बायको त्याला सोडून गेली पण हरेल ती सरिता कसली? नीलेशला घटस्फोट घ्यावा लागला पण सरिताने परत दुसरी मुलगी पाहून नीलेशचे लग्न लावून दिले.

दोन्ही मुलांचे संसार सुरळीत सुरू झाले. येथे मात्र नियतीने सरितापुढे हात टेकले. नीलेशची दुसऱ्या गावी बदली झाली. सरिता आता अधून मधून दोघांकडे राहू लागली आणि कधी घर सांभाळण्यासाठी गावी राहू लागली. आता वयोमानानुसार तिला प्रवास झेपणे अशक्य झाले. दोन्ही मुलांच्या सुनांच्या सांगण्यानुसार हे घर विकून मुलांच्या जवळ दुसरे घर घेऊन राहायचे ठरविले. म्हणूनच आज घर सोडताना तिला दु:ख होत होते. या घराने तिला संकटे दिली तसे चांगले दिवसही दिले होते.

एवढ्या वर्षांचा घराचा सहवास सोडून मुलांकडे आली आणि तेथेही चांगली रमली. मुलेही आईचा सांभाळ मनापासून करत होती. त्या दिवशी सरिताचा वाढदिवस होता. मुलाने आणलेली नवीन साडी नेसून नातवंडाशी खेळत सरिता बसली होती. तेवढ्यात सून आणि मुलगा बाहेरून आले, आईच्या हाताला धरून तिला उठवले. आई चल जरा तुला गंमत दाखवतो, तुला खूप आनंद होईलं? अरे बाबांनो, तुमचा सुखी संसार बघून मला खूप समाधान वाटले. देवाने खूप सुखही दिले आणि दु:खही दिले पण आता मी आनंदात आहे. पण आई चल तर बाहेर मुलाचा आणि सुनेचा आग्रह मोडवेना, आई बाहेर गेली. नव्या कोऱ्या गाडीचे दार उघडून सून उभी होती. आई या गाडीत, बसायचा पहिला मान तुमचा. तुमच्या कष्टांमुळे हे घडले. आनंदाने सरिताच्या डोळ्यांत पाणी आले. आतापर्यंतच्या साऱ्या कष्टांचे चीज झाले. आनंदाने पाणावलेले डोळे पुसत ती गाडीत बसली.

## चारोळ्या

१) फुलपाखरासारख स्वच्छंदी जगणं
प्रत्येकाला जमतं नाही
वास्तवाचे चटके अनुभवल्याशिवाय
जीवनातील सार उमजतं नाही.

२) काट्याची वाट तुडवतांना
डोळ्यातून अश्रू काढू नयेत
पायाखाली जरी आली फुले
तरी त्याला काटे असतात हे विसरु नये.

३) बायको गेल्यावर नवऱ्याने
लगेच दुसरं लग्न करायचं
मग नवरा गेल्यावर बायकोने
का त्याच्याच आठवणीवर जगायचं?

**-जुई प्रधान**

*With best compliments from*



# AWATE

## CONSTRUCTION CO.

## THANE

# रॉयल

- संगीता गुळवणी

सूर्याजीनं गॅरेजचं दार उघडून त्या देखण्या रॉयल मर्सिडीस बेंझकडे एकवार पाहिले आणि तो भान हरपून पहातच राहीला. नारिंगी शालू नेसलेल्या ललनेसम ती भासत होती. त्या शालूवर जागोजागी रेखीव कृष्णरंगाचे ते सुबक पट्टे तिच्यातील करारी मुद्रेचंच काय ते दर्शन घडवीत होते. तिची तनू संगमरवरासारखी नितळ भासत होती. काजळभरल्या तेजस्वी डोळ्यातून ती समोरील रस्त्यावर प्रेमाचा वर्षाव करीत असल्याचाच काय तो आभास निर्माण होत होता. तिच्या चाकांवरील चकचकीत शुभ्र आऱ्यांनी तिला श्रृंगारित केलं होतं. तिच्या दोन्ही बाजूला गोलाईतून अलगद उतरणाऱ्या सहज सुंदर नितळ आकारावरून नजर हटता हटत नव्हती. खरंच ती एक रॉयल कुटुंबातील कुलवंत वधूच काय ती भासत होती. सूर्याजी प्रथम दर्शनातच तिच्या प्रेमात पडला. 'लेवून पितांबरी साज, रॉयल गं तुझा हा बाज' त्याचं कविमन गाऊ लागलं.

**"बघत काय राहिलास? गाडी सुरू कर". मॅडम खेकसल्या आणि तो भानावर आला.धरणीवर पसरलेल्या त्या इंद्रधनुष्यी रंगीबेरंगी धुक्यानं तो घायाळ झाला होता.**

त्यानं दिमाखात रॉयल मर्सिडीस बाहेर काढली आणि पोर्चमध्ये आणली. ती देखणी दिमाखदार गाडी तो प्रथमच हाताळत होता आणि त्याचं मन भरून आलं आणि...आणि तो त्या नक्षीदार दरवाजाकडे अनिमिष नेत्रांनी पाहतच राहिला. दरवाज्यातून दिमाखात हंसाच्या चालीने चालत येणाऱ्या त्या ललनेने त्याच्या ह्दयाचा ठोकाच चुकविला. जणू ही साक्षात रॉयल मर्सिडीस जिवंत होत त्या ललनेच्या रूपात अवतरली होती. अप्रतिम! असं दृश्य त्याच्या नयनांनी कधी अनुभवलं नव्हतं. नितळ गोरी कांती, गोलाकार सुंदर मुखडा, काळेभोर तेजस्वी डोळे, त्या सुंदर मुखड्याचं सौंदर्य अधिकच खुलविणारं ते थोडंसं रुंद नासिकेत, सुंदर शुभ्र दंतपंक्तीचे यथार्थ दर्शन घडविणारे ते फुलपाकळ्यांसारखे विलग अधर, अर्धवर्तुळाकार रेखीव जिवणी, काळ्याभोर केसांच्या भांगातून कपाळावर डोकावणारी ती बारीक कलाकुसर ल्यालेली मोत्याची हिरवीकंच माळ, कपाळावर टिमटिमणारी ती सुंदर नभातील टिमटिमणाऱ्या ताऱ्यासमान बिंदी आणि त्या सुंदर चंद्रासमान शीतल चेहऱ्याला छेद देत पुढे झुलणारी ती कृष्ण बट केसात माळलेल्या फुलांनी आणि तनूवर सुशोभित असंख्य अलंकारांनी लडलडलेली ती नार ही साक्षात सौंदर्याची खाण भासत होती. 'तू नभातील परी, जणू सौंदर्याची सरी, नार डोलत....'

"बघत काय राहिलास ? गाडी सुरू कर". मॅडम खेकसल्या आणि तो भानावर आला. धरणीवर पसरलेल्या त्या इंद्रधनुष्यी रंगीबेरंगी धुक्यानं तो घायाळ झाला होता. त्याला ती रॉयल नार त्या रॉयल गाडीत कधी येऊन बसली हे समजलं देखील नाही. मालकीणबाईंच्या धारदार आवाजानं भानावर येऊन त्यानं गडबडीने गाडी सुरू केली खरी पण त्याचं सैरभैर झालेलं मन न एकाग्र होता वेडवाकडं उडतचं राहिलं. तो एकवार त्या चारचाकी मधुमतीला न्याहाळत होता आणि मग समोरील आयन्यातील तिच्या त्या चालत्या-बोलत्या प्रतिबिंबाला न्याहाळत होता.

"कुठं जायचं मॅडम?" मुख्य सडक जवळ येताच भानावर येत हलकेच ब्रेक दाबत त्यानं विचारलं. एक सौंदर्याझी नाजूक, हलका हवाहवासा वाटणारा झटका देत थांबली खरी पण ती आयन्यातील सौंदर्याझी तिच्या जिभेच्या ॲक्सिलेटरवर पाय देताना कडाडली:

"तुला कुठं जायचंय तेही माहीत नाही? जुहूच्या लग्नाबद्दल कालच साहेबांनी सांगितलंय की नाही?" विजेसमान तिचा तो ध्वनी त्या आल्हाददायक गाडीत घुसला. हं...होय मॅडम," तो कावराबावरा होत म्हणाला. जुहूला घेतो आणि त्यानं गाडी वळविली.

चेहऱ्यावर तरंगणारी ती वळणदार बट वारंवार मानेला हलका झटका देत मागे सारण्याचा प्रयत्न करताना मालकीणबाई मासिक चाळत राहिल्या आणि त्यांचा तो मनमोहक नाजूक चाळा त्या नशीबवान आयन्यात न्याहाळण्याचा मोह तो टाळता टाळू शकत नव्हता. त्या मासिकाच्या मुखपृष्ठावरील नारही मॅडमच्या आरस्पानी सौंदर्याने ओशाळल्यासारखी वाटत होती. 'बट तुझी नाचते, खदकन हासते....'

'कर्रर्रऽऽऽ' एक शब्दबध्द करता न येण्यासारखा असा तो कर्णकर्कश ब्रेकचा ध्वनी त्या दोन्ही रॉयल सौंदर्याझींना मोठा धक्का देत थांबला.

"ठोकली असतीस आता," त्या सुंदर दंतपक्तीतून निखारे उडाले. जमत नसेल तर उद्यापासून घरी बैस. आणि पुढे हलकेच बास्टर्ड म्हटल्याचं त्यानं ऐकलं आणि त्याची कानशिलं गरम झाली. रक्त प्रवाहित झालं. शिवी! त्याची नस थडथडू लागली तो एक पदवीधर होता. कंपनीत नोकरी करीत होता. तसं शब्द त्यानं कधी ऐकून घेतले नव्हते. अपमान सहन करणं त्याच्या स्वभावात नव्हतं... पण परिस्थितीच्या रट्यापूढे सारंकाही गळून पडतं हेच खरं. कंपनीतील नोकरी गेल्याने तो रस्त्यावर आला होता. घरात सकाळ-संध्याकाळ गिळणारी चार तोंड होती. त्यानं स्वाभिमान गुंडाळून खुंटीला टांगून ठेवताना मिळालेली ही चालकाची खाजगी नोकरी लागलीच पत्करली होती. ती त्याची अन्नदाती होती. त्यानं ती शिवी आणि राग आवंढ्याबरोबर झटक्यात गिळून टाकताना काहीच न घडल्याचा आविर्भावात तो गाडी चालवीत राहिला.

गाडी सिग्नलला थांबली आणि रॉयल मर्सिडीसमधील रॉयल मॅडमच्या खिडकीवर एक खंगलेली, केस पिंजारलेली भिकारीण आपल्या काखेतील पोराला कशीबशी सांभाळताना टक-टक करीत राहिली. खिडकी अलीकडे-पलीकडे कल्पनेच्या पलीकडील विरोधाभास असल्याचं सूर्याजीच्या कविमनाला जाणवलं. हा स्वर्ग अन् तो नरक, "ए हट बाजूला सरक..." मॅडमनी तिच्याकडे वळून पाहण्याचेही कष्ट घेतले नाहीत. तिच्या उघड्याबोडक्या पोराकडे दुर्लक्ष करीतं त्या मासिकातील उंची पोशाखाचं अवलोकन करीत राहिल्या. त्या उंची रॉयल काचांनी बाहेरील दु:खालाही त्यांच्यापासून अलग केल्यासारख्या त्या निर्विकारपणे बसून राहिल्या. संपत आलेल्या सिग्नलच्या बेळेबरोबरच भिकारणीचाही दिवा निळ्या आशेतून तांबड्या निराशेत बदलला. ती पुढे सरकली आणि





तिचा करुण चेहरा सूर्याजीच्या रॉयल काचेतून डोकावला. दु:खांना दूर राखणारी ती काच खाली सरकली. एक कुबट दर्प त्या सुखासीन जगतात शिरला, तसा मॅडमचा माथा ठणकला.

"आधी ती खिडकी बंद कर," त्या खेकसल्या. "शी...शी...शी..." त्या नाक गच्च धरीत म्हणाल्या; त्या सुंदर नाकाला तशा त्या उग्र दर्पाची सवय नव्हती. मला विचारल्या खेरीज खिडकी उघडू नकोस. पुन्हा एक सुरनेची तोफ धडाडली.

रॉयल तिच्या तालात आणि झोकात चालली होती. तिच्या काचेबाहेर उन्ह रणरणत होतं, जागोजागी घाम निथळत होता, दुर्गंधी होती, धक्के होते, कर्णकर्कश ध्वनी होते, माश्या घोंघावत होत्या परंतु त्याची किंचितही झळ रॉयलमधल्या त्या रॉयल लेडीला बसत नव्हती. बाहेरच्या हालआपेष्टांचा तिथे मागमूसही नव्हता. बाजूने जाणाऱ्या त्या साऱ्या देशी गाड्या अदबीने रॉयलला वाट सोडत होत्या. तिच्या त्या भरजरी रूपाने कावरंबावरं होताना अंग चोरीत होत्या. एक सायकलवाला मात्र रॉयलला न जुमानता कॅरेजवर बायकोला आणि दांडीवर पोराला बसवताना रमतगमत चालला होता. रॉयल मंदावली आणि मॅडमचा सुंदर चेहरा कसानुसा झाला.

"ह्या सायकलवाल्यांना रस्त्यावर बंदी करायला हवी. बघत काय राहिला आहेस, हटत नसेल तर दे त्याला धक्का."

सायकलवाल्याच्या कानावर एकदाचा रॉयलचा मंजूळ ध्वनी पडला आणि तो त्याच्या साऱ्या लव्याजम्यासह खाली उतरत बाजूला झाला. पुढे मोठा बोजा घेऊन चाललेल्या हातगाडीवाल्याने काही मिनिटांची खोटी केली. त्या साऱ्या दीड दमडीच्या गाड्यांनी रॉयलची वाट अडवावी हे काही मॅडमच्या पसंतीत उतरत नव्हतं आणि त्या वेळोवेळी हेटाळणी करीत राहिल्या. आरशातून त्या त्रासिक चेहऱ्याकडे कटाक्ष टाकताना एकाएकी सूर्याजीला त्या सुंदर तनूतील किडलेल्या मनाची जाणीव झाली आणि त्याचा पसरलेला दुर्गंध रॉयलबाहेरील दुर्गंधापेक्षाही अधिक बोचरा होता. 'इंद्रधनू तूझी गं काया, पर अंतरी कशी नाही माया, नार तू गेली गं वाया...' सूर्याजी तो मुखडा न्याहाळताना मनात गुणगुणत राहिला.

पुढे वाहतूक मंदावत जात थांबली.

"अशा गतीने लग्न लागल्यानंतर पोहोचू" अस्वस्थपणे चूळबूळ करताना त्या साऱ्या सुंदर वातावरणाला छेद देऊन गेलेला मॅडमचा कर्कश ध्वनी रॉयलमध्ये घुमला.

"मॅडम, पुढे ट्रॅफिक जॅम आहे."

"ते दिसतंय. दुसऱ्या रस्त्याने चल."

"पण ते आता शक्य नव्हतं." रॉयल ना पुढे ना

मागे इंचभरही सरकू शकत नव्हती. चहूबाजूनी हातगाडीपासून ते अर्धे सामान बाहेर लोंबकळत उभ्या असलेल्या महाकाय ट्रकनी त्या रॉयल सुंदरीला वेढा घालून जेरबंद केले होते. ती एकेक इंच लढवत पुढे चालली होती आणि तिच्यामध्ये मस्तीत बसलेली ती सुंदरी आता मात्र अस्वस्थपणे एकवार हातातील घड्याळाकडे आणि बाहेर पसरलेल्या देशी गजबजाटाकडे एकवार नजर टाकीत राहिली.

बेशिस्त बास्टर्ड ! मॅडम वैतागून पुटपुटली, ती पुन्हा एकदा त्या सुंदर मुखातून किळसवाणी बेडकूळी उडावी तशी सूर्याजीला भासली. त्या नजर न ठरणाऱ्या कुठीत एकूणच एखादी गटारगंगा प्रवाहीत झाल्याचंच काय ते वेळोवेळी दर्शन होत होतं. आतला सारा हिशेबच निराळा होता.



पुढे भीषण अपघात झाला होता. रॉयलसम एका देखण्या गाडीवर भंगार सामानाचा ट्रक उलथला होता. त्या निळ्या रॉयलमध्ये जागोजागी भंगार सामान घुसले होते आणि त्यातून तिची लक्तरं डोकावत होती. तो चालता-बोलता स्वर्ग क्षणार्धात भीषण नरकात बदलला होता. तिची मग्रूरी, तीचा 'मी' पणा तिला भोवल्याचं बोललं जात होतं. तोऱ्यात पुढे होत नसलेली वाट शोधताना तिनं तिची ती दुर्गती ओढवून घेतली होती. तिचे महागडे अवयव तिच्यातील उच्चपदस्थांना वाचविण्यास असमर्थ ठरले होते. हृदयाचा ठोका चुकविणारंच ते दृश्य होतं त्या काचेनं तात्पुरतं वेगळं केलेलं ते क्षणभंगुर जग क्षणार्धात नष्ट होत एकरूप झालं होतं. सुन्न होत सूर्याजी ते करुण दृश्य पहात राहिला. 'तुझं वेगळेपण तुला नडलं, थडगं तुझं इथं गाडलं...'

“बघत काय राहिलास? उशीर होतोय”, काचेतील प्रतिबिंब फुत्कारलं आणि भानावर येत तो पुढे निघाला. कशाची बनली आहे ही सुंदर ललना ? इतकी कशी ही कोरडी ? अगदीच पाझर न फुटणारं रेखीव दगडी शिल्पच काय ते वाटतयं हे.

“निघ तू. संध्याकाळी आठ वाजता ये”,गाडी लग्नघरात शिरताच मॅडम म्हणाल्या आणि त्या मागेही न वळून पाहता त्या उच्चभ्रू गर्दीत 'हाय' करीत मिसळूनही गेल्या.

गाडी लग्नघरात लावत तो त्याच्या नेहमीच्या ओळखीच्या जगात परतला. उगाचच त्याला त्या रॉयल जगात घुसमटल्यासारखं वाटलं. तो घरी परत आला तेव्हा दुपारचे दोन वाजले होते.

“तुला किती वेळा सांगितलं की तू जेवून घेत जा. माझ्याकरिता थांबू नकोस” तो पत्नीवर शब्दांचा चाबूक फिरविताना म्हणाला. ती काहीच न बोलता त्याचं पान वाढत राहिली. डोळ्यात साठविलेल्या मॅडमच्या रॉयल रूपात तो त्याच्या पत्नीचं ते साधं ध्यान न्याहाळण्याचा प्रयत्न करीत राहिला अन् त्याचं मन काळवंडलं. खरचं इंद्राच्या ऐरावतापुढील ही शामभटाची तट्टाणीच म्हणायची. मॅडममध्ये नखशिखान्त कुठंही तसूभरही दोष शोधून सापडत नव्हता आणि इथं मात्र पहावे तिथं दोषच दोष दिसत होते. थोडंफार टिकून राहीलेलं

सौंदर्यही तिच्या अस्ताव्यस्त कपड्यांनी आणि अव्यवस्थित केसरचनेनं पार लोपल्यासारखं वाटत होतं. मॅडमच्या पडलेल्या सूर्यप्रकाशात तिचा तो चंद्र कुठंतरी लुप्त झाल्यासारखा वाटत होता.

"छोटीला ताप भरलाय. डॉक्टरकडे न्यावं लागेल," त्याच्या त्या रॉयल तंद्रीला छेद देताना ती म्हणाली.

"तापाची गोळी देऊन झोपव. उगाच छोट्याछोट्या कारणासाठी डॉक्टर नको," तो अनिच्छेने तिच्या पायाच्या नखांमध्ये साचलेली घाण न्याहाळत म्हणाला. मॅडमच्या पायाची बोटंही कशी त्यांच्या चेहऱ्यासारखी स्वच्छ, सुंदर होती.

"चांगलीच फणफणलीय ती," भाजी वाढत ती म्हणाली.

"रुमाल भिजवून कपाळावर ठेव," तो तिच्या हातातल्या निस्तेज बांगड्या न्याहाळत म्हणाला. मॅडमच्या मनगटात किती मोहक मोत्याची माळ होती!

"एकदा बघा तरी पोरीला."

"एकदा सांगितलेलं कळत नाही का तुला?" तो खेकसला. "उगाच डॉक्टरच्या मढ्यावर पैसा घालू नकोस." आणि तो हात धुवायला निघून गेला.

मॅडमचं नक्षीदार रूप त्याच्या नजरेसमोर नाचत होतं. त्या फटकळ होत्या. आपली पायरी मुळीसुध्दा सोडत नव्हत्या, पण ते सारंही त्यांना कसं शोभून दिसत होतं. दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याकरिताच त्यांचा जन्म झाल्यासारखा वाटत होता. खरंच अशा स्त्रीचा गुलाम होण्याचं भाग्यही नशिबानं लाभतं. तो त्या भाग्यवान गुलामावर कविता लिहू लागला. 'तू राणी मी गुलांम, लवूनी करतो तुज सलाम...' त्याचं शरीरच फक्त त्या पोपड्या उडालेल्या घरात होतं. मन रॉयल गाडीत बसताना रॉयल ललनेभोवती रुंजी घालीत होतं. कविता शब्दबध्द होत राहिली.

कवितेच्या ओळी गुणगुणत तो मॅडमना लग्नघरातून आणायच्या मोहिमेवर निघाला. त्यांना पहायची त्याला ओढ लागली होती. परमेश्वरानं खूप कष्ट घेऊन बनवलं होतं त्यांना पण त्यांचं मन?... तो दचकला. त्यांच्यातील वारेमाप सौंदर्यानं त्यांना फटकळ, गर्विष्ठ बनविलं होतं. पण तेही त्यांना किती शोभून दिसत होतं. काही माणसं वडापमध्ये गर्दी करून प्रवास करतानाही कशी झोकात वाटतात तर काही वातानुकुलित टॅक्सीतही डोळे फाडफाडून मीटरकडे रोखून पहात प्रवास करताना स्वतःचंच हसं करून घेत असतात.

तो वेळेआधीच लग्नघरात पोहोचला. त्यानं त्याच्या रॉयल गाडीचं डोळे भरून दर्शन घेतलं आणि त्यात त्याला त्याच्या मॅडमचं पुन्हा एकदा रूप दिसलं. बाजूलाच उभ्या तशाच नारिंगी रंगाच्या टोयोटानेही त्याचं लक्ष वेधून घेतलं. तीही तितक्याच झोकात उभी होती. वधू-वराची जणू ती जोडीच वाटत होती. कितीतरी वेळ तो त्या यांत्रिक कलाकृतींना न्याहाळत राहिला आणि त्याच्या मनात काव्य उमलू लागलं. 'बघ तुझा हा सखा, पाहतो कसा, रोखूनी आयना...'

बऱ्याच उशिरा मॅडम आल्या आणि त्याची धांदल उडाली. पुन्हा त्यांच्या फुलासमान सुंदर मुखड्यातून निखारे फुटण्याआधीच त्यानं लगबगीने पुढे होत रॉयलचं दार अदबीनं उघडलं आणि हे काय? हा दर्प तर परिचित वाटतोय हा आणि कोणता उंची सेंट?... नाही. हा सेंट नव्हे. हा तर मद्याचा वास. मॅडमनी मद्य घेतलं होतं तर. नक्कीच तेही एखादं उंची रॉयल मद्य असणार. मॅडमचं सारं जगच रॉयल आहे. राजहंसच तो. असल्या-तसल्या डबक्यात थोडाच विहार करणार? मानस सरोवरच त्याचं जलाशय.

रॉयल निघाली आणि त्याच्या पत्नीनं फोन केला. रंगाचा बेरंगच जणू. मॅडमना आवडणार नाही.

त्यानं लागलीच बंद केला. रॉयलनं डौलदार वळण घेतलं आणि पेंगुळलेल्या मॅडम हलकेच कलल्या. त्यानं ती मोहकताही डोळ्यात साठविली आणि पुन्हा तो फोन वाजला. वैताग नुसता.

'नंतर बोलू', तो फोनवर खेकसला आणि त्यानं तो स्विच्ड ऑफ केला. त्याच्या आवाजानं मॅडमची झोप क्षणभर चाळविली पण पुन्हा त्यांनी ते सुंदर नयन हलकेच मिटले. खरचं ही पेंगही कशी रॉयल वाटते. निद्रादेवीच हलकी निद्रा घेत असल्यासारखंच ते वाटतंय. त्यांना स्वप्नही किती सुंदर पडत असतील ? फुलांच्या ताटव्यात विहार करीत असतील त्या. कांचनमृगाबरोबर हितगूज करीत असतील.

...आणि त्यानं तो रॉयलचा नारिंगी वर काचेतून पाहिला. त्याला कौतुक वाटलं जणु. भान विसरून जात आपोआपच तो आपल्या प्रेयसीच्या रम्य वाटेवर चालू पडल्यासारखाच तो त्याला भासला. एक चाळा समजून त्यानं रॉयलचा वेग कमी केला आणि तोही मंदावला. प्रेयसीची पाठ सोडायलाच तो तयार नाही तर...? गाड्या-गाड्यामध्येही प्रेम जमतं तर आणि त्या विचाराबरोबर तो खुदकन हसला स्वत:शीच.



खरंच रॉयलनं त्याला आपल्या बंधनात जखडताना खेचूनच तिथंपर्यंत आणलं तर... हमरस्ता सोडून रॉयल साध्या रस्त्यावर धावू लागली आणि तो वेडा प्रियकर दुरून आपल्या प्रेयसीला हेडलाईटभरल्या नजरेने तिला न्याहाळात स्वप्नावर धावतच होता.

गाडी मॅडमच्या बंगल्यात घुसताना त्यानं सहजच काचेतून डोकावत पाहिलं. तो आता तिथं नव्हता. अखेर त्याच्या प्रेयसीचा निरोप घेऊन गेला म्हणायचा. त्याला त्या गाड्यांच्या प्रेमावर कवितेचे शब्द आठवू लागले. 'पाहिले गं तुला मी हेडलाईटभरल्या नजरेने, अन् माझे वायपर फिरू लागले...' तो पुन्हा एकदा खुदकन हसला आणि रमतगमत बंगल्याबाहेर पडला. तो अजूनही त्या रम्य स्वप्नात होता. त्या साऱ्या रॉयल अदा आठवतच तो कोपऱ्यावरच्या गाडीवर चहा पीत थांबला आणि त्यानं तो प्रियकर पाहिला. ती गाडी आता मॅडमच्या बंगल्याकडे सरकत होती. बापरे! हा तर मॅडमच्या मागावर आहे. त्यांना काही धोका...? तो लागलीच उठला आणि धावतच बंगल्याच्या फाटकात पोहोचला. तो दुरूनच सारंकाही न्याहाळत राहिला. मॅडमनीच फाटक उघडलं आणि ती टोयोटा आत शिरत आपल्या रॉयल मैत्रिणीला बिलगून उभी राहिली. तिच्यातून तिच्यासारखाच एक भारदस्त तरुण उतरला. राजबिंडं त्याचं ते रूप. क्षणार्धात त्या संधिप्रकाशात ते राजहंस एकमेकांना बिलगले. त्याला रती आणि कामदेव तिथं अवतरल्याचाच काय तो भास झाला.

तो घरी परत आला तेव्हा त्याच्या डोळ्यात तेच सारं स्वप्न सतत पहारा देत होतं. त्याची भुकेची जाणीवही बोथट झाली होती. मध्यरात्र झाली होती. स्वैपाकघरात वाढून ठेवलेली ती दोन ताटं पाहून त्याचा चेहरा आकसला. त्याची पत्नी न जेवताच त्याची वाट पाहून झोपी गेली होती. ढोंगी! उगाचच एक विचार

त्याच्या मनात उठला आणि मुकाटपणे तो जेवू लागला.

अंथरुणावर त्यानं अंग टाकलं खरं पण त्याला झोप येईना. दिवसभराच्या रॉयल आठवणींनी त्याचं मन धुंद झालं होतं. बाजूलाच त्याची पत्नी मुलीला कुशीत घेऊन झोपली होती. त्यानं एकवार तिच्याकडे पाहिलं आणि पुन्हा एकदा त्याच्या त्या रम्य स्वप्नात दाखल झाला. खरंच किती भन्नाट, रेखीव, एखाद्या सुंदर काव्यासारखं जीवन आहे मॅडमचं. तिच्यासारखीच तिची ती रॉयल गाडी. त्या रॉयल गाडीचाही तसाच रॉयल प्रियकर! सगळं कसं अगदी एखाद्या सुंदर निसर्ग चित्रासमान... अखेर त्या गाड्यांचंही मिलन झालं आणि त्या राजहंसाच्या जोडीचंही. कधीही पहाट होऊ नये अशी ही मिलनाची रात्र तिथं प्रज्वलित झालीय. सरूच नये हा प्रहर! तो पडल्या-पडल्या पंख्याच्या फिरणाऱ्या पात्यांकडे पहात त्या गुलाबी स्वप्नाच्या रंगामध्ये हरवून गेला होता आणि त्याचा मोबाईल वाजला. एवढ्या रात्री कोणी फोन केला असेल? तो घाईघाईने उठला. तो साहेबांचा फोन होता - परदेशाहून.

"अरे सूर्याजी मॅडम फोन उचलीत नाहीत. कुठंतरी ठेवून झोपी गेलेल्या दिसतात. सगळं ठीक आहे ना?"

तो चरकला. हा भोळाभाबडा साहेब तिकडे मॅडमच्या चिंतेने व्याकूळ झालाय आणि इकडे ही रॉयल नार खुशाल तिच्या याराबरोबर मजा मारते आहे. काय उत्तर द्यायचं साहेबाला?

"अरे बोलत का नाहीस? मॅडमची तब्येत ठिक आहे ना?"

"ठीक आहे साहेब," तो घाईघाईने कसाबसा उत्तरला आणि साहेबानं समाधानानं फोन ठेवला. त्याला एक क्षण साहेबाला त्या बेइमान रॉयलविषयी सांगावं असंही वाटलं पण मग ह्या मोठ्यांच्या खेळात आपली मात्र दुर्दशा होईल या विचाराने तो थांबला.

खरंचं त्या रॉयल नारीच्या अंतरी सारं काही अरॉयलचं दडलंय म्हणायचं. तो पुन्हा एकदा फिरणाऱ्या त्या विचारांच्या पात्यांबरोबर गरगरू लागला. बाहेरच्या त्या मनमोहक सौंदर्याच्या आतली बाजू खरंच काळी होती. हिरा आकर्षक होता परंतु तो खरा नव्हता. प्रेम जडावं अशीच ती नार होती आणि साहेबांचं तिच्यावर प्रेम जडलं होतं पण तिला फक्त त्यांनी दिलेल्या रॉयल गाडीत आणि ऐषोआरामातच काय तो रस होता. त्यांनी प्रेमाने तिच्या हातात ते सारे उंची अलंकार जडले होते परंतु तो हात आता दुसऱ्याच्याच हातात होता. खरंच हे सौंदर्य नक्कीच उंची नाही. त्याला रूप आहे पण खोली नाही. आतून कीड लागलेला तो एक शोभेचा सुंदर शंखशिंपला आहे. रॉयलपणाची चटक लागलेल्या त्या ललनेला बाह्यजगाचीच नव्हे तर आपल्या माणसांचीही कदर उरली नव्हती. तिला स्वच्छंदी पक्षीणही म्हणता येणार नव्हतं. ती एक सुंदर परंतु अविचारी नार होती.

त्यानं हलकेच कुशी बदलीत त्याच्या शांत पहुडलेल्या पत्नीकडे पाहिलं. तिचं ताट तसंच स्वैपाकघरात तिनं झाकून ठेवलं होतं. ती न जेवताच झोपली होती. तो उशिरा येणार असल्याचं त्यानं सांगितलं नसल्यास ती नेहमीच त्याची जेवणाकरिता वाट पाहायची. इथं ही साध्या कपड्यातील साधी स्त्री दैनंदिन समस्यांशी दोन हात करताना तिच्या माणसांकरिता त्याग करण्यास सदैव तयार होती तर तिकडे ती रॉयल मॅडम सारी सुखे झोळीत टाकणाऱ्या आपल्या माणसाकरिता न थांबता साऱ्या लक्ष्मणरेखा लीलया पार करीत तिच्या भोगवादात रमली होती. कोण खरी रॉयल? तो स्वतःला कवी मानत होता पण त्याच्या प्रतिभेनं त्याच्या पत्नीच्या अंतरी डोकावून कधी पाहिलं नव्हतं. त्या तिथं अंतरी एक सुंदर रॉयल

नार वसत असल्याचा त्याला एकाएकी साक्षात्कार झाला. तिथं त्याग होता, आपलेपणा होता, उदंड माया होती. ते सारे तिचे अलंकार होते आणि त्या अलंकाराचा प्रकाश तो प्रथमच अनुभवीत होता. मॅडमचे हिऱ्याचे अलंकार त्यापुढे निष्प्रभ असल्याचं त्याला जाणवलं. तो तिची शांत चर्या न्याहाळत राहिला. तिथं एकही अलंकार लटकला नव्हता फक्त विश्वासाचं कुंकुचं काय ते तिच्या कपाळावर सुशोभित झालं होतं. तिनं ते तिचं साधं आयुष्य समाधानाने स्विकारलं होतं. स्वतःकरिता तिनं कधी काही मागितल्याचंही त्याला आठवून आठवेना. ती नेहमीच चंदनासारखी झिजत राहिली परंतु बाह्य सौंदर्याच्या चमचममध्ये अडकून पडलेलं त्याच्या कविमनानं कधी तो सुगंध अनुभवलाच नव्हता. आज ती सुखद दरवळ त्याच्या अंतरी प्रथमच दरवळल्याचा त्याला भास झाला. त्यानं मनोमनी मॅडमचे आभार मानले. त्यांनीच खरंतर त्याला त्याच्या पत्नीची खरी ओळख करून दिली होती. घरच्या चार भिंतीत गृहलक्ष्मी बनून वास करीत होती. तिच्याकडे रॉयल गाडी नव्हती परंतु उन्हातान्हातून आपल्या माणसाकरिता पायपीट करण्याची अलौकिक रॉयलता तिच्या अंगी वसत होती. तिच्याकरिता तिचा संसार रॉयल होता- गाडी वा दागिने नव्हे! आपल्या माणसाला दिलेला शब्द पाळण्याची असाधारण उंची तिच्याकडे होती आणि तिच्या त्या अंतःस्थ सौंदर्यापुढे मात्र त्याला मॅडम अगदीच खुजी वाटू लागली.

तीच खरी रॉयल स्त्री होती. त्याची धर्मपत्नी! होय, तीच खरी रॉयल स्त्री होती!

## ओळखा आदर्श बायको...

तुमची बायको आदर्श व गृहकृत्यदक्ष आहे हे तुम्ही कसे ओळखाल?

भात चिकट झाल्यास...
तांदूळ नवीन होता.
चपात्या कडक झाल्यास...
चांगले दळून दिले नाही.
चहा गोड झाल्यास...
साखर जाड होती.
व चहा पातळ झाल्यास...
दुधात पाणी जास्त होतं.
लग्नाला जाताना...
कुठली साडी नेसू? मला चांगली साडीच नाही!
घरी लवकर आल्यास...
आज लवकर कसे आलात?
उशीर झाल्यास...
इतका वेळ कुठे होतात?
एखादी वस्तू स्वस्त आणल्यास...
तुम्हांला सगळे फसवतात.
महाग आणल्यास...
तुम्हांला कुणी आणायला सांगितलं होतं?
जेवणाचं कौतुक केल्यास...
मी दररोज करते.
नावं ठेवल्यास...
तुम्हांला मेलं कौतुकच नाही कशाचं
एखादं काम केल्यास...
एक काम कधी धड करीत नाहीत.
न केल्यास...
तुमच्या भरवशावर राहिले तर एकही काम होणार नाही.

बघा, तुमची बायको / तुम्ही या निकषात बसता का?

# रोपटं कुणाचं ?

- वैदेही केवटे

पाचवीला पुजलेली गरिबी असलेल्या घराण्यात जन्मलेला सदानंद फक्त नावातूनच आनंद बाळगून होता. जन्मानंतर वडिलांचं छत्र डोकीवर उघडता उघडताच हरपलेलं. त्यामुळे गरिबी जन्मातःच अशी त्याच्या नशिबाला आंदण लाभलेली. आईच्या पदराखालीच अन्न, वस्त्र, निवारा यांवर त्याच्या आयुष्याच्या गुजराणीची सुरुवात झाली. आईच्या हाताचं अंथरूण, पदराचं पांघरूण नि स्तनपानाचं उदरभरण या आधारे सदानंद त्या गरिबीच्या छत्राखाली वाढला होता.आई म्हणजे सर्वस्व होतं त्याचं. मोलमजुरी करत सांभाळ करणारी सावित्री ही आईबापाची दोघांची कर्तव्ये पार पाडत त्याला पोसत होती. त्याला शिक्षण देण्यासाठी मेहनतीची पर्वा न करता ती झटत होती. या गरिबीच्या सोसणाऱ्या झळींतून निदान लेकानं तरी बाहेर पडावं या इच्छेनं ती सदानंदाला शिकण्यासाठी त्याचा पाठपुरावा करत होती. पण शिक्षणात तेवढा हशार नसलेल्या सदानंदानं जेमतेम कसंबसं १२वीपर्यंत शिक्षण पुरं करत त्याला रामराम ठोकला. पुढल्या शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशाचीही सोय करणं तेवढं सोपं नव्हतं म्हणूनच नोकरी करण्याचा निर्णय पक्का करत त्यानं नोकरी शोधायचा प्रयत्न सुरू केला. सावित्रीच्या कामांतल्या ओळखीवरून त्याला एक छोटीशी नोकरीही मिळाली. उपजतच कष्टाळू, प्रेमळ, शांत स्वभावाच्या सदानंदानं कामातही मन लावून कष्ट करत करत मालकाचं त्याच्याबद्दलचं चांगलं मत बनवत त्यांची मर्जी संपादन केली. छोट्याशा साध्या नोकरीतून मिळणाऱ्या अपुऱ्या पगारात दोघांचं जेवूनखाऊन पोट भरेल एवढी सोय झाली. अतिकष्ट करून थकलेल्या सावित्रीलाही आता खूप काम झेपत नसल्याने तिला सदानंदने काम कमी करायला भाग पाडलं होतं.

**“ लग्नाला दोन वर्षे लोटल्यानंतर मातृसुलभ इच्छेने सुमित्रा आईपणासाठी अंतर्मनातून तळमळू लागली. दिलेल्या वचनाला चघळत मनातल्या सुप्त इच्छेला मनातच दाबत अस्वस्थ होऊ लागली. ”**

सदानंद आता वयाने वाढत लग्नाच्या हद्दीवर पोहोचला होता. सावित्रीनं लग्नासाठी त्याच्या पाठी टुमणं लावायला सरुवात केली. सदानंद लग्न न करण्याच्या निश्चयावर ठाम होता.ज्या मिळकतीत दोन माणसांचा कसातरी उदरनिर्वाह चालतो त्यात तिसरा जमा झाल्यावर जमाखर्चाची कशी मिळवणी करणार? आईला हे पटवून देताना तो थकत नव्हता, पण ह्या विचाराच्या चिंतेने ती माय मात्र शरीराबरोबरच आता मनानेही थकू लागली होती. तिळतिळ जीव तुटत पोखरल्या जाणाऱ्या मनाने ती खंगू लागली. अंगी तापानं शिरकावं करत सावित्रीला पूर्ण ग्रासून टाकलं. प्रथम प्रथम घरगुती औषधांचा मारा करूनही जेव्हा ताप हटेना तेव्हा सदानंदनं सरकारी इस्पितळात तिला भरती केलं. कांही दिवसांनंतरही माघार न घेणाऱ्या तापामुळे, खालावत्या प्रकृतीच्या अवस्थेमुळे डॉक्टरांनी

शहरातल्या हॉस्पिटलात भरती करण्याचा सल्ला सदानंदला दिला. पण शहरात नेणं-आणणं, हॉस्पिटलचा खर्च विचारात घेता अस्वस्थ, खिन्न झाला थोडा. पण आईसाठी पैशाची उसनवारी करून हा डॉक्टरी सल्ला मानण्याचं त्यानं ठरवलं. परंतु सावित्रीच्या कानी ही गोष्ट पडताच तिनं पूर्ण नकार देत म्हटलं, "सदानंदा, अरे कशाला हा पैशाचा खेळ खेळतोस तू? हे बघ, माझी तब्येत सुधारणं आता कठीण आहे. उगाच पैसा खर्चून आपल्या धगधगत्या गरिबीला जन्मभर कर्जाच्या आगीत आणखी जाळूं नकोस. मी काय सांगते ते नीट ऐक. माझा तर आता भरवसा नाही, यातून वाचणं कठीणच आहे; पण माझी एक इच्छा मात्र तू पुरी कर. लेका, लगीन कर तू आता."

"आई, कसं शक्य आहे ते? तू काय जाणत नाहीस कां आपली परिस्थिती? कुणाची पोर घरात आणून तिला उपासमार करायला भाग पाडायचं का?"

"अरे, ऐक तर माझं, हे बघ, आता दोन माणसाचं घर कसंबसं चालवतोच ना आपण? मग माझ्या जाण्यानं कमी झालेल्या जागी एका नवीन माणसाची सोय तशीच होईल की नाही? हिशोब तोच, पण तुला माझ्यानंतर आधार तर मिळेल ना? तशीच साधी गरिबाची लेक आण बायको म्हणून. सांभाळेल सर्व काही ती. मग सारं ठीक होईल. तुझ्या चिंतेतून मुक्त होईन मीही. आणि दुसरी गोष्ट म्हणजे हे बघ सदानंद, माझी शपथ आहे तुला जर माझ्या उपचारासाठी शहरी हॉस्पिटलात नेऊन ठेवलंस तर."

आईच्या या निग्रही हट्टाने व्याकुळत, पैशाच्याअभावी आईचे उपचार करण्यासाठी आपण असमर्थ आहोत या विचाराने सदानंद दु:खी मनाने बेचैन झाला. तशातच शेवटी सावित्रीबाईंनी जगाचा अखेरचा निरोप घेतला. आभाळ कोसळून निराधार झालेला सदानंद उन्मळून पडला. रोजच्या एकटेपणात आईच्या अखेरच्या शब्दांचा उमटता आवाज त्याला अस्वस्थ करू लागला नि अखेर कांही एका विचाराने त्याने लग्न करण्याचं ठरवलं. आईच्या सांगण्याप्रमाणे एका खूप गरीब घराण्यातील साधीसुधीशी अशी सुमित्रा त्याला खूप चौकशीअंती योग्य वाटली. प्रथमच तिला साऱ्या परिस्थितीची जाणीव देत आणखी एक अतिमहत्त्वाची गोष्ट सांगून त्यासाठी तिच्याकडून तशा वचनाची मागणी केली. "हे बघ सुमित्रा, माझ्यासारख्या माणसाला मूल होणं परवडणार नाही. ते पोसण्याची माझ्यात ताकद नाही व त्या मुलाला असं गरिबीत जन्माला घालून वाढवून चिंताग्रस्त बनण्याची माझी अजिबात इच्छा नाही. त्यापेक्षा मला मूल नसलं तरी चालेल, ही गोष्ट मान्य असेल तरच मला होकार दे. नंतर कुरकुर चालणार नाही." गरिबीचे त्याहून जास्त चटके खाल्लेल्या सुमित्रेला हे पटून तिनं संमती दर्शवली. देवळातल्या भटजीकरवी त्यांचा अखेर देवळातल्या देवासमोरच साधासा विवाह संपन्न झाला.

लग्नाला दोन वर्षे लोटल्यानंतर मातृसुलभ इच्छेने सुमित्रा आईपणासाठी अंतर्मनातून तळमळू लागली. दिलेल्या वचनाला चघळत मनातल्या सुप्त इच्छेला मनातच दाबत अस्वस्थ होऊ लागली. सदानंदला न सांगताच तिच्या अस्वस्थतेची जाणीव झाली. बऱ्याच विचाराअंती त्यानं एक योजना आखली. आपल्याला तर अपत्य होऊ देण व त्याची परवरिश करणं अशक्य आहे, पण सुमित्रेच्या आई होण्याच्या इच्छेची परिपूर्ती करणं तर आपल्याला शक्य होऊ शकेल. नीट सर्व चौकशीअंती, सर्व माहिती नीट गोळा केल्यानंतर मनाशी एकट्यानेच निर्णय पक्का करत त्यानं या बाबतीत अज्ञानी असलेल्या सुमित्रेला सर्व समजावून सांगितलं. तिनंही आनंदानं होकार दर्शवला - अपत्यजन्माच्या अनुभव-इच्छापूर्तीसाठी!

डॉ. आशुतोषांच्या सल्ल्याने घेतलेल्या



निर्णयाला संमती मिळताच पुढील सर्व प्रक्रिया सुरू होऊन सुमित्रेच्या पोटी लवकरच गर्भधारणा झाली नि डॉ. च्या योग्य देखरेखीखाली अखेर तिला पुत्ररत्न प्राप्त झालं. ठरल्या नियमाप्रमाणे हे सरोगेट मातेचं बालक त्याच्या मूळ मातापित्यांकडे सोपवलं जाणार होतं पण त्या जन्मलेल्या मुलाच्या अतिनाजूक अवस्थेत त्याला मातेच्या दुधाचीच अत्यावश्यकता होती. बाहेरील कुठल्याही दुधाच्या ॲलर्जीमुळे त्याला ते दूध पचत नव्हतं. मातेचं दूध हाच एकमेव मार्ग होता. नाइलाजाने काही महिने मुलाच्या संगोपनाची जबाबदारी डॉ. आशुतोषांच्या विनंतीवरून सुमित्रेवरच पडली. साहजिकच स्तनपान करता करता त्याच्या रोजच्या पालनपोषणाचीही जबाबदारी तिला पार पाडतेवेळी दूध पाजताना जावळावरून फिरणारा हात, न्हाऊ घालताना छातीशी बिलगलेला तो नाजूक बाळाचा देहस्पर्श, झोपताना गायलेली अंगाई यांत सुमित्रा अधिकाधिक गुरफटून जाऊ लागली नि त्याबरोबरच स्व-अपत्याच्या अधिकाराची भावनाही घट्ट रुजू लागली.

आता ३-४ महिन्यांतच मुलाच्या प्रकृतीतील प्रगती, हळूहळू बाहेरील अन्य आहारावर होणारी त्याची पचनसुधारणा पाहून, ते बरंचसं सुदृढ झालेलं मूल त्याच्या मातापित्यांकडे सोपवण्याचे आदेश डॉक्टरांकडून सदानंदला दिले गेले. सदानंद सुमित्रेला ह्यासाठी समजावत मूल परत करण्यासाठी विनवू लागला. दिलेले वचन पाळत मूल त्याच्या स्वाधीन करताना कंठ दाटलेल्या सुमित्रेचा जीव, पाझरलेला पान्हा आटला जात, ओठांवरली अंगाई रिक्त होत गुदमरला जाऊ लागला. बाळाच्या विरहाचं दुःख उरी कोंबत तिने बाळाला मन घट्ट करत सदानंदकडे सुपूर्द केलं नि दिल्या वचनाला जागत सदानंदानंही ते बाळ डॉक्टरांच्या हवाली केलं.

डॉक्टरांशी केलेल्या करारानुसार मिळालेली भरपूर रक्कम हाती पडताच सदानंदाला एक वेगळाच आनंद झाला. ह्या पैशाच्या मिळणाऱ्या व्याजातून आपली ही हलाखीची परिस्थिती हळूहळू चांगलीच सुधारू शकते नि मग आपण त्यानंतर आपल्या स्वतःच्या अपत्याची इच्छा पूर्ण करू शकतो, ह्या विचाराने तो खुलला, नि त्यावेळेस डॉक्टरांकडे साभार सोपवलेल्या त्या अपत्याला, आपली खोली खाली केलेल्या भाडोत्र्यासारखा समजत, झालेल्या कमाईच्या स्वार्थी विचारात गुंतत गुरफटत तो हरखून गेला. घरी परतत आत्तापर्यंत या पैशाच्या व्यवहाराबद्दल अंधारात ठेवलेल्या सुमित्रेला तो सर्व मोकळेपणानं सांगू लागताच ती अधिक बेचैन होऊ लागली. तिच्या अंतर्मनात कोंडून दबलेला विचार ज्वालामुखीसारखा उसळू लागून बाहेर पडत सदानंदाला झळाळीचे चटके देऊं लागला.

"तुम्ही हे सर्व करण्यासाठी पैसे घेतल्याचं मुळीच ठाऊक नव्हतं मला आणि शिवाय ह्या मिळकतीतून यापुढे आपण आपलं मूल जन्माला घालू शकतो हा तुमचा विचारही मला आता प्रथमच कळताना कसा अजबसा वाटतोय. यातून एक पोटचंच मूल

विकून स्वतःसाठी दुसरं मूल विकत घेतल्याची अपराधी टोचणी मला यापुढे सतत सतवत राहील. ते मूल दुसऱ्याचं असलं तरी तेही माझंच हक्काचं होतं. कुणाचं तरी मूल जन्माला घालण्यासाठी जरी माझं गर्भाशय वापरायला दिलं असलं तरी ते सर्वस्वी माझ्या ओटीपोटात बहरत जगलंय, माझ्या दुधावरच पोसलं गेलंय, माझ्या प्रथम पहिल्यावहिल्या स्पर्शावरच स्नेहांकित झालंय. मग त्याच्यावर माझ्या स्वतःच्या बाळासारखीच माया, ममता, प्रेम यांचं नातं नाही का जुळत? मग तेही माझंच बाळ नाही का होत? माझ्या आईपणाचा कांहीच हक्क नाहीं का रहात त्यावर? घराच्या बगिच्यात बीज आणून टाकत, पेरून उगवलेलं रोपटं आपलंच असतं ना? की बीज देणाऱ्याचं? मी भले अनपढ असेन पण हे सत्य माझ्या मनीच आहे नि ते मी मुळीच नाकारू शकत नाही. मला आता त्या माझ्या उखडलेल्या रोपट्याच्या मोबदल्यात त्या रिक्त जागेवर लावलं जाणारं दुसरं रोपटं मुळीच नको."

मुलाच्या दुराव्याने व्याकुळ होत दुखावलेल्या सुमित्रेला असं व्यथित होत खूप अस्वस्थ झालेलं पाहून अखेर सदानंदानं दुसऱ्या तऱ्हेने समजावण्याचा मिथ्या प्रयत्न केला. "तुझं म्हणणं काही अंशी खरं असलं तरी तू हाही विचार करून पहावा, अग कित्येक वेळा माळीही नर्सरीत बीज पेरून त्यांतून उगवलेलं रोपटं स्वतः वाढवतो, संगोपन करत नंतर ते मोठ्या बंगल्यातील बगिच्यात नेऊन रुजवतो व त्याला तेथे वाढू देतो, कारण त्याला माहीत असतं आपण सांभाळत संगोपन केलेलं असलं तरी ती बंगल्यातील त्या रोपट्याची बहरण्यासाठी योग्य जागा आहे. त्या रोपट्यावर त्या माळ्याचा नंतर काहीच अधिकार उरत नाही."

पटो न पटो, मिटलेल्या डोळ्यांपुढे फुलांनी गच्च बहरलेलं रोपटं पाहत सुमित्रेनं त्या रोपट्याला



आपल्या डोळ्यांतील अश्रूंनी सिंचन करत कुरवाळलं नि सदानंदाच्या कुशीचा आसरा घेतला.

# आधार तुच एकला

**- प्रेरणा प्रदीप उपाध्ये**

"रश्मी, तुझं पत्र आलंय बघ," सासुबाईंची हाक ऐकून मी हातातलं काम टाकून बाहेर आले. मनात आश्चर्य होतच. कारण दिवाळी असल्यामुळे सगळ्यांची ग्रीटिंग, पत्रे येऊन गेली होती. आज पाडवा असल्याने मी गुलाबजामची तयारी करत होते. बाहेर येऊन बघते तर पत्र राजूच्या, माझ्या नवऱ्याच्या हातात होतं. त्याने ते माझ्याकडे दिलं. ते पत्र नसून ग्रीटिंग होतं. मी उत्सुकतेनं उघडलं, तर लाल गुलाबांच्या फुलांमध्ये लिहिलं होतं प्रिय राजश्रीस...आलोक शहाकडून.

ग्रीटिंग सगळ्यांनी बघितलं. सगळ्यांची नजर लगेच बदलली. सासुबाई, सासरे, राजूची धाकटी बहीण मीना, तिच्याहून लहान भाऊ दिनेश. मला एकदम अस्वस्थ वाटायला लागलं. राजूच्या चेहऱ्यावर संशय नव्हता पण प्रश्नचिन्ह होतं. आलोक शहा माझा बालमित्र होता पण तो मला असं ग्रीटिंगा पाठवेल हे खरच वाटत नव्हतं. पण ग्रीटिंग माझ्या माहेरच्या नावाने आलं होतं. माझं माहेरचं नाव राजश्री व राजूचं पूर्ण नाव राजशेखर असल्यामुळे दोघांनाही राजूच घरात म्हटले जाई. त्यामुळे माझे नाव लग्नानंतर रश्मी ठेवलं गेलं.

वास्तविक माझा व राजूचा प्रेमविवाह होता. हा एक विचित्र योगायोगच म्हणायचा. माझं माहेर मुंबईचं तर राजू नाशिकमधे राहायचा. आमची मुंबईला अत्यंत जुनी पण चार खोल्यांची स्वतंत्र मोकळी जागा आहे. मला तीन मोठे भाऊ व एक मोठी बहीण आहे. सगळ्यांमध्ये लहान असल्यामुळे माझे भरपूर लाड व्हायचे.

आलोक शहा आमच्यासमोरील बंगल्यात राहायचा. माझ्याहून थोडासा मोठा म्हणजे माझ्या नीनादीदीएवढा. आमचा त्यांच्याशी खूप घरोबा होता. त्यांची गुजराती भाषा आमच्या मैत्रीच्या आड येत नव्हती. दीदी, मी व आलोक आम्ही खूप धमाल करायचो. माझी बुध्दी चांगली होती पण मला खेळांमध्ये जास्त रस होता. कबड्डीची तर मी चम्पियन होते. खो-खो, टेनिस पण मी उत्तम खेळत असे त्यामुळे मी मॅट्रिकनंतर कॉमर्सला ॲडमिशन घेतली.

> **"प्रेमात पडल्यामुळे की घरच्या विचित्र वागणुकीमुळे कोण जाणे पण राजू सिनियरच्या पहिल्या वर्षी नापास झाला."**

कॉलेजमध्ये गेल्यावर माझं जगच बदललं. रंगाने सावळी असले तरी गोल चेहरा, रेखीव नाकी-डोळी, गालावरच्या खळ्या व आकर्षक बांधा यामुळे माझी गणना सुंदरात होत होती. पूर्वीचा बुजरा स्वभाव जाऊन सगळ्यांमध्ये सहज मिसळत होते. माझ्या सौंदर्यामुळे व स्वभावामुळे माझ्याभोवती कायम मित्र-मैत्रिणींचा गराडा असायचा. इतका भाव मिळत असल्यामुळे मी जणू आभाळातच तरंगत होते. माझ्या भावूक मनाला कविता करायचा नवीन छंद लागला. नकळत अभ्यासावरचं लक्ष कमी झालं.

अचानक माझा दादाची बदली नाशिकला झाली. तो वहिनी व दोन मुलांना घेऊन



नाशिकला राहायला गेला. दादाची मी खूप लाडकी होते त्यामुळे सुट्टी मिळाली की नाशिकला पळत होते. अर्थात दीदीपण माझ्याबरोबर असायची. दादाच्या शेजारीच राजशेखरचं घर होतं. माझ्याहून दोन वर्षांनी मोठा, गोरापान, दाट केसांचा, मोठ्या भावपूर्ण डोळ्यांचा राजशेखर माझा नवीन मित्र बनला. दादाकडे आले की माझा सगळा वेळ त्यांच्याकडेच जाई.

राजशेखरची आई माझ्यावर खूप प्रेम करी. त्याच्या भावंडातही मी मिसळून गेले पण राजशेखर माझ्यावर प्रेम करू लागला आहे हे मला खूप उशिरा समजले. नाशिकहून मुंबईला आल्यावर सुध्दा आम्ही एकमेकांच्या सतत संपर्कात होतो. एखादे दिवस जरी त्याला फोन केला नाही तो अस्वस्थ व्हायचा.

राजू इतका हळवा कसा, याचं कोडं मला जेव्हा राजूने त्याचं प्रेम व्यक्त केलं तेव्हा उलगडलं. त्याने मला त्याची डायरी वाचायला दिली. त्यात त्याने त्याला माझ्याबद्दल काय वाटतं, ते इतक्या तरल शब्दांमध्ये व्यक्त केलं होतं की मी भारावून गेले. मला पण मी राजूवर खूप प्रेम करत असल्याची जाणीव झाली. मी माझं प्रेम व्यक्त करून त्याला साथ देण्याचं वचन दिलं.

मग मात्र वरचेवर माझी पावलं नाशिकला दादाकडे वळू लागली. पण राजू माझ्या दादाच्या घरी आला की त्याच्या आईला आवडत नसे. त्या माझ्याशी खूप चांगलं वागायच्या पण आई-बाबांची खूप कडक शिस्त आहे, असे राजू नेहमी म्हणत असे. "लीना, आई-बाबा जुन्या वळणाचे आहेत. खरं सांगायचं तर शहरात राहून ही मागासलेले आहेत. आपण म्हणण्यापेक्षा तू मोकळ्या वातावरणात वाढलेली आहेस. लग्न झाल्यावर तुमचं कसं जुळणार ? वेळीच विचार कर." राजू असं का म्हणतो हे त्यावेळी मला कळलं नाही. पण आता कळत आहे. त्यावेळी राजूची लीना ऐकून मी सगळं विसरायचे. माझ्यामध्ये व लीना चंदावरकरमधे बरच साम्य असल्यामुळे तो मला खूप वेळा लीना म्हणायचा.

दिवस भराभर पळत होते. प्रेमात पडल्यामुळे की घरच्या विचित्र वागणुकीमुळे कोण जाणे पण राजू सिनियरच्या पहिल्या वर्षी नापास झाला. त्यावरून त्याला घरात खूप बोलले. तू काही कामाचा नाहीस, खायला काळ अन् भुईला भार आणि असं बरंच काही. राजू माझ्याजवळ सांगतांना अक्षरशः रडला. मी राजूला धीर दिला तसच नोकरी करता करता शिक्षण पूर्ण करता येईल तेव्हा नोकरी शोधायला सुरुवात कर असं सुचवलं त्याप्रमाणे त्याने प्रयत्न केल्यावर नाशिक पासून एक तासाच्या अंतरावर असलेल्या खाजगी कंपनीत नोकरी मिळाली पण पगार कमी होता.

माझी पण अभ्यासाची पातळी आधीच घसरली होती. त्यातच मी पण बारावीला नापास झाले. मग मी सरळ सहा महिन्यांचा कम्प्युटरचा कोर्स केला व

नशिबाची साथ मिळाल्यामुळे लगेच नोकरी मिळाली. माझ्या सौंदर्यामुळे खूप जण माझ्याभोवती घुटमळत, नोकरी करायला लागल्यावर हा अनुभव प्रकर्षाने आला. कॉलेजप्रमाणेच मी इकडेही दोन-चार वाक्यांपलीकडे कोणाशी बोलत नव्हते की मैत्री वाढवत नव्हते. एकुलता एक जवळचा मित्र म्हणजे आलोक शहा. लहानपणापासून आमचं पटत असल्यामुळे आमची मैत्री टिकून होती. एकत्र खायचो-प्यायचो, फिरायचो, चेष्टा-मस्करी करायचो पण आमची मैत्री शुध्द होती. त्याची नजरही स्वच्छ होती. त्यामुळे त्याच्याबरोबर मला अवघडलेपण आलं नाही. राजूबद्दल त्याला मी सगळं सांगितलं तेव्हा त्याला पण राजूला भेटायची उत्सुकता वाटू लागली.

राजूचं व माझं प्रेम दिवसेंदिवस वाढत होतं पण आमच्या दोघांच्या घरून विशेषतः त्याच्या घरून लग्नाला संमती मिळेल की नाही याबद्दल खात्री देता येत नव्हती. पण उलटच झालं, राजूचे आई-वडील मला मागणी घालायला आले आणि आमच्या घरून विरोध झाला. राजूचे अजून शिक्षण पूर्ण झालेले नाही, नोकरी चांगली नाही शिवाय माझं वय लहान म्हणजे १९ वर्षे, इतकी घाई कशाला? असे मुद्दे पुढे आले.

शेवटी राजू कायम झाल्यावर वर्षभराने आमचं लग्न करायचं ठरलं. दीदीनेच राजूबद्दल सगळं सांगून आई-बाबांचं मनं वळवलं. माझी नोकरी चालू होतीच. आमचं घर जुनं असल्याने नेमक त्याच काळात दुरूस्तीचं काम निघालं त्यात मी साठवलेले पैसे पण खर्च झाले. आमची आर्थिक स्थिती बरी होती पण घरात माणसं जास्त असल्यामुळे खर्च ही जास्त व्हायचा. त्यात घराचा खर्च झाल्यामुळे आम्ही लग्नाचा खर्च करू शकलो नाही फक्त राजूच्या घरच्यांचे मानपान केले. बाकी लग्नाचा सगळा खर्च राजूच्या आई-बाबांनी केला. आमच्याकडची जेमतेम वीस माणसं होती. आई आजारी असल्यामुळे लग्नाला येऊ शकली नाही त्यामुळे कन्यादान नाशिकच्या दादा-वहिनीने केलं. बाकीची जबाबदारी दीदीने घेतली. लग्न तसं थाटात झालं आणि मी राजश्रीची रश्मी बनून घरात आले.

लक्ष्मीपूजन, सत्यनारायण सगळं पार पडलं. घर पाहुण्यांनी भरलेलं होतं. आम्हांला दोघांना एकमेकांशी धड बोलता सुध्दा आलं नव्हतं. त्यात पाहुण्यांसमोर लग्न झाल्यावर मुलगा आपला रहात नाही, बायकोच्या हातातील बाहुलं बनतो हा विषय चविष्टपणे चघळला जात होता व राजूची आई हुंकार भरत अर्थपूर्ण नजरेने माझ्याकडे बघत होत्या. मला उगीचच अपराध्यासारखं वाटलं पण राजूने माझी बाजू घेत माझी बायको अशी नाही असं ठणकावून सांगितलं.

ना



ववधू असूनही मी रांगोळी काढणं, चहा, केर अशी बारीक-सारीक काम करीत होते. तीन खोल्या, त्यात खूप पाहुणे त्यामुळे आम्हाला एकांत मिळत नव्हता. माझा स्वभाव भिडस्त असल्यामुळे मी राजूकडे नजर उचलून बघत पण नव्हते. आमचा प्रेमविवाह आहे असं वाटतच नाही असं कुणीतरी पाहुणे म्हणाले देखील. का कोणास ठाऊक पण मला खूप दडपण आलं होतं.

आम्ही हनिमूनसाठी लोणावळ्याला जायचं ठरलं आणि इथच पहिली ठिणगी पडली. आई जायला नाही म्हणाल्या. लग्नाचा खर्च खूप झाला होता. पण राजूने ऐकले नाही. आम्ही खूप काटकसरीने राहू, उगीच पैसे उधळणार नाही, जास्त दिवस राहणार नाही असं दहा वेळा राजूने कबूल केल्यावर आम्हाला अगदी गरजेनुसार पैसे देऊन पाठवण्यात आले. पाहुण्यांसमोर झालेलं इतकं मोठं भांडण बघून माझा मूड खरंतर गेला होता पण राजूच्या भावनांचा विचार करून मी स्वत:ला सावरलं. आम्हांला अगदी उपकार केल्यासारखे पाठविण्यात आले. पण निसर्गाच्या सान्निध्यात आम्ही सगळं



विसरलो. आमच्याकडे प्रेमाची दौलत खूप होती तीच आम्ही उधळली. बाकीच्या सगळ्या हौशी मारल्या, आमच्यासाठी काही न घेता लहान नणंद-दिरासाठी घेतलं. जास्तीत जास्त पैसे वाचवले. फक्त तीन दिवस राहीलो. राजू म्हणाला ते पटलं. हे क्षण आयुष्यभर जपून ठेवायचे असतात. ते परत येत नाहीत त्यामुळे घरी परत येताना मी खुशीत होते.

राजूचा पगार कमी असल्यामुळे मी नोकरी करू का म्हणून राजूला विचारल्यावर तो एकदम उसळला, “मी कितीही कष्ट करीन, पण तू नोकरी केलेली मला आवडणार नाही. त्यात तू सुंदर असल्याने वाईट अनुभव येणार त्यापेक्षा लीना आपण गरिबीत पण प्रेमाने राहू.” यावर काय बोलावे मला कळेना.

दिवस भराभर जात होते. एवढ्यात दिवसांच्या अनुभवावरून मला कळलं होतं की माझा राजू खूप साधा आहे, माझ्यावर जीवापलीकडे प्रेम करतो. पण इतरांच्या बाबतीत थोडं वेगळं होतं. मीनाचे व दिनेशचे जसे लाड व्हायचे तसे राजूचे व्हायचे नाहीत. लग्नाआधी माझ्याशी इतकं गोड बोलणाऱ्या ह्याच का आई असा मला प्रश्न पडायचा. तशा त्या मला थेट दुखवत नव्हत्या किंवा बोलतही नव्हत्या. फक्त त्यांची आज्ञा पाळली की खुश. बाबा त्यांच्या शब्दाबाहेर नव्हते. मीना आता कॉलेजला जात होती आणि दिनेश आठवीत होता. पण आईची शिस्त राजूसाठी कडक होती. मला भरतकाम चांगलं येत असे, रांगोळ्या सुंदर यायच्या, मी ते मीनाला शिकवायचा प्रयत्न केला पण तिचा स्वभाव विचित्र असल्यामुळे मला यश आलं नाही. माझ्या कुठच्याच गोष्टीचं आई कौतुक करीत नसत. मी सगळ्यांच्या जवळ जाण्याचा, जमवून घेण्याचा बराच प्रयत्न केला.

आणि नेमका राजूच्या कंपनीत संप सुरू झाला. ते दोन महिने कसे काढले आमचं आम्हाला

माहीत. नोकरी करायला लागून तीन वर्षं झाली तरी त्याचे फारसे सव्हिंग नव्हतं. जवळजवळ सगळा पगार तो घरी देत होता शिवाय भाजी, किरकोळ वस्तू आणणे हा खर्च पण करीत असे. त्यामुळे संपाच्या काळात आम्ही फारसे पैसे घरी देऊ शकलो नाही. त्यामुळे बरंच काही घडलं.

संप सुरू होऊन एक महिना झाला होता. आई सारख्या घालूनपाडून बोलायच्या. बाबा बोलायचे बंद झाले होते. आता संप झाला यात आमची चूक काय तेच कळत नव्हतं. आता कंपनी सुरू होणार नाही. शिक्षण धड नाही मग चांगली नोकरी कशी मिळणार ? शिक्षणाच्या वयात प्रेम केलं आता भोगा त्याची फळं. आईबाप आहेतच पोसायला. लोकांची मुलं घराण्याचं नाव काढतात. इथे मात्र कशातच धड हुशारी नाही. वर संसार मांडलाय. हे सगळं ऐकून फार वाईट वाटायचं. कधीतरी हळूच माझ्या पायगुणाचा उल्लेख होई.

त्यात नेमका मला खूप खोकला झाला व राजूकडे पैसे नव्हते. डॉक्टरांकडे जाण्याइतके पैसे मागितले तर आईंनी चक्क ‘नाही देणार, एवढ्याने काही ती मरणार नाही.’ असं म्हटल्यावर राजूचा संयम संपला. शब्दाने शब्द वाढत गेला. एवढी मिजास असेल तर वेगळे राहा असा हुकूम सुटला. रागाच्या भरात राजूने हाताला येईल ते सामान घेतलं, मित्राकडून पैसे उसने घेतले व माझ्या विनवणीला न जुमानता हॉटेल गाठले. दोन दिवस राहिलो. पण मानी असलो तरी हातात पैसा नव्हता. झक्कत घरी परत आलो. कुठे गेला होतात हे त्यांनी पण विचारलं नाही व आम्हीपण सांगितलं नाही.

आई शाळेत शिक्षिका होत्या. त्या त्यांचा जवळजवळ सगळा पगार बँकेत टाकत असत. माझ्या भोळ्या राजूला मात्र आपणही पैसे साठवावेत हे सुचलं नव्हतं. आम्ही दोघंही फार लवकर संसारात पडलो होतो. पहिला संक्रांत सण आला आणि गेला. मला हळदी कुंकवाची खूप हौस होती पण राजूचा पगार नव्हता व आई खर्च करायला तयार नव्हत्या. आम्हांला दोघांना पोसत होत्या हेच नशीब. रथसप्तमीच्या दिवशी राजूच्या कंपनीचा संप मिटला. देवाने माझी हाक ऐकली.

एवढं होऊन राजू मला नोकरी करू देत नव्हता. शिक्षण खूप नसलं तरी बारावी व संगणक ज्ञान शिवाय अनुभव याच्या जोरावर बऱ्यापैकी नोकरी मला मिळाली असती. बाबा स्वतः चांगल्या हुद्यावर होते पण राजूला पडत्या काळात मानसिक आधार त्यांनी दिला नाही. आई नोकरी करत असल्यामुळे मला घरचं सगळं बघावं लागे. त्याबद्दल माझी तक्रार नव्हती. पण कितीही स्वच्छ, चांगलं काम केलं तरी त्यात चुका शोधल्या जायच्या. घर माझं असलं तरी मला स्वातंत्र्य नव्हतं. माझा स्वैपाक छान व्हायचा पण आज काय तेल जास्त आहे, तर उद्या काय तिखट जास्त आहे अशा सबबी सांगत आईंनी स्वैपाक स्वतःकडेच ठेवला. त्यांच्या त्या थेंबभर तेलावर केलेल्या मिळमिळीत भाज्या मला गिळवायच्या नाहीत. पहिल्या पहिल्यांदा अर्धपोटी उठायचे पण नंतर सवय केली. सासुरवाशीण



होते नं! राजूला पण माझ्या हातचं आवडायचं पण बोलायची सोय नव्हती. त्याचे मित्र घरी आले तरी आईंना विचारल्या शिवाय चहा, खाणं करू शकत नव्हते. तो मात्र मित्रांकडे जाऊन वाट्टेल ते खाऊन यायचा. मला पण सगळ्यांना नवनवीन पदार्थ करून वाढावेत असं खूप वाटायचं पण इलाज नव्हता.

घरात एखादा नवीन पदार्थ किंवा गोष्ट आम्ही नसताना केली जायची व आमच्यापर्यंत यायची नाही. माझं जाऊ दे पण राजू त्यांचाच मुलगा होता नं? मग त्याच्याबाबतीत असं का? ह्याचं उत्तर मला दुसरीकडून मिळालं. आईंच्या सासूने म्हणे आईंना खूप छळलं होतं. सगळा कारभार त्यांच्या हातात होता. सासू गेल्यावर त्यांची दडपलेली इच्छा वर आली म्हणून मी बारीक-सारीक गोष्टसुध्दा ऐकल्या पाहिजेत असं त्यांना वाटे. राजू त्यांचं सगळंच म्हणणं ऐकत नसे व तो लहानपणापासून आजीचा लाडका होता म्हणून त्याच्यावर नकळत राग होता. खरं खोटं त्याच जाणोत.

आईंनी सांगितल्याशिवाय आम्ही नातेवाईकांकडे जाऊ शकत नव्हतो. मला इथे मन मोकळं करायला कुणीच नव्हतं. शेजाऱ्यांशी विशेष संबंध नव्हते. दादाकडे जायची तर बंदीच होती. चहाड्या केल्या तर? म्हटलं तर मला काही कमी नव्हती पण त्या कोंदट वातावरणात माझा जीव घुसमटत होता. मुंबईच्या वेगवान जीवनशैलीपुढे मला इतला दिवस रटाळ, कंटाळवाणा वाटे. मग माझा राग सगळा रात्री राजूवर निघे. तो पण वैतागत असे. तो म्हणे या सगळ्याची मी तुला पूर्वकल्पना दिली होती. आता का रडतेस? माझ्या मिठीत हे सगळं विसरून जा. मी पण तुझ्यासाठीच सहन करतोय नं? पण मी त्याच्या स्पर्शाने फुलत नव्हते. मला सगळ्याचा वीट आला होता. एकदा मी वैतागून म्हटलं पण की मी उगीच तुझ्याशी लग्न केलं. माझं मन, भावना कशालाच किंमत नाही. आई लांब, मैत्रिणी नाहीत, माझं मन मी कुणाजवळ मोकळं करू? माझं मन तडफडत होतं. कुणीच मला समजून घेत नव्हतं. अगदी राजूसुध्दा. मी व राजू चुकून शेजारी बसलो तरी आईंना आवडत नसे. लहान दीर-नणंदेचे भान ठेवायला हवे. दिवसभर दोन शब्द बोलायला पण प्रायव्हसी मिळत नसे. सगळ्यांना सांभाळून घेता-घेता मी थकून जायचे. एवढ्या-तेवढ्या कारणावरून मी आतून रडत होते.

अशातच आई सिरीयस असल्याचा भावाचा फोन आला. मला जावं लागलं. आईची तब्येत खूप खालावली होती. आईच्या कुशीत शिरून खूप रडले. इतके दिवस कोंडून ठेवलेल्या दुःखाला वाट मोकळी करून दिली. आई काहीच बोलली नाही फक्त थोपटत राहीली. आलोकची त्या ग्रीटिंगबद्दल खरडपट्टी काढायची असं ठरवलं.

दरम्यान आलोकचं लग्न झालेलं बघून मला धक्का बसला. आलोकने बायकोशी ओळख करून दिली. आलोकच्या मानाने ती बरीच जाडी वाटली. त्याच्या निवडीचं आश्चर्य पण वाटलं. ती आत गेल्यावर मी आलोकला ग्रीटिंगाबद्दल विचारलं नाही. तो म्हणाला, “काय सांगतेस राजू?” मी खरंच तुला ग्रीटिंग पाठवलेलं नाही. मी का तुझ्या संसारात विष कालवेन? मी कोणाचीही शपथ घ्यायला तयार आहे. तुझा एवढा पण विश्वास नाही का माझ्यावर? आलोक खरं बोलतोय हे पटलं पण सासरी कुणाला पटणारं नव्हतं. कुणीतरी मुद्दाम खोडसाळपणा केला होता.

नंतर मी आलोक नसताना खूप वेळा आलोकच्या घरी गेले. त्याच्या आईने माझे पूर्वीसारखे लाड केले. तेव्हा क्षणभर मनात आलं मी आलोकशी लग्न केलं असतं तर? पण लवकरच माझा भ्रमनिरास झाला. आलोकची आई स्वतःच्या सुनेला नावे ठेवत होती. मला आश्चर्य वाटलं कारण त्याच्या बायकोत

जाडेपणा सोडला तर मला काहीच वाईट आढळलं नाही.

एकदा संध्याकाळी आम्ही दोघी फिरायला गेलो तेव्हा मी तिला छेडलं. ती म्हणाली, “काय सांगू राजूताई, आलोक खूप बदलले आहेत. सिगारेट पितात, कधी कधी दारू पण. त्यांच्या आईने फार लाडावून ठेवलं आहे. मी ह्यांना व्यसनावरून बोलले की आईंना राग येतो. मी उध्दट ठरते. आता मी जाडी आहे हा काय माझा दोष आहे? येता -जाता त्यावरून टोमणे मारतात. मग बारीक सून करायची होती. पण आमच्याकडून भरपूर हुंडा मिळाला म्हणून मला पसंत केलं. तुम्हांला खोटं वाटेल पण मला इतर पुरुषांशी बोलू देत नाहीत. तुम्ही कशा ह्यांच्याशी बेलता तसं जर मी कुणाशी बोलले तर गहजब होईल. कितीही चांगलं वागलं तरी कौतुकच नाही. एक चांगला नवरा मिळायला एवढंच मी लक्षात ठेवून छोट्या-मोठ्या घरगुती गोष्टी मी ह्यांच्यापर्यंत नेतच नाही. ह्यांना पण सगळं समजतं त्यामुळे आमच्यातलं नातं अजून घट्ट झालंय.”



तिची वाक्यं आठवतच मी घरी आले. नंतर काही जुन्या मैत्रिणींकडे पण जाऊन आले. पण कुणीच मला पूर्ण सुखी दिसलं नाही. सगळ्यांच्या घरात वाद होते पण म्हणून त्या माझ्यासारख्या दुःखी पण नव्हत्या. भरलेला अर्धा ग्लास सोडून रिकामा अर्धा ग्लास बघत मी त्रास करून घेत आहे.

म्हणजे मीच चुकत होते काय? मला कळून चुकलं की मी आलोकशीच काय कुणाशीही लग्न केलं असतं तरी अशा गोष्टी थोड्याफार फरकाने घडल्याच असत्या. मीच छोट्या छोट्या गोष्टींनी नाराज होऊन रडत होते. आहे नं मीना विचित्र? जाऊ दे. थोडं तिच्या कलाने घ्यायचं. सासु-सासऱ्यांना मान दिलेला आवडतो तर द्यायचा. तसं म्हटलं तर ते मला छळत का होते? फक्त बारीक-सारीक गोष्टीत लक्ष घालायचं थोडंसं दुर्लक्ष करायचं. काही गोष्टी चालवून घ्याव्या लागतात. आई-वडील नाही का बोलत? त्यांचा कुठे मनात राग धरतो? स्वतः दुःखी होऊन माझ्या राजूला पण दुःखी केलं. राजूच्या आठवणीने मन बेचैन झालं. तो किती प्रेम करतो माझ्यावर आणि मी माझ्याच दुःखात चूर होते. त्याला काय वाटत असेल, लग्नानंतर आपण हिला काहीच सुख देऊ शकलो नाही. एकतर त्याला आईवडिलांकडून फारसं प्रेम मिळालं नाही आणि मी ही त्याला समजून घेतलं नाही. आदर्श गृहिणीचं तत्त्व मी विसरले. मी खूश असले की तो पण आनंदात असायचा. त्याला कसलंही व्यसन नाही. रात्री मी वैतागायचे तरी काही बोलायचा नाही. फार हळवा आहे. त्याला सावरायला हवं. त्याचा उत्साह वाढवायला हवा. मी खूप चुका केल्या होत्या.

मनाशी काही ठरवून मी सासरी आले. आईची तब्येत सुधारल्याने काळजी नव्हती. आल्यावर प्रथम मी गोड बोलून मी नोकरी करण्याबाबत राजूचं मन

वळवलं. खटपट केल्यावर मला चांगल्यापैकी नोकरी मिळाली. माझाही पैसा घरात येऊ लागल्यावर साहजिकच आई-बाबा खुश झाले. राजूला पण ते पटलं. माझाही दिवस चांगला जाऊ लागला व बारीक-सारीक गोष्टींचा विचार करायला वेळ मिळेनासा झाला. राजूला बाहेरून परीक्षा देऊन काहीतरी करून दाखवच अशी जिद्द त्याच्या मनात निर्माण केली. आई-बाबांना जास्त मान देऊ लागले. छोट्या-छोट्या गोष्टी पण त्यांना विचारून करू लागले. राजू आल्यावर त्याला न चुकता खायला देऊ लागले. पहिल्यांदा आई खूप बोलल्या पण मी दुर्लक्ष केलं. घर माझंही होतं. निदान राजूचे व्यवहार मी हातात घेतले. राजूवर पूर्वीसारखं खूप प्रेम करू लागले. माझ्यातील या बदलाचं राजूला आश्चर्य वाटलं तसच तो सुखावलाही. अजूनही छोट्या-छोट्या गोष्टी घडतात, डोळ्यात पाणी येतं पण मी तिथेच थोपवते. खाली सांडू देत नाही. मीना - दिनेशच्या कलाने घेते पण पूर्वीसारखा भावही देत नाही.

अजून एक वर्षाने राजू पदवीधर होईल मग त्याला बढती मिळेल. मी मात्र नोकरी सोडणार नाही. नोकरीला लागल्यापासून मी पहिले बचत सुरू केली आहे. पैशाची बाजू बळकट झाल्याने घरात शांतता आहे. राजूची तब्येत सुधारली आहे आणि तो आनंदी पण असतो. अखेर तोच तर माझा खरा आधार आहे.



## चारोळ्या

तू माझा श्वास होतीस, तु माझा ध्यास होतीस
मी थकल्यावर माझ्या मनाला, रुँजी घालणारं गीत होतीस.

तुझ्याबद्दल बोलता बोलता, अख्खं आयुष्य सरुन जाईल
फक्त तू जवळ राहा, माझं मनं तुझं होईल.

मीही आता ठरविले, तुझी आठवण काढायची नाही
कितीही असह्य असले तरी,डोळ्यातून पाणी काढायचे नाही

**-जुई प्रधान**

**तू,मी आणि त्या आठवणी**
**एक जुना ऋणानुबंध आहे,**
**लग्नाच्या गाठीत बांधलो नसलो तरी**
**अतूट असा रेशीमबंध आपल्यात**
**आहे...**

### भिकारी

भर उन्हाळ्याच्या दिवसांत २० लोक बसस्थानकावर बसची वाट पाहत उभे होते. एक भिकारी आला, प्रत्येकाकडून एक-एक रुपया भीक म्हणून घेतली आणि ऑटोमध्ये बसून निघून गेला...

# ती आली तिने जिंकले !!

**- कल्पना सुळे**

माझा गाव, माझी माणसं जी बाहेरून काटेरी आणि आतून गोड फणसासारखी असणारी या बद्दल मला नेहमीच अभिमान वाटत होता. गेली दोन वर्षे दुष्काळ सोसल्यावर मात्र पावसाने कृपा केली. त्या आधी बळीराजाचे पोट खपाटीला गेले होते, आसू गालावर सुकले होते. धरणीमायचे काळीज फाटून चिरा पडल्या होत्या असे दुष्काळाचे सावट असूनही कधी मला गाव सोडावेसे वाटले नाही. दुष्काळाने गावची मसणवट होत चालली होती. पूजा-पाठ, मंत्र-तंत्र करून पावसाला अवताण दिले जात होते. मीही प्रार्थना करत होतो पण माझ्या प्रार्थनेने गावावर नाही पण माझ्या जीवनात एक फूल उमलणार होते. तिची पावले आमच्या गावात पडणार होती. त्याने माझ्या जीवनात प्रेमाची बरसात होऊन आर्द्रता वाढणार होती.

त्या रात्री धुंवाधार पाऊस बरसरत होता. मिट्ट काळोख दाटला होता आणि अशा वेळी दारावर थाप पडली, “साहेब, दार उघडा, तुम्हाला सर्किट हाऊसवर बोलावले आहे.” अशा ह्या तुफान रात्री कोण बरे मला बोलवत असेल. मी दार उघडून प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. साहेब शहरातून एक तरुणी आलीय तिने तुम्हाला बोलावले आहे, ती आत्ताच भेटायचे म्हणते आहे. एवढ्या पावसात न जाता सकाळीच जावे असा विचार केला पण तसेच म्हत्त्वाचे काम असल्याशिवाय तिने तातडीने बोलावले असेल हा विचार करून छत्री घेऊन मी बाहेर पडलो. पावले आपोआप सर्किट हाऊसकडे वळली.

एवढ्या धुंवाधार पावसात एक तरुणी आपल्याला भेटायला बोलावते ह्या विचाराने मी मोहरून गेलो. उद्याची सकाळ फार सुंदर असेल ह्या कल्पनेने मी खश झालो. मातीच्या मृद्‌गंधाने मला ह्या गावाने बंधनात ठेवले होते. ह्या गावची माणसे साधी सरळ आहेत म्हणूनच आजपर्यंत त्यांच्यावर अन्याय होत आला आहे आणि विकासाच्या दृष्टीने गाव मागे पडला ह्या विचाराच्या तंद्रीतच मी सर्किट हाऊसवर पोहोचलो आणि बाईसाहेब आपलीच वाट पहात आहेत ह्या रखवालदाराच्या आवाजाने भानावर आलो. त्याच वेळी मंजूळ आवाज आला. या आत या त्या मधाळ आवाजाच्या स्वामिनीला पाहण्याची उत्सुकता ताणली गेली आता मात्र मिट्ट अंधार नकोसा वाटत होता. त्याच वेळी माझी पावले आवाजाच्या दिशेने वळली आणि मी आपोआप दिवाणखान्यात पोहोचला. त्या अंधारात काहीच दिसत नव्हते तेवढ्यात पिवळसर प्रकाशाने खोली उजळून निघाली तेव्हा लक्षात आले आपण दिवाणखान्यात पोहचलोत. मेणबत्तीच्या पिवळसर प्रकाशात ती तरुणी हसऱ्या चेहऱ्याने समोर उभी होती. तिच्याा आवाजापेक्षाही तिचा चेहरा सुंदर होता. डोळ्यात लाघवी भाव होते आणि सौंदर्यात एक मार्दव होते.

**“मानसी आयुष्यात आल्यानंतर माझे जगणे असह्य होणार आहे ह्याची मला पुसटशी कल्पना नव्हती. हे नाते नाजूक बंधनात गुंफले जाणार आहे हे कुठ ठाऊक होत !”**

“या बसा ना” ह्या शब्दांनी दिवाणखान्याची शांतता भंग पावली. “लाईट गेली ना” मी म्हटले. असा

पाऊस कोसळायला लागला की विजेचा लपंडाव सुरू होतो. "आपली ओळख नसताना मी बोलावणे पाठविले त्याने अस्वस्थ झालात काय ?" माझ्याकडे पहात ती म्हणाली, "नाही तसे नाही पण एक अनोळखी तरूणी ... ?" मी पुढचे वाक्य अर्धवट सोडले. मला काय म्हणायचे ते तिच्या लक्षात आले. एक तरुणी आपल्याला भेटायला आली ह्या विचाराने डोळ्यासमोर उद्याची सुंदर सकाळ दिसू लागली आणि मी खश झालो. पावसाचा गारवा वातावतणात होताच, त्यात मातीच्या मृद्गंधाने मन वेडावले. ह्या गावची माती, माणसे ह्यांच्या बंधनात अडकून मी कायमचा गाववाला झालो. मला शहरात राहणे पसंत नव्हते. त्या सिमेंटच्या जंगलातली माणसे मात्र कठोर हृदयाची असतात असे वाटते.

ह्या विचाराच्या तंद्रीतून तिच्या मंजुळ स्वराने माझी तंद्री भंग पावली. त्या मधाळ स्वराच्या तरुणीने म्हटले आपण या गावात जास्त शिकलेले सुशिक्षित व्यक्ती आहात असे मला कळले. मी शहरातून गाव जवळून पाहायला आलेय, मी उद्याच गाव पहावा म्हणतेय. मला तिथून लवकरात लवकर बाहेर पडायचे होते. त्यामुळे मी लगेच होकार दिला. घरी आल्यावर ह्या प्रसंगाचा विचार करू लागलो. शहर सोडून ही तरुणी गाव का पहायला आलीय. गावात ऐतिहासिक किंवा पुराणकालीन वास्तू पाहण्यासारखे काहीच नव्हते मग ती या गावात येऊन का थडकली ? काही लोक गाव पहायला येतात पण इथली धूळ-माती-शेण यांनी नाक मुरडतात. मग ही का बरे आली असेल ?

पण दुसऱ्या दिवशी मी उजाडताच लवकर उठलो. तशी रात्र अस्वस्थतेत गेली. बाहेर पडलो तर एवाद्या नव्या नवती सारखे गाव न्हाऊन निघाले होते. ते सौंदर्य पाहण्यासाठी चालत राहिलो. मंद मंद



झुळकीने ओलेत्याचा गंध लहरत होता. सूर्य मात्र आपला घुंगट हळूच उचलणार होता. त्याचे ते सोनेरी केसरी सौंदर्य पाहावेसे वाटत होते. बळीराजाच्या चेहऱ्यावर मात्र आपल्या मुलीला सुखी घरात नांदायला पाठविल्याचा आनंद दिसत होता. गाव निरखताना आपोआप सर्किट हाऊसपर्यंत पोहोचलो तर ती तयार होऊन माझी वाट पहात होती. मी तिला म्हटले, " गावात रिक्षा किंवा गाडी नाही. आपल्याला पायी चालत गाव पालथे घालावे लागेल. आम्ही चालण्यास सुरुवात केली तर तिने आपली ओळख करून दिली. रात्री करून दिली नव्हती आता सांगते माझे नाव मानसी पण तुम्ही मला इथे कां आलीस हा प्रश्न विचारला नाहीत," इथे कितीतरी हौशी लोक गाव पहायला येतात त्यातल्याच तुम्ही एक असे मला वाटले . मी वाक्य पूर्ण केले.

मानसी आयुष्यात आल्यानंतर माझे जगणे असह्य होणार आहे ह्याची मला पुसटशी कल्पना नव्हती. हे नाते नाजूक बंधनात गुंफले जाणार आहे हे कुठ ठाऊक होत ! त्या दिवसापासून रोजच गाव पहाणे त्यातल्या गावकऱ्यांच्या अडचणी, विकास होण्यासाठी



करावा लागणारा पाठपुरावा ह्या सगळ्या गोष्टींचा अभ्यास सुरू झाला त्यावर तिचे लेखन सुरू होते. असेच एक दिवस आम्ही गावच्या कट्ट्यावर बसलो होतो. गावात शांतता होती तेव्हा तिने म्हटले, "मनोहर, तुझ्याबद्दल काहीं सांगितले नाहीस. आता आपण तेवढे जवळ नक्कीच आलो आहोत आता तरी सांग, काय सांगू माझे वडील ह्या गावात डॉक्टर होते. वडिलोपार्जित शेतजमीन आहे ती कसायला दिली आहे. काही वर्षांपूर्वी गावात महामारी आली त्यानं कित्येकांचे प्राण वाचविले. आईने त्यांना मदत केली. रोग्यांवर उपचार करता करता त्यांचा ध्यास या महामारीने घेतला पण पुढे मी या गावातच राहिलो." मानसी माझी कर्मकहाणी एवढीच पण तुझ्याबद्दल मला ऐकायला आवडेल.

मानसी बोलू लागली, "तुमचे आई-वडील कोण होते ते तुला माहीते होते त्यांचा मृत्यू कसा झाला तेही समजले पण माझ्या आईला कोड होते ती गावाच्या बाहेर आश्रमात रहात होती. कुटुंब आणि समाजाने तिला नाकारले, त्यातच काही गावगुंडांनी तिच्यावर बलात्कार केला. त्यातून माझा जन्म झाला. समाजाने माझी दुर्दशा करू नये म्हणून तिने मला गावापासून लांब अनाथाश्रमात ठेवले. पण दूर ठेवण्याने भूतकाळ बदलत नाही. तो पाठलाग करीत असतो. आजही मी त्यापासून लांब पळण्याचा प्रयत्न करतो. पुढे आई मानसिक रुग्ण झाली." हे सांगताना मानसीच्या गालावर अश्रू ओघळू लागले. थोड्या वेळाने शांत झाल्यावर तिने माझा हात घट्ट पकडला आणि म्हणाली, चला जाऊ या.

रोजच्या वागण्याने सलगी व आसक्ती वाढू लागली आणि दोघे कधी जवळ आलो ते कळलेच नाही. एक दिवस तिने अचानक म्हटले, "मनोहर चला माझ्याबरोबर लंडनला." तसे मीच तिला म्हटले, "मानसी, खरे तर मी तुला गावात राहण्यास सांगणार होतो. आपण दोघे मिळून इथे आनंदाने संसार करू या!"

बिल्कूल नाही माझा प्रबंध पूर्ण होत आलाय, तो लंडनच्या विद्यापीठात सादर करायचाय. आता मला जाण्याची घाई आहे. तुम्हीच चला लंडनला माझ्याबरोबर आणि तिने माझा निरोप घेऊन ती सर्किट हाऊसच्या दिशेने चालू लागली.

दुसऱ्या दिवशी काही करून तिला थांबवायचे ह्या विचाराने ही सर्किट हाऊसवर पोहोचलो. पण मला पाहताच रखवालदार म्हणाला, बाईसाहेब पहाटेच निघून गेल्या. त्यांना रात्रीची फ्लाईट होती. हे ऐकल्यावर माझ्या पायाखालची जमीन सरकली. असेच जायचे होते तर ती गावात का आली, माझ्यावर का जीव लावला, आपले सर्वस्व मला दऊन गेली. प्रेमबंधाचे रेशमी नाते निर्माण केले. तिचे जाणे मला अचानक बसलेला धक्काच होता.

देवाने माणसांना मन दिलंय आणि कालांतराने विस्मृतीचे वरदान दिलंय. जसजसे दिवस गेले तसतसे तिच्या आठवणी धूसर होत चालल्या आणि माझे जगणे पूर्वपदावर आले जसे ती आली आणि तिने जिंकले.

रात्रीचे साधारण दोन वाजायला आले होते चंद्रप्रकाश धूसर दिसत होता. तेवढ्यात दारावर टक-टक झाली आणि रखवालदारांचा आवाज आला, साहेब तुमचा फोन आहे. मी घाईघाईने दार उघडले तर तो धावत आल्याने त्याला धाप लागली होती. मला पाहून म्हणाला परदेशातून बाईसाहेबांचा फोन आला होता, तुमच्याशी बोलायचे आहे. परत फोन करणार आहेत तुम्ही सर्किट हाऊसवर येऊन थांबा. आणि तो निरोप देऊन निघून गेला. मी दार ओढून घेतले आणि त्याच्या पाठोपाठ सर्किट हाऊसकडे निघालो.



माझे हृदय धगधगत होते. त्याच स्थितीत फोनजवळ पोहचलो, त्याचवेळेस फोनची बेल खणखणली. समोरून तिचा मंजूळ आवाज आला, "मनोहर, कसे आहात? तुम्हांला थोडा त्रास देणार आहे. फक्त एकदाच मला भेटायला या तुमचे विमानाचे तिकीट पाठविते आहे." लवकरच मिळेल माझ्याकडे फार थोडा वेळ आहे. तुम्हांला जास्त थांबवणार नाही. इथले काम झाले की तुम्ही परत जा. काही बोलत का नाही मनोहर? काय बोलू बोलण्यासारखे काही शिल्लक आहे का? तू बोलावले म्हणजे येणे भाग आहे. माझा कडवटपणा क्षणात नाहीसा झाला. मी तिथे का येऊ? एवढे महत्त्वाचे कोणते काम आहे? हे प्रश्न विचारताच मी लंडनला जाऊन पोहाचलो.

तिचा माणूस एअरपोर्टवर मला घ्यायला आला होता. मी दरवाजात पोहोचलो. पावलांच्या चालीवरून तिने मला ओळखले आणि दरवाजा उघडा आहे आत या दारासमोरच व्हीलचेअरवर हाडांचा सापळा डोक्याला केस नसलेली स्त्री बसली होती. मी निरखून तिच्याकडे पाहिले तर आवाज ओळखीचा होता म्हणून जवळ गेलो तर ती मानसी होती. मला कुणीतरी उंचावरून ढकलल्यासारखे वाटले. मला भेटलेली सुंदर मानसी नव्हतीच ती. मला पाहून तिच्या डोळ्यात पाणी तरारले. काय गं ही तुझी दुर्दशा. "आल्यासारखा आराम कर मग सविस्तर तुला सांगते." मी जरा स्थिरावल्यावर तिने बोलण्यास सरुवात केली, "मी चार पाच वर्षं ह्या कॅन्सरशी झुंज देते आहे. मोठ-मोठे डॉक्टर झाले. तुमचा गावी येण्याआधीपासूनच डॉक्टर म्हणाले मी जगात जास्त काळ राहू शकणार नाही. ती वेळ जवळ आलीय. या जगाचा निरोप घेण्याची. मृत्यूने मला गाठण्याआधी मला असे काही करायचे होते की माझ्यासाठी खऱ्या प्रेमाचे दोन अश्रू ढाळले, ते प्रेम निःस्वार्थी असेल, ते मला तुमच्या गावाने आणि तुझ्याकडून मिळाले. आयुष्यभर माझी माणसे, माझा गाव, माझे घर या भोवती मी घोटाळत होते. ते गावाच्या, तुमच्या रूपाने मला मिळाले. तुझ्याबद्दल माझ्या मनात लालसा निर्माण झाली आणि माझ्या प्रेमाने तुला जिंकून घेतले. एवढे बोलल्याने मानसीला धाप

लागली आणि ती घामाने निथळू लागली. मी जवळ जाऊन नॅपकीनने मोठ्या प्रेमाने घाम पुसला. त्या स्पर्शाने मला खऱ्या प्रेमाची अनुभूती झाली कारण कोणतीही वासना नव्हती. ती पुढे म्हणाली, म्हणूनच तू लग्नाची मागणी घातलीस तेव्हा मी नकार दिला. त्याचा तुला राग आला हे मला कळले पण मला तुझे आयुष्य दु:खी करायचे नव्हते. पण आज मला कळले की माझ्यासाठी रडणारे कुणीतरी आहे. आता मी आनंदाने मृत्यूला सामोरी जाईन. "मनोहर माझा गावावरील प्रबंध निवडला गेलाय, तुमच्या गावाला विकासासाठी अनुदान मिळालेय, त्याचा चेक तयार आहे, तो फक्त घेऊन ये तसे मी त्यांना कळवलेय."तिच्या ह्या बोलण्याने मला सगळी उत्तरे मिळाली. त्यानंतर एका आठवड्याने तिचा मृत्यू झाला. ह्यावेळेस मात्र मानसीच्या मृत्यूने माझे अंत:करण हळहळले, ती माझी कुणी नव्हती तरी माझे सर्वस्व होती.

तिच्या मृत्यूनंतर ती माझ्या मनात आठवणींच्या रूपाने बहरत राहिली. तिच्या जगण्याने कोणतेही नाते, प्रेम नकारात्मक नसते हे कळले. मला जगण्यातला अर्थ कळला. मी तिच्या मृत्यूने पोटभरून रडून घेतले. माझ्या रडण्याने तिचा आत्मा नक्कीच शांत झाला असेल. तिने एकटीने कॅन्सरशी लढा दिला. त्यातही तिने प्रबंध सादर करून पीएचडी मिळविली.आपल्या जीवनात आपण एकटे नसून आपल्याबरोबर आपल्यावर प्रेम करणारे कुणीतरी आहे. माझा गाव माझी माणसं ती आपल्याबरोबर घेऊन गेली. ती एका जिद्दीने जगली, ते फक्त माझं गाव माझी माणसं!

### -: पसंती :-

मनोरमा तिच्या नवऱ्याने आणलेली भाजी पाहून अगदी वैतागून म्हणाली शी ! "काय भाजी आणली आहे" ? बटाटे कवकवीत आहेत,वांगी खराब आहेत .टोमॅटो जास्त पिकलेले आहेत,पालेभाजी सडलेली आहे, शेंगा जून आहेत...तुम्ही जे काही पसंत करून आणता ते नेहमी "नासके,कुसके ,खराब असते" हे ऐकुन तिचा पती एकवार तिच्याकडे कटाक्ष टाकून म्हणाला, "खरे आहे तुलाही मी पसंद करून आणले होते".

### -: पाऊस :-

खूप पाऊस पडत होता म्हणून एक मोलकरीण मालकिणीचा रेनकोट घालून रस्त्याने निघाली होती.एवढ्यात मालकिणीची कार समोरून आली.तिने विचारले , "काय गं ,आशा माझा रेनकोट का घातलास"? त्यावर आशा हसत हसत म्हणाली ,"तुमची भारीतली साडी खराब होवू नये म्हणुन घातलाय बाईसाहेब".

**- अर्चना अशोक परब**

### -: कांदाभजी :-

गिऱ्हाईक : कांदाभजी द्या! हॉटेल मालक : ही घ्या भजी.,गिऱ्हाईक : अहो मालक ही कोणती भजी दिलीत.
मालक : काय म्हणालात, ही तर कांदा भजीच आहे.गिऱ्हाईक : भजीमध्ये कांदा कुठे आहे?
मालक : शंकरपाळीमध्ये शंकर असतो काय?,
गुलाबजामुनमध्ये गुलाब असतो काय? तसेच यामध्ये कांदा कुठून येणार?

*With best compliments from*



# OMKAR
# Construction

**Prop. Rajesh Patil**

# बडबड

**- नि. श. गुळवणी**


स्थळ : स्वर्गातील सृष्टिकर्ता ब्रम्हदेवाचा दिवाणखाना. ग्रेट भेटमध्ये नारदमूनी थेट सृष्टिकर्त्याची मुलाखत घ्यायला त्यांची वीणा सरसावून सिध्द झाले आहेत. इकडच्या-तिकडच्या अमृतपाण्याच्या, सत्य आणि उग्र तपश्चर्येच्या गोष्टी झाल्यानंतर मुनींनी थेट मुद्याला हात घालताना मानव नावाच्या मर्त्य, द्विपाद प्राण्याविषयी छेडले आणि ब्रम्हदेव उत्तरले : "मुनीवर तसा हा द्विपाद प्राणी बनवताना आमच्या रचनाकार देवमंडळींनी बऱ्यापैकी काळजी घेतली. फक्त त्याची जिव्हा बनवताना रचनाकारांनी थोडे हस्त आखडायला हवे होते, असं आता वाटू लागलंय. फारच बडबड करतात हो हे द्विपाद प्राणी."

कोलाहल! अखंड बडबड!! प्रत्यक्ष सृष्टिकर्त्यालाही कपाळावर हात मारायला भाग पाडू शकतील अशी अखंड बडबड करणारी माणसं या ग्रहावर पावलोपावली भेटतात. ही माणसं जागेपणी किंचितही फट न राखू देता भोवतालच्या तोंड पडलेल्या मंडळींना ऐकवत तर राहतातच परंतु झोपेतही दिवसभराच्या बडबडीची उजळणी करताना नाइलाजाने बाजूला कानात बोटं घालून झोपेची आराधना करणाऱ्यांना अगदी नको जीव करून सोडतात. आता निदान स्मशानात तरी चार घटका गप्प उभे राहतील? - पण नाही. तिथंही यांची 'जाण्यापूर्वी यानं माझे पैसे चुकते केले असते तर बरं झालं असतं' ही कुजबूज सुरूच असते. या महाभागानं कधी शास्त्रज्ञाधिशास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन भेटले असते तरीही भारावून जात. त्यांच्याकडून सृष्टीचे नियम समजावून घेण्याचा प्रयत्न न करता आपलंच एखादं बढतीपुराण किंवा अमुकला कशी अक्कल नाही हे हातवारे करीत अल्बर्टना ऐकवत राहिले असते. आमच्या गल्लीतल्या गीतानं भगवद्गीतेतल्या चार ओळी वाचून आजूबाजूच्या गाफील बायकांचं स्वतः सुदर्शन घेऊन कुरुक्षेत्रावर उभं असल्याच्या थाटात चार तास बौध्दिक घेतलं. सवय. दुसरं काय? बरं अशा बडबड्यांना प्रश्नही विचारायची सोय नसते. एकतर तुम्हांला तरी संधी मिळणंच कठीण असतं आणि यदाकदाचित तुमचा प्रश्न त्यांच्या कानापर्यंत पोहोचलाच तर त्यातलाच एखादा शब्द ढेकूण सापडल्याच्या आनंदात शोधून काढून लागलीच विषयांतर करीत त्या दिशेने लांबपल्ल्याची शर्यत सुरू करतात. यांच्या पंचवीस ग्रॅम वजनाच्या जिभेची इतरांना भंडावून सोडायची ताकद पंचवीस अणुबॉम्बइतकी भरते. आमचा बाळू कुलकर्णी बँकेत

> **"कावळा बसायला अन् फांदी मोडायला गाठ पडली खरी पण तेवढ्या भांडवलावर सोमेश्वर भटजीला गावकऱ्यांनी चमत्कारी बापूसाहेब करून टाकला."**



कनिष्ठ कारकून आहे पण तो रिझर्व्ह बँकेचा गर्व्हनर असल्याच्या थाटात चारचौघांचं देशाच्या आर्थिक घडीबद्दल बौध्दिक घेत असतो. आता घोटवडेमास्तर फळ्यापुढे इतिहास शिकवितात ते ठीक झालं परंतु वर्गाबाहेर सारे वीरपरुष त्यांच्या परसात गोट्या खेळायला जमत असल्याच्या थाटात त्यांच्या कल्पोल कल्पित चुकांचा पाढा वाचून श्रोत्यांना भंडावून सोडत राहतात. बरं त्यांना टाळताही येत नाही. पोरं नापास व्हायची भीती. ते श्रोतेही असे निवडतात की त्यांना ते सारं ऐकण्यावाचून गत्यंतर नसतं. मतादानादिवशी झोपा काढणाऱ्या बॉसचे सदानंदला राजकीय अस्थिरता, अराजकता आणि अशाच 'अ'कारान्त विषयावरील अत्यंत फालतू वाटावेत असे (असं बाकी त्याचं गुप्त मत आहे - उघड नाही) विचार मान डोलवत तास-न्-तास ऐकावे लागतात. काही बडबडे महाभारतापासून ते थेट पंचवार्षिक योजनेपर्यंत कोणत्याही विषयावर यथेच्छ थापा मारीत राहतात. भविष्याविषयी वारेमाप गप्पा मारणारी मंडळी पैशाला पासरी भेटतात तर अगामी घटनांचा अचूक अंदाज वर्तविण्यात त्यांचा हातखंडा असल्याचं छातीठोकपणे सांगणारी मंडळीही नको जीव करून सोडतात. मागल्या-पुढल्या जन्माच्या आख्यायिका सांगणारा पिठाची गिरणी चालवणारा भालेराव या जन्मात असा फाटक्या विजारी घालून फिरतो कसा असा प्रश्न कैकांनी जिभेवरून पडजिभेत ढकललाय. पंचक्रोशीत तो एकटा गिरण चालवीत असल्याने पिठाकरिता का होईना ते सारेजण भालेरावचं निमूटपणे ऐकत राहतात.



अशा या साऱ्या महाभागांमध्ये आपल्याला दैवी साक्षात्कार होत असतात, असं वारंवार ठासून सांगणाऱ्या मंडळींचाही मोठा भरणा आहे आणि त्यांचा महानायक वाटावा असा आहे देवळातला पुजारी सोमेश्वर गायतोंडे. परवाचीच गोष्ट, वीजबोर्डात खर्डेघाशी करताना (वीजबोर्डातील काम हा त्याचा साईड बिझिनेस आहे) तो एकाएकी फाईल बंद करीत हसू लागला.

"बापूसाहेबांना वेड लागलं वाटतं," पाठीमागे मानेशिपाई राणेशिपायाच्या कानात.

"देवाला कौल दिला," हसत हसत सोमेश्वर ऊर्फ बापूसाहेब गरजले. सांगकामेबाई मोठ्या रजेवर जाणार. खडूस सांगकामेबाई या बॉसच्या हुकूमशाहीनं त्या साऱ्यांना त्राही भगवान करून सोडलं असल्याने त्या बातमीने ते लागलेच बापूसाबांभोवती गोळा झाले.

"बापूसाहेब, देवाचा कौल मिळाला का?" पीडित कारकून कारेकर कसाबसा म्हणाला. एखाद्या कारकुनाची अधिकाधिक खरडपट्टी काढण्याची मोजपट्टी उपलब्ध असती तर त्याचं विश्वरेकॉर्ड

कारेकरच्या नावावर जमा झालं असतं.

"सांगतो, सकाळीच मी कौल लावला होता. आणि आताच मला साक्षात्कार झाला. परमेश्वरानं सांगकामेबाईच्या दीर्घ रजेची व्यवस्था केली आहे.. परमेश्वरावर विश्वास ठेवा त्याच्या काठीला..." आणि मग ते आख्यान बापूसाहेबांनी लावलं. मध्येच कोणीतरी, "सांगकामेबाई परमेश्वराचं ऐकतील?" अशी शंका उपस्थित करण्याचा प्रयत्न केला परंतु ब्रम्हानंदी टाळी लागल्याच्या छापात बापूसाहेब बोलतच राहिले. अखेर बाहेरून उशिरा आलेल्या सांगकामेबाईंच्या, भरभक्कम आवाजानं अश्रुधूर केल्याच्या थाटात ते सारे पांगले.

बापूसाहेबांचा जन्म दुसऱ्यांना काही ना काहीतर ऐकवत राहण्यासाठीच (फक्त सांगकामेबाई सोडून) झाला असल्याचं सर्वांचे मत आहे. रोज ते भारताच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक वाक्यं फेकीत असावेत असं परिचितांना वाटतं. त्यांच्या अखंड बडबडीतून फट शोधून त्यांना इतकं सारं सुचतं कसं हे विचारायला बंडोपंतांना दोन दिवस वाट पाहावी लागली म्हणतात.

"सारी त्याची कृपा दुसरं काय?" आकाशाकडे निर्देश करीत बापूसाहेब म्हणाले. "त्यानंच द्रौपदीला अखंड साड्या पुरविल्या आणि तोच मला अखंड शब्द पुरवितो." आणि तिथून पुढे द्रौपदी, श्रीकृष्ण आणि मी हे आख्यान बापूसाहेबांनी लावलं.

बापूसाहेबांच्या एके-४७ च्या थाटात मुखातून होणाऱ्या शब्दफेकीचाही मोठा इतिहास आहे. त्यांच्या ह्या दैवी गुणाची सुरुवात (ते त्यांच्या बडबडीला दैवी गूण समजतात) मातेच्या उदरात झाल्याचं त्यांनी स्वतः कैकवेळी दोन-दोन तासांचं बौध्दिक घेऊन गाफील श्रोत्यांना ऐकवलंय. जगात स्वतःच्याच मातेच्या उदरातील वास्तव्याविषयी इतकं कधी कोणी भाष्य केलं नसावं. ऐकणाऱ्यांचा समज ते सहलीला तिथं गेले असावेत असा व्हावा. हे चमत्कारिक बालक उदरात शिवलीलामृत, रामरक्षा आणखी काय-बाय म्हणत असल्याचं त्या अर्भकाच्या मातोश्री येता-जाता ऐकवत राहिल्यानं जन्माला आल्यानंतर कवच-कुंडलांसारख्या दिव्य आयुधांसह हे दिव्य बालक जन्माला येणार की काय अशी सर्वांना उत्सुकता होती. परंतु तसं काही न घडता अखंड वळवळणारी दोन ग्रॅमची जीभ घशाला लटकवून ते जन्माला आलं आणि पुढे त्यानं अक्षरशः शाब्दिक हलकल्लोळ मांडला. बाळाचे बोबडे बोल ऐकून लोक कंटाळू लागले. आधीच चमत्कारिक बालक हे लेबल घरच्यांनी लावल्याने त्यांना त्याच्या बोबड्या बोलांमध्ये ज्ञानेश्वरीवरील समीक्षेचा साक्षात्कार होऊ लागला. भाबडे खेडूत त्याचे पाय धरू लागले आणि बालक त्यांचे कान ओढू लागलं.

सुरुवातीला हातवातरे करीत त्याच्यातल्या चमत्कार, साक्षात्कार आदी त्कारांविषयी बोलणारी घरची मंडळी शाळेतल्या पेपरांमध्ये त्यानं उधळलेले मोती पाहून चिडीचूप होत आणि मग तो स्वतःच त्याच्यातल्या दिव्यत्वाच्या खरोखरच खरं वाटाव्या अशा कहाण्या चारचौघांना गाठून ऐकवू लागला. त्याला येता- जाता दैवी साक्षात्कार होऊ लागले आणि ते सारं पोरं-टोरं तोंड आ वासून ऐकू लागली. शाळेत भूतकाळ आणि वर्तमानकाळावर घोकंपट्टी चालायची तर गुणांची पर्वा न करता हे स्वतःला आकाशी शक्तीमधून प्रेरणा प्राप्त होत असल्याच्या कहाण्या सांगणारं बालक भाकितं आणि भविष्याविषयी काय ते बोलत राहायचं.

दिव्य -गणतंत्र दिवस, स्थळ-शाळेचा सांस्कृतिक मंच. माईक सोमूच्या हाताला लागला आणि मग काय विचारता? इतिहासात कठावर पास झालेल्या त्या वारभर उंचीच्या बालकानं देशाच्या

भविष्याबद्दल प्रमुख पाहुण्यांसकट साऱ्या गुरुजनांचे तासभर बौध्दिक घेतलं. त्यानं श्रोत्यांना विचारांच्या 'रोलर कोस्टर मधून' असं काही गरागरा फिरवलं की बस्स ग्रामपंचायीतीच्या तुंबलेल्या गटारीपासून ते थेट पृथ्वीच्या विनाशापर्यंत मिनिटागणिक विषय बदलीत तुफान मेलच्या थाटात बोलत सुटला. शेवटी माईक बंद करून तो धबधबा रोखण्यात आला.

त्याला हे इतकं सारं सुचतं कसं हे इतरांना न उलगडलेलं कोडं आहे. कोणत्याही विषयावरील चर्चेत घुसून तो शेवटी भविष्य आणि चमत्कारांकडे सरकत सूत्रं हातात घेतोच.



वाढत्या उंचीबरोबर ते सारं अधिकच वाढत राहिलं. निळ्या कामधेनूचा साक्षात्कार, अश्वत्थाम्याची त्यानं घेतलेली मुलाखत-अर्थात स्वप्नात, आफ्रिकेतील एका गुहेतून येऊ घातलेला त्यानं पाहिलेला प्रलय - अशा साऱ्या रंजित कथा तो सहजगत्या ऐकवत राहिला.

पोराच्या अगाध लीलांना कंटाळून वडील वारले आणि गावच्या देवळाची पूजा-अर्चा सोमूच्या ताब्यात आली. आता तो भक्तगणांना देवांच्या स्तोत्राबरोबरच स्वतःचं पुराणही ऐकवू लागला. तो त्याच्या अखंड वळवळणाऱ्या जिभेच्या जोरावर त्याच्या आणि सकल देवगणांच्या घनिष्ठ संबंधाविषयीच्या गोष्टी सहजगत्या खपवू लागला. त्याची स्वर्गात ऊठ-बस वाढली अर्थात डोळे मिटलेलं धड चटईवर अन् त्याचा आत्मा म्हणे स्वर्गात अमृत महोत्सवाला हजेरी लावायला गेलेला. लोकही त्याला टरकून राहू लागले. गावावर संकट कोसळणार असल्याचं त्यानं आकाशस्थ ताकदींचा हवाला देत गाफील श्रोत्यांना ऐकवलं आणि भूकंप झाला. कावळा बसायला अन् फांदी मोडायला गाठ पडली खरी पण तेवढ्या भांडवलावर सोमेश्वर भटजीला गावकऱ्यांनी चमत्कारी बापूसाहेब करून टाकला. आता त्याच्या कहाण्यांना अधिक धार येऊ लागली.

दर्शनाला आलेल्या साखर कारखान्याच्या चेअरमनला प्रत्यक्ष दत्तमहाराजांनी त्याला दिलेले स्पेशल केळं प्रसाद देताना प्रतिस्पर्ध्याचं डिपॉझिटही जप्त होईल असा राजकीय आशीर्वाद आपल्या चरणावर त्याची टोपी घासत देऊन टाकला. खरंतर चेअरमनच्या मागं उभ्या हातात कडा घातलेल्या धाकड पैलवानाकडे अन् त्याच्या आवेशाकडे पाहूनच गांगरून जात त्यानं तो आशीर्वाद देऊ केला होता. चेअरमन जिंकला आणि प्रसादाच्या केळाला जागून त्याला वीजबोर्डात चिकटवला.

बापूसाहेबांनी स्वतःच्या लग्नात साशंक सासूरवाडीच्या लोकांना स्वतःला येता-जाता होणाऱ्या दृष्टांताविषयी मुहूर्ताच्या वेळेची पर्वा न करता कथन करायला सुरुवात केली आणि तिथंच त्यांच्या वाग्दत्त वधूने- मायावतीने त्याचं ते भूत उतरवायचा निश्चय केला. मायाला त्याचं ते तसं तिच्या माहेरच्या मंडळीना ताटकळत उभे करत बौध्दिक घेतलेलं मुळीच खपलं नव्हतं आणि अंतरपाटावर उभे राहतानाच तिनं पलीकडे उभ्या तिच्या होऊ घातलेल्या नवऱ्याचं भूत उतरवायचा निश्चय केला. ति तिच्या मांत्रिक मामाची पट्टशिष्या होती.

जोडी देवदर्शनाला गेली आणि मायानं आपलं मायाजाळ विणायला सुरुवात केली. घरात चमत्कारिक वस्तू सापडू लागल्या. एक दिवस बापूसाहेबांनी देवळात नारळाच्या जागी बटव्यातून चक्क कवटी काढली आणि भक्तगण हादरले. बापूलाही दरदरून घाम फुटला आणि आयुष्यात प्रथमच त्याची बोलती बंद झाली. इतरांना सततच्या दैवी चमत्कारांच्या कहाण्या सांगणारा बापू त्या कवटीपुढे हतबल झाला. खोट्यानं खोट्याचा काटा काढला आणि बापूचे चमत्कार खिशात अन् आसपास लिंबू-मिरची सारख्या सापडणाऱ्या वस्तूंनी बंद पडले.

बापू आता एक सरळसाधा, सरळमार्गी कारकून आहे. तो हल्ली कमी बोलतो आणि अधिक ऐकतो. तो निमूटपणे मायाची बडबड ऐकतो आणि तिच्या इशाऱ्यावर नाचतो. पोरं झाली आणि मायानं त्याला चांगलाच संसारगाड्याला जुंपला. त्याच्या बडबडीच्या जाचातून मुक्तता मिळाल्याने लोकही खश होते. बापूच्या कानावर कधी नव्हे ते दुसऱ्यांचे शब्द पडू लागले आणि लोकांनाही अक्कल असते याचा त्याला साक्षात्कार होऊ लागला. त्याच्या जिभेने त्याच्याभोवती उभा केलेला फसवा शब्दांचा महाल गळून पडला आणि त्याला त्याची खरी ओळख होऊ लागली. ऐकण्यानं त्याच्या ज्ञानात भरही पडू लागली. तो वाचूही लागला आणि वाचनानं त्याचं जीवनच बदलू लागलं. तो मोजकंच पण विचारान्ती बोलू लागला आणि श्रोतेही ऐकताना मनापासून दाद देऊ लागले. त्याला कोणी चमत्कारांविषयी छेडले असता आता तो फक्त 'कसलं काय अन् कसलं काय ?' असं म्हणत अंतर्मुख होतो.

## विनोद

### १. शिक्षक

शिक्षक : सांगा पाहू, विद्यार्थी आणि डॉक्टर यांच्यामध्ये काय साम्य आहे ?

हात वर करून बंड्या सांगतो : 'सर, ऑपरेशन झाल्यावर डॉक्टर आणि पेपर झाल्यावर विद्यार्थी एकच सांगतात.'

शिक्षक : काय ते ?

बंड्या : आम्ही आमच्या परीने चांगले प्रयत्न केले, पण आत्ताच काही सांगू शकत नाही.

### २. आजचा उपदेश

जर कोणी आपल्याला पाहून दरवाजा बंद केला, तर...

आपण पण त्याला दाखवून द्यायचं की, दरवाजाला 'दोन' कड्या असतात...

**- ओमनी फीचर्स**

*With best compliments from*



# Ankit Construction

# स्त्री मुक्ती !

- लता लिलाधर बोरोले

प्रत्येक ठिकाणी एक समाजरचना असते आणि समाजव्यवस्था असते. ही समाजव्यवस्था वर्षानुवर्षे चालत आलेली असते. त्यात काळानुरूप फारसा बदल होत नसतो. पण खरं म्हणजे काळानुरूप समाजात बदल व्हायला हवा. समाजालाही त्यात बदल हवा असतो पण समाजच हा बदल स्वीकारायलाही तयार नसतो. भारतीय समाजव्यवस्था ही चार वर्णात विभागली गेली. व्यवसायावरून वा कामावरून ही विभागणी झाली. पण हळूहळू समाज वर्णव्यवस्थेच्या आहारी गेला व त्यातून जातिभेद निर्माण झाले. समाजाकडून समाजावर अन्याय व अत्याचार होऊ लागला. अस्पृश्य समाजाची अधोगती झाली ती यामुळेच. शिक्षण , पैसा, उदरनिर्वाहाच्या व उत्पन्नाच्या साधनांची कमतरता यामुळे या समाजाची कोणतीही प्रगती झाली नाही. या जातिभेदाबरोबर आणि दोन प्रमुख जाती आजही आहेत, त्या म्हणजे एक स्त्री व दुसरा पुरूष. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात स्त्री ही हीन दर्जाची आहे. कमी प्रतीची आहे, अकार्यक्षम आहे, अबला आहे हे ठरवूनच टाकलेले आहे. पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे. कुटुंबात महत्त्वाचा घटक आहे हे पुरुषप्रधान संस्कृतीने ठरवूनच टाकले आहे. मुळातच पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या पुरुषी अहंकाराने तर या गोष्टीला अधिकच दुजोरा दिला. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषानेच आपले एवढे वर्चस्व प्रस्थापित केले की कुठल्याही समाजाच्या क्षेत्रात स्त्रीला डोकावणे अशक्य होऊन बसले.


पुरुषच स्त्रीपेक्षा श्रेष्ठ कसा? याला कारण कित्येक वर्षांपूर्वी लिहिला गेलेले 'मनुस्मृती' या ग्रंथातील लिखाण होय. 'स्त्री' ला या ग्रंथात खूपच अवमानित केलेले आहे. कितीही अन्याय झाला तरी तो स्त्रीने सहन केला पाहिजे. पती कितीही वाममार्गाने चालणारा असला, वाईट संगतीचा असला, कर्तृत्वशून्य असला तरी स्त्रीने त्याची पूजा करावी. स्त्री शक्तिमान नाही, परावलंबी आहे, ग्रंथातील या व अशा लिखाणामुळे समाजाचा असा गैरसमज निर्माण झाला की स्त्री ही शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्टया कमकुवत आहे, प्रतिकारहीन आहे. हा गैरसमज समाजात एवढा दृढमूल झाला की आज एवढी वर्षे होऊनही तो समाजाला जाणवला नाही. या पुरुषप्रधान संस्कृतीने पहिला दंडक घातला तो म्हणजे स्त्रीने घरचा उंबरा ओलांडता कामा नये. 'चूल आणि मूल' हेच कार्यक्षेत्र ठरविण्यात आले. शिक्षणापासून तिला वंचित ठेवण्यात आले. 'चूल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र समाजाने ठरविताना समाज इतक्या पराकोटीला पोहोचला की 'स्त्री' एक माणूस आहे हेच समाज विसरला. 'स्वयंपाकीण 'अशी तिची अवस्था समाजाने ठरवून टाकली. स्त्रीला स्वतंत्र विचार आहे हेच समाज विसरला. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जग उद्धारी!' अशा उदात्त शब्दांचा मुलामा वर दिला गेला. 'स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता आहे' असेही म्हटले गेले एवढेच नव्हेतर समाजात स्त्रीला 'देवता' म्हणून पूजले गेले. जसे आपण देव, देवता

> **"समाजात आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया चमकत आहेत.एका विदुषीने देशाचे नेतृत्वही यशस्वीपणे पार पाडले आहे."**

यांची मंदिरात पूजा करतो, पण त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे वागण्याचे, माणूसपणाचे हक्क मात्र आपण नाकारतो. आम्ही तुला नैवेद्य दाखविला तरच तू खायचा. आम्ही जेथे तुला ठेवू तेथच तू राहावे. कडीकुलपात आपण त्याला बंदिस्त करून ठेवतो. तसे माणूस म्हणून स्त्रीचे हक्क नाकारले गेले. एवढेच नव्हेतर स्त्रीचा नवरा मरण पावल्यावर तिला वाजत-गाजत नेऊन नवऱ्याच्या चितेवर जिवंत जाळणे, तिचा जगण्याचाही हक्क समाजाने नाकारला.

समाजात आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया चमकत आहेत. एका विदुषीने देशाचे नेतृत्वही यशस्वीपणे पार पाडले आहे. आज ज्या ज्या क्षेत्रात स्त्री काम करते आहे त्या त्या ठिकाणी कामाची वेळ, कामाची एकाग्रता पुरुषापेक्षा स्त्रीकडे अधिक आहे. स्त्री एकनिष्ठेने काम करते, तिची कार्यक्षमताही अधिक आहे. त्यामुळे आज कोणताही कारखाना, एखादी फॅक्टरी असो, ऑफीस असो, सरकारी कार्यालय असो सर्वच क्षेत्रात स्त्री यशस्वीपणे आपली जबाबदारी पार पाडताना दिसत आहे. आज स्त्री कलेक्टर, पायलट, शास्त्रज्ञ, डॉक्टर, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, विविध सरकारी क्षेत्रात चमकत आहेत. आज ती मोठमोठी ऑपरेशन्स करते, विमान चालवते, मोटार चालवते, युध्दात नेतृत्व करते. असे असूनही स्त्रीमुक्ती या विचाराची गरज का असावी. स्त्री स्वातंत्र म्हणजे स्त्री मुक्ती का? किंवा जेव्हा एवाद्या गोष्टीपासून स्त्रीला मुक्तता हवी असेल आणि स्वातंत्र्य हवे असते ते कशासाठी हवे असते? हाही विचार आवश्यकच आहे. केवळ जुन्या चालीरीती आहेत. म्हणून स्त्रीला दुय्यम स्थान आहे असे न मानता प्रत्येक स्त्रीने ह्यातून आपली स्वतःची भूमिका, स्वतःचे स्वातंत्र्य, स्वतःचे विचार तेवढ्याच ताकदीने समाजापुढे मांडावे. आपण आपल्या पारतंत्राला, गुलामगिरीला, बंधनातून सुटका करून घ्यावी असे जर समाजाला प्रत्येक स्त्रीला मनापासून वाटलं तर समाजात स्त्री मुक्त होईल.

अनेक समाजसुधारकांनी आपले लक्ष केंद्रित केले ते स्त्रीसुधारणेवर! प्रत्येक समाजसुधारकाच्या कार्यात स्त्रीसुधारणा, स्त्रियांना हक्क हा महत्त्वाचा भाग होता. या सर्वांच्या परिपाकातून असा विचार पुढे आला की स्त्रियांची ही स्थिती बदलली पाहिजे. समाजाच्या या अवाजवी बंधनातून स्त्रीला मुक्त केले पाहिजे. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिच्यात स्वतःचा विचार करण्याची शक्ती आहे. ती माणूस आहे. हा हक्क आणि अधिकार स्त्रीला दिला पाहिजे. जसजसा शिक्षणाचा प्रसार होऊ लागला तसतसा हा विचार समाजात सर्वत्र फैलावू लागला. स्त्री-पुरुष दोघांना समान हक्क व अधिकार आहेत. असे असताना एकाला श्रेष्ठ मानणे व दुसऱ्याला कनिष्ठ मानणे हे अन्यायाचेच लक्षण नव्हे का? स्त्री नवनिर्माण करू शकते. तिचा स्वतःचा विचार आहे. तिलाही तिच्या स्वतंत्र प्रगतीच्या वाटा चालण्याचा हक्क आहे. हेही नाकारता येत नाही.




प्रतिकूल परिस्थितीत स्तब्ध न बसता काही स्त्रियांनी या अन्यायाविरुध्द लढा दिला तो स्वतःच्या स्वतंत्र विचाराने एवढेच नव्हे तर आपल्या समान हक्कासाठी भगीरथ प्रयत्न करून त्या त्या क्षेत्रात न भूतो न भविष्यति क्रांती घडविली. भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःच्या विचाराने,



स्वकर्तृत्वाने व अतुलनीय धैर्याने देशाची धुरा यशस्वीपणे पार पाडली. डॉ. विजयालक्ष्मी पंडीत यांनी युनोच्या आमसभेचे अध्यक्षस्थान भुषवून मौलिक कार्याचा ठसा जगभर उमटविला. कॅ. लक्ष्मी स्वामीनाथन यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने, शौर्याने 'झाशीची राणी' लष्करी फलटणीची धुरा यशस्वीपणे पेलली. श्रीमती अरुंधती भट्टाचार्य या भगिनीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या २०७ वर्षाच्या इतिहासांत 'चेअरमन' पदाचा किल्ला आपल्या स्वकर्तृत्वाच्या कौशल्यावर काबीज केला आहे! श्रीमती निशा देसाई बिलवल मूळची भारतीय. शिक्षण संपल्यावर अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यात नोकरी मिळविली. अल्पकाळातच स्वतःच्या कुशाग्र बुध्दिमत्तेने या विदुषीने एवढे नेत्रदीपक यश मिळविले की त्या 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर साऊथ सेंट्रल एशिया ' या महत्त्वाच्या पदावर विराजमान झाल्या. डॉ. सुनीती सॉलोमन या वि्दुषीने मद्रास वैद्यकीय महाविद्यालयातील स्वतःची प्रॅक्टीस करून भरपूर संपत्ती मिळवू शकल्या असत्या पण त्यांनी तसे न करता महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागामार्फत भारतात 'एच. आय. व्ही' विषाणूचा आणि एड्स रोगाबाबत संशोधन सुरू केले आणि त्यातून १९८६ साली भारतातील पहिल्या एच. आय. व्ही. बाधित रुग्णाची अधिकृत नोंद करण्यात आली. देहविक्री करणाऱ्या भारतीय महिला या विषाणूच्या शिकार होतात हे सिध्द केले. एवढेच नव्हे तर १९९३ साली वाय आर जी-केअर या संस्थेची स्थापना चेन्नईत केली. भारतातील एचआयव्ही उपचारांच्या प्रणेत्या असे डॉ. सुनीती सॉलोमन यांचे कार्य असामान्य व स्वतंत्र विचारांचेच होते.

श्रीमती क्षमा सावंत या भारतात सॉफ्टवेअर इंजिनीअरची पदवी घेतल्यावर उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत गेल्या. मात्र तेथील कामगारांची हलाखीची परिस्थिती बघितल्यानंतर त्यांनी आपले ईप्सित ध्येयच बदलले. येथील समाजवादी पक्षाच्या त्या सदस्य झाल्या. स्वबळावर निवडणूक लढवून सिएटल शहराच्या सिटी कौन्सिलच्या ९७ वर्षांच्या इतिहासात प्रथमच समाजवादी पक्षाची उमेदवार म्हणून निवडून आल्या व कामगारांच्या हक्कासाठी लढा दिला. आय.ए.एस. दुर्गाशक्ती नागपाल यांनी यमुनेच्या काठी वाळूचा अवैध उपसा करणाऱ्या धटिंगणांना वठणीवर आणले. एवढेच नव्हेतर सार्वजनिक हिताच्या आड येणारे बेकायदेशीर प्रार्थनास्थळ जमीनदोस्त केले. बहुसंख्य जनतेने या विदुषीला दुवा दिला. डॉ. मंदाताई प्रकाश आमटे यांनी हेमलकसा येथे केलेले अतुलनीय सेवाकार्य! श्रीमती गोदावरी परुळेकर ह्या पुण्यातल्या एका सुखवस्तु कुटुंबातील सुशिक्षित व कर्तृत्ववान विदुषीने आपले जीवन सर्वस्व ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या उन्नतीसाठी वेचले. या व अशा अनेक स्त्रियांनी स्वतंत्र विचाराने, स्वकर्तृत्वाने, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाने अनेक कार्यांत स्वतंत्र ठसा उमटविला आहे, हेही नाकारता येत नाही.



*With best compliments from*

**सिंधूदूर्ग सहकारी पतसंस्था मर्यादित**

**अंबरनाथ**



# अबला नव्हे सबला

- चारुलता कुळकर्णी

आपली भारतीय संस्कृती जगात श्रेष्ठ मानली जाते. इथे शील, चारित्र्य, नीती, नैतिकता, प्रामाणिकपणा या शब्दांना महत्त्व आहे. महाभारत काळात द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना तिने धावा करताच कृष्ण तिच्या मदतीला धावला आणि तिची राजदरबारी होणारी विटंबना थांबवली. शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची ओटी भरून मोठ्या सन्मानाने तिला तिच्या सासरी परत पाठविले हे अद्‌भुत प्रकार घडेल ते ह्याच भारतमातेच्या कुशीत वसलेल्या हिंदवी राज्यातच. शिकागोच्या जागतिक धर्म परिषदेत 'लेडीज ॲन्ड जन्टलमेन' ह्या कोरड्या व इंग्रजी शब्दाने आपल्या भाषणाचा प्रारंभ न करता माझ्या प्रिय 'बंधू आणि भागिनींनो' अशा अत्यंत सन्माननीय शब्दांनी प्रारंभ करून स्वामी विवेकानंद या थोर विचारवंताने, आपल्या संस्कृतीचे दर्शन जगातील समस्त थोर विचारवंतांना घडवले.

**"स्वातंत्र्य ही कुणीतरी कुणाला देण्याची गोष्ट नाही, ते आपणंच आपलं मिळवायचं असतं.स्वातंत्र्य ही संकल्पना काही पुरुषांची गुलाम नाही."**

एकपत्नी, एकवचनी, मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाचा हा देश सोळा सहस्त्र अबला नारींना प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या भगवान श्रीकृष्णाचा हा देश. तुमच्यासारखाच सुंदर व बुध्दिमान पुत्र मला हवा अशी मागणी एका विदेशी महिलेने करताच मलाच आपला पुत्र समजा असे तात्काळ उत्तर देणाऱ्या स्वामी विवेकानंदांचा हा देश. अशा ह्या देशात स्त्री म्हणजे भोगवस्तु, वासनापूर्तीचं केंद्रच का झालं हा प्रश्न सतत उद्भवतो. दररोज सकाळी उठून वर्तमानपत्र हातांत घेताच बलात्कार आणि बातम्या महिलांवरील जीवघेणे हल्ले, छेडछाड असं सद्य:स्थितीत अत्यंत अस्वस्थ करणारं, बलात्कारांच्या घटनांनी बरबटलेलं देशाचं विदारक चित्रच डोळ्यांसमोर येतं. महिलांवरील हल्ले, तरुणींची छेडछाड, अश्लील शब्दांचा भडीमार हे सारं तर आता नित्याचंच झालं आहे.

शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढत जाणारे महिलांवरील अन्याय व अत्याचार निश्चितच भूषणावह नाहीत! हे सारं घडते ते म्हणजे अनिर्बंध दूरदर्शन त्यावर दिसणारे ओंगळ दर्शन, व्यसनाधीनता, चंगळवाद व भ्रष्टाचार आदींमुळे मनुष्य हा संस्कृती, संस्कार यांपासून दूर जात आहे. नाते शब्दांमधील आपुलकी, जिव्हाळा, प्रेमभाव हे हळू हळू पुसत चालले आहेत. त्यातला सारा ढोंगीपणा आपल्यात प्रवेश करतो. अशा वातावरणामुळे माणसाची मानसिकता नकारात्मक दृष्टिकोनात बदलत चालली आहे. हे सारे विकृत, बीभत्स व समाजघातकी परिणाम दिसून येतात. आज समुपदेश करण्याची व संस्कार रुजविण्याची वेळ आली आहे.

आपण खरेदी करताना प्रत्येक वस्तू योग्य आहे का, याची पारख करून खरेदी करतो मग आपली लैंगिक इच्छापूर्तीसाठी माणूस हे सूत्र का वापरत नाही ?



झगडणे महिलांना क्रमप्राप्त झाले आहे. निर्सगनिर्मितच स्त्री दुबळी आहे. तिला संतती वाढवायची आहे. पतीची, सासू-सासऱ्यांची, घरातील लोकांची सेवा करायची हे तत्त्वज्ञान पुरुषांनीच निर्माण केलं.

अर्थार्जन करणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया अगदी त्यांच्या स्वतःच्या लहान-मोठ्या निर्भयासाठी नवऱ्यावर अवलंबून राहतात. घरातसुध्दा जेवणासाठी पुरुषांची पंगत आधी हा जसा अलिखित नियम तसेच स्त्रियांनी उरलेल्यांत भागवावे, शिळेपाके त्यांनीच खावे हा देखील स्त्रियांनी स्वतःला घालून दिलेला अलिखित रिवाज हा आजकाल सर्वत्र चालू आहे. स्त्री-पुरुषाच्या नात्यामध्ये पुरुषांच्या गरजा भागवणे ही स्त्रीची भूमिका आहे असेच पुरुष समजतात. पत्नी ही आपली सेवेकरी आहे असेच पुरुषांना वाटते. बहुसंख्य कुटुंबातील पत्नीच्या गुणांच्या, आवडीच्या कर्तबगारीच्या विकासाला पती सूक्ष्म अडसर निर्माण करीत असतो. त्यामुळेबाहेरील स्त्रियांवर, कचेरीतसुध्दा ह्याच वागण्याची पुरुषांची प्रवृत्ती असते. 'पुरुषप्रधान संस्कृती' म्हणून पुरुष आपला अधिकार धसास लावण्याचा प्रयत्न करतो.

स्वातंत्र्य ही कुणीतरी कुणाला देण्याची गोष्ट नाही, ते आपणंच आपलं मिळवायचं असतं. स्वातंत्र्य ही संकल्पना काही पुरुषांची गुलाम नाही. तरीसुध्दा मी तुझ्या आधीन राहीन तू म्हणशील तसं वागेन हे मात्र परुषांना हवं असतं. पुरुषाला स्त्रीवर सत्ता हवी असते. अशा वागण्यामुळे समानता नावाच्या भानगडीचा चुराडा होतो. स्त्रीला स्वातंत्र्य देणारा पुरुष हा कुणीतरी महान देणगीदार असतो असं नाही.

खरं तर आयुष्याचं हे अतिमहत्त्वाचं गणित कसं विसरतो?

अत्याचाराचा हा जटील प्रश्न सोडविण्यासाठी समाजात विचारांची पेरणी करण्याची गरज आहे. खरं तर देशातील तरूणांनी जागृत राहून, अशा विकृत प्रवृत्ती शोधून ठेवून काढल्या पाहिजेत. तरुणींनी रणरागिणी होत निर्भयपणे अशा प्रवृत्तींचा सामुदायिकपणे मुकाबला केला पाहिजे तर लैंगिक प्रवृत्तीचा बाप, भाऊ, शिक्षक, वकील, बहीण पुन्हा जन्मास येणार नाही. "महिलांनी लक्षात ठेवले पाहिजे, आम्ही महिला अबला नाहीत तर सबला आहोत. आम्ही चार भिंतीमधील होला हो करणाऱ्या, अत्याचार सहन करणाऱ्या नाहीत तर रणरागिणी आहोत!"

ग्रामीण स्त्रिया अशिक्षित म्हणून त्यांच्यावर अत्याचार होतात तर शहरांतील नोकरदार मुलींवर लैंगिक छळ झाल्याची ओरड होते. उच्चपदस्थ स्त्रियांवर राजकीय दबाव येतो असे माध्यमे सांगतात. एकूण काय की, अन्यायाविरूध्द अनेक कारणांनी

निसर्गाने, परमेश्वराने दोघांनाही चालवण्याच्या नावाखाली पुरुषानं खुलं प्रथम क्रमांकाचं जगणं जगायचं आणि स्त्रीने बंधनातलं, दुसऱ्या क्रमांकाचं जगण जगायचं हा ठराव पुरुषांनीच केला. ह्यालाच म्हणतात चावी चोराच्या हाती देऊन खजिन्याची रखवाली करायला सांगण्याचा हा प्रकार आहे.

बऱ्याच वर्षांपासून स्त्रीमुक्ती चळवळ, महिला स्वातंत्र्यलढा, मंडळे, अन्याय निवारण समिती, महिलाजागृती मंडळ, अबला उध्दार मंडळ. इ. माध्यमांतून विविध उपक्रम राबविले जातात. पण त्याचा सुपरिणाम सार्वजनिक जीवनात किती प्रमाणात दिसतो? मात्र कौटुंबिक पातळीवर स्त्री आपल्या हक्कांबाबत विचार करू लागली असे दिसते. पुरुष त्यांच्यावर अन्याय करीत आहे अशी सुप्त भावना मनांत येऊ लागली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सर्वच महिला प्रगतीसाठी पुढाकार घेत आहेत. मध्यम वर्गातील महिला आर्थिक गरजेतून घराबाहेर पडू लागल्या आहेत. तर उच्च वर्गातील स्त्रिया सामाजिक जीवनात रस घेऊ लागल्या आहेत. मात्र हे जागृतीचे लक्षण असले तरी ते शहरापुरतेच मर्यादित आहे. ग्रामीण भागातील गरीब स्त्रीयांच्या मनावर ‘पुरूषप्रधान’ संस्कृतीचा पगडा आहे. तो दूर करणे गरजेचे आहे.

स्त्रिला माणूस म्हणून जगण्याचं पूर्ण स्वातंत्र्य कुटुंबात व समाजात मिळालं तर कुटुंबव्यवस्थेवर व समाजावर अतिशय चांगला परिणाम होईल. निदान यापुढील काळात तरी मुलांची आणि मुलींची मानसिक घडण नवीन विचारांच्या पायावर व्हायला हवी.

शासकीय स्तरावर महिलांना सक्षम करण्याचे प्रयत्न चालू आहेतच. ‘स्त्रि अबला नसून सबला आहे,’ आपला इतिहास व पुराणकथा हेच सांगते. सामान्य स्त्रीयांचा दुय्यम दर्जाही जाईल. आशा करावी उद्याची स्वतंत्र, सक्षम, आत्मनिर्भर स्त्री दिसण्याची व देशाच्या विकासाची!

## किचन टिप्स

१.ओल्या नारळाची वाटी शिल्लक राहिली तर टिकण्यासाठी थोडेसे मीठ चोळून ठेवावे.

२.नारळाचे दूध काढल्यावर चव फेकून न देता त्यामध्ये कांदा आणि डाळीचे पीठ घालून भजी करावी. अत्यंत रुचकर भजी होते.

३.कणिक चाळताना चाळणीत दोन-चार नाणी टाकली तर पीठ लवकर चाळले जाते.

४.भेंडी चिरताना हाताला थोडेसे तेल लावल्यास भेंडीचा बुळबुळीतपणा हाताला न लागता काम सोपे होते.

५.पुलावासाठी तांदूळ शिजवताना त्यामध्ये एखादा चमचा साखर घातल्यास शितं मोकळी होतात.

६.जायफळ टिकण्यासाठी रांगोळीमध्ये पुरून ठेवावी. त्यामुळे कीड लागत नाही.

७.मूग, मटकी, हरभरे वगैरे कडधान्यांना भुंगा लागू नये यासाठी थोडीशी बोरिक पावडर लावून ठेवावी.

# याला जीवन ऐसे नाव

-पुष्पा लंकेश्वर

जीवनाचा खरा अर्थ ज्याला कळतो तो खरा माणूस असे म्हटले तर वावगे होणार नाही. मध्यमवर्गीय मनोज व मोनिका यांना खरे जीवन जगण्याचा अर्थ कळला. दैनंदिन जीवनात त्यांना लागणाऱ्या आवश्यक गरजा ते स्वकष्टाने मिळवतात. सदैव आनंदी राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या जीवनात मात्र एक उणीव त्यांना सतत भासत राहते ती म्हणजे त्यांना वयाच्या ४२ते ४५ दरम्यानही अपत्य झाले नाही. ही मनातील खंत त्यांनी कधीच बोलून दाखवली नाही.परंतु त्यांनी आपले जग इतकेच सीमित नाही हे सर्वांना दाखवून दिले. हे विश्वचि माझे घर व त्यातील प्रत्येक मूल हे माझेच आहे हे मनोमन ठरवले.

**आयुष्य हे सुंदर आहे. त्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन असायला पाहिजे. आपल्या आयुष्यात असलेल्या उणिवा आपल्या भोवतीच्या गोष्टीतून मिळवण्याचा आपला हक्क आहे.**

जनमानसात वावरताना उच्चभ्रू लोक असोत का, मध्यमवर्गिय असोत किंवा अगदी मोलमजुरी करणारे दांपत्य असोत त्यांना पहिला प्रश्न विचारला जातो की तुम्हांला मुलं-बाळं आहेत का ? किंवा एखाद्या स्त्रीला मुलगाच नसेल तर काय ? तुम्हांला मुलगा नाही कसं हो,वंशाला दिवा हा असायलाच हवा ना ?ती स्त्री सुशिक्षित असेल तर उत्तर देईल की जगात कितीतरी जोडपी अशी आहेत की, ज्यांना मुलगा नाही पण २ ते ३ मुलींचा बिनासंकोच सांभाळ करतात.त्यांना मुलांसारख्या सुविधा देतात. दृष्टीस जे जे चांगले दिसते तेच नेहमी स्वीकारावे; उणे-दुणे काढण्यात काय अर्थ. मि.मनोज आणी मोनिका यांना अपत्य नाही म्हणुन काही त्यांनी आपले जीवन जगणे थांबवले नाही. दोघेही उच्च पदस्थ नोकरीवर आहेत.त्यांना महिना सॅलरीही भरपूर आहे. आपल्या अर्थाजनाचा योग्य विनीयम करून काही अर्थ सहाय्य ते धार्मिक स्थळांना करतात. ज्या संस्था छोट्या अनाथ, निराधार अंध अपंग मुलांचा सांभाळ करतात त्या संस्थांना ते आवर्जुन आर्थिक मदत करतात. त्या स्थळांना भेटी देऊन त्यांच्या सुखदुःखात सहभागी होतात.

ते दोघंही प्रगल्भ विचारांचे आहेत.आपल्या नातेवाईक व समाजातील आपल्या सर्व बांधवांना गरीब विद्यार्थी यांच्या उद्धारासाठी प्रबोधन करतात. जेथे जेथे असहाय्य कुटुंब असेल, तेथे तेथे शिक्षणाने प्रेम निर्माण करून त्यांना त्यांच्या ध्येयाप्रत नेण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्यांच्या सुखात आनंद मानणे हेच जीवनाचे सार्थक मनोजला वाटते.मनोजचा परिवार तसा मोठा आहे. आई, दोन बहिणी, भाऊ आणि त्यांची मुलं घरच्या शेतीची देखभाल करतात. भावांच्या मुलांचं शिक्षण व्हावं म्हणून मनोज वेळोवेळी त्यांना सर्वप्रकारे मदत करायचा. बहिणीच्या संसारात काही उणीव भासल्यास मदतीचा हात देतो. अंपगत्वाची उणीव दूर करण्यासाठी तिला व्हील चेअर आणून दिली. एक ना अनेक गोष्टी आपलं दुःख दूर सारून दुसऱ्याच्या सुखासाठी झटतात ते दोघे!

मोनिका सुज्ञ सुशील व उच्च शिखरावर सध्या आहेत. मनोजने पत्नीला नेहमी सन्मानानेच वागवले.तिच्या उणिवा कधीच पाहिल्या नाहीत म्हणूनच त्यांच्या सुखाला कधीच गालबोट लागले नाही.



आपल्याला मूल नाही म्हणून काय झाले ! हे दुःख उराशी धरून का आपण जगाकडे तुच्छतेने पहायचे ? याउलट जगातील सुंदर निसर्ग, दृश्य पाहून मनाला आनंद द्यायचा निसर्गसृष्टीसौंदर्यात मन झोकून देऊन अमृततुल्य आस्वादाने मन तृप्त करायचे, मनाचा मोठेपणा हीच माणसाची खरी संपत्ती व श्रीमंती होय. मनोजने खिन्न न रहाता वेळोवेळी सर्व नातेवाईकांना आनंदाचा स्त्रोत दिला. केवळ घर आणि सर्व्हिस एवढेच जग असे ते समजत नाहीत. प्रत्येक शनिवारी, रविवारी ते प्रेक्षणीय स्थळांचा वेध घेतात. त्या ठिकाणी जाऊन आपल्या मनाला आनंद देतात. धार्मिक स्थळे, थंड हवेची ठिकाणे इ. पहाणे हा तर त्यांचा छंदच आहे.

आयुष्य हे सुंदर आहे.त्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन असायला पाहिजे. आपल्या आयुष्यात असलेल्या उणिवा आपल्या भोवतीच्या गोष्टीतून मिळवण्याचा आपला हक्क आहे. साध्या दिवटीने देखील शेतकऱ्याच्या जीवनात उजेड देऊन आनंद दिला. दुसऱ्याला आनंद देण्यात स्वतःला आनंद मिळवता येतो बरं का ? मोनिका म्हणते मला मूल नाही. मला मातृत्व नाही प्राप्त झालं, म्हणून का मी स्वतःला अपराधी समजू का ? मला नाही पण माझ्या जावांना-भावांना मुले आहेत. त्यांना मी माझे समजते. त्यांच्यात रममाण होण्यात मला आनंदच वाटेल तो कोणी हिरावून घेणार नाही.मोनिकाने मनाशी ठरवले की,प्रत्येक शाळेमध्ये जाऊन तेथील लहानग्यांना भेटुन त्यांना खाऊ खेळणी देऊन माझे मन आनंदित ठेवील,त्यांच्यात मी मनमुराद उड्या मारीनं आनंद लुटेनं खुप खुप एन्जॉय करीन. हाच तर माझ्या जीवनाचा खरा अर्थ नव्हे का ? अशा प्रकारे मनोज व मोनिका यांचे खरे जीवन आनंदात चालले होते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी आपल जीवन व्यर्थ न घालवता नवनवीन गोष्टीत खूप आनंद मिळवण्याचा ध्यास घेतला.परदेशातील नवीन शोध, नवे विचार याचा अभ्यास करण्याचा त्यांना खूप आनंद वाटायचा म्हणून ते आवर्जून परदेश दौरा करायचे, विशेष माहिती मिळवून देशात त्याचा प्रचार करून आपल्या देशात प्रगती साधायची हाच त्यांचा उद्देश होता. मनोज मनिका हे एकमेकांना अनुरूप आहेत. हे दांपत्य समाजासमोर फार मोलाचे प्रबोधन आहे.यांच्याकडून नांदा सौख्य भरे हाच संदेश घेण्यासारखा आहे. ते एकमकांवर अत्यंत प्रेम करतात,एकमेकांशी आदराने सन्मानाने वागतात.हाच आदर्श त्यांनी सर्वांसमोर ठेवला आहे. त्यांच्याकडे पाहून कोणीही म्हणेल की 'अरे उन्हे बच्चे नही तो क्या हुआ वे तो हमेशा बच्चोमेंही रहते है किती सुखी जीवन आहे' त्यांचे वागणे तर जगाने आदर्श ठरवलं आहे.

आजकाल आपण आपल्याभोवतीच्या जगात पहातो की, बऱ्याच वेळा लोकांमध्ये काही ना काही कारणाने नैराश्य येते. मुलगा आईवडिलांची नीट देखभाल करीत नाही. सासरी मुलीचा छळ होतो, शेतकऱ्यांना कर्ज फेडता येत नाही म्हणून आत्महत्या करतात. मुलाला आई रागावली म्हणून त्यानं घर

सोडले. विद्यार्थिनीला १२ वी परीक्षेत यश आले नाही म्हणून तिने विहिरीत जीव दिला. अशा प्रकारे अनेक निराशजनक घटना घडतात परंतु हा काही जीवन जगण्याचा मार्ग नाही. अशा या भ्याड आचरणाचा धिक्कार करावासा वाटतो. जगात कितीतरी व्यक्ती असह्य वेदनांना सामोरे जाऊन आपले जीवन सफल करतात.एका पायाने व एका हाताने अपंग असणाऱ्या मुलाने आपल्या डाव्या पायात पेन धरून चित्र रंगवले, पेपर्स लिहिले व यश मिळवले. मूक बधिर मुले की जे निराधार आहेत अशांनीही आपल्या जीवनात यशाचे शिखर गाठलेली उदाहरणे आहेत.

मनोज व मोनिका यांनी आपल्या सद्वर्तनातून दाखवून दिले की, दुःखाची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची हिरवळ लाभत नाही पॉझिटिव्ह विचार नेहमी माणसाला यशस्वीतेकडे नेतात. हया पॉझिटिव्ह विचारांनीच मनोजच्या आयुष्यात आश्चर्य घडले मोनिकाला मातृत्वाची चाहुल लागली. तिला तर आकाशच ठेंगणे वाटू लागले. म्हणतात ना खुदा के घर देर है लेकिन अंधेर नही है. ही किमया होकारार्थी विचाराचीच हे विसरायला नकोच. कितीही असाध्य आजार असु देतं मी त्यातुन सहीसलामत बाहेर पडणार ही मनोबलाची कामना तीव्र ठेवा असे शास्त्रज्ञांचे तत्त्व आहे. मनोज मोनिका यांच्या आयुष्यात एक विज्ञाननिष्ठ डॉक्टर आले. त्यांनी एका डॉक्टरांना भेटण्याचा सल्ला दिला. त्या लेडी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मुल होण्याचे उपचार मोनिका व मनोजने सहजतेने केला. या दांपत्याच्या ध्यानी मनी ही नव्हते पण म्हणतात की देवाची करणी नि नारळात पाणी तसेच काहीसे घडले.

मनोज मोनिका यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. आप्तेष्ट मित्रपरिवार यांचा आनंद तर गगनाला टेकला. सर्वांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला

अनेक देणगी घेणाऱ्या संस्थांनी तर त्यांना सन्मानित केले.बघता बघता ९ महिने ९दिवस भरले. मनोरमाने गोंडस विरांगनेला जन्म दिला. मनोजने सर्वांना जाहिर केले की आमची मुलगी नव्हे तर हा आमच्या वंशाचा दिवा आहे बरं का ?

सर्वांनी हा आनंदाचा दिवस उत्साहात साजरा केला. सकारात्मक म्हणजेच होकारात्मक विचारांची ही न्यारी जादूच घडली मनोज मोनिका दांपत्यांनी सर्वांना संदेश दिला 'याला जीवन ऐसे नाव' !





# एका बुफेची गोष्ट

**- मृदुला मराठे**

“अय्या! बुफे आहे! मग धमाल!” असं म्हणतं आम्ही मैत्रिणी खुशीत वरच्या मजल्यावर सभागृहात जेवायला निघाला. छानछान खमंग वासानं जिभेला पाणी सुटत होतं. जेवणावर छान ताव मारायच्या उद्देशानं सगळ्या हॉलभर नजर फिरवून मी अंदाज घेत होते. काय खाऊया, असा मनात विचार करत होते. माझ्या सुटलेल्या पोटाकडे मी अगदी दुर्लक्ष करत होते आणि तळलेल्या पापडांच्या मोहात मी गुंतले. थाळीत तळलेले पापड, कुरडया, शंख सगळं वाढून घेतलं. इतके प्रकार होते की, काय खाऊ अन् काय नको अस झालं होतं. सर्व वाढून घेत घेत मी पुढे पुढे सरकत होते. इतक्यात...भल्या मोठ्या पंख्याच्या झोतानं थाळीतले पापड, कुरडया, शंख सगळे भराभरा उडाले आणि ...समोरून येणाऱ्या त्या एका सद्गृहस्थांच्या शुभ्र झब्ब्यावर जाऊन चिकटले. क्षणभर मला काय करावं तेच कळेना. त्यांची मी चटकन् माफी मागितली पण त्यांच्या चेहऱ्यावरचे ते रागीट भाव आणि शुभ्र झब्ब्यावर उमटलेली तेलकट लालपिवळी नक्षी, बापरे!! मी घाईघाईने तिथून सटकले. मनातून थोडी नाराज झाले होते. खुर्ची शोधूया, म्हणून इकडेतिकडे पाहू लागले. पण, छे! इतक्या सहज झालं तर मग काय हवं होतं! एक छोटंसं गोंडस बाळ रांगत रांगत माझ्या पायातच आलं, त्याला धक्का लागायला नको म्हणून मी त्याला आणि स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करत होतो पण...माझाच तोल गेला आणी मी धाडकन पडले. हातातील थाळी मात्र मी गच्च धरून ठेवली होती.त्यावेळीचा माझा अवतार पाहण्यासारखा होता. जणू काय एका हातावर द्रोणागिरी उचलून घेतलेला मारुतीरायाच.


**“अगदी तेव्हापासून बुफे ह्या शब्दाचा मी धसकाच घेतला. जीवनात असे प्रसंग येतातच, अशी माझी मीच समजूत घातली आणि पुन्हा बुफेला जायचा प्रसंग येईपर्यंत मी हे सगळं सोयीस्करपणे विसरून गेले.”**

इतक्यात शेजारीच दोन चिमुरड्या जोरात बोलल्या “ऑन्टी गिर गयी देखो ऑन्टी गिर गयी...” चटकन माझ्या दोघीजणी मत्रिणी पुढे आल्या. मला त्यांनी मदत केली, तेव्हा मी माझा स्थूल देह सावरत सावरत स्थिरस्थावर झाले. मी पडले ही बातमी सगळ्या हॉलभर पसरली. मग माझ्या सेवेला सगळी हजर झाली कुणी पाणी आणून दिलं, कुणी वारा घालू लागलं. मी मात्र खूपच गोंधळून गेले. स्वतः हॉलचे मॅनेजर आले. खास टेबलखुर्ची दिली. त्या बाळाची आई येऊन चौकशी करू लागली. “स्वारी हं ऑन्टी” असे म्हणाली. ह्या सगळ्या प्रकाराने मी मात्र लाजून अर्धमेली झाले.

अगदी तेव्हापासून बुफे ह्या शब्दाचा मी धसकाच घेतला. जीवनात असे प्रसंग येतातच, अशी माझी मीच समजूत घातली आणि पुन्हा बुफेला जायचा प्रसंग येईपर्यंत मी हे सगळं सोयीस्करपणे विसरून गेले.

एकदा माझ्या जिवलग मैत्रिणीच्या मुलीचं लग्न ठरलं आणि मग काय रोजच फोनवर गप्पा चालू झाल्या. तयारीची गडबड, रूखवताची तयारी, खरेदी सगळ्या गोष्टीची अगदी धावपळ चालू झाली. लग्नासाठी मी माझ्यासाठी छान शालू घेतला. त्याला मोठ्ठे मोठ्ठे गोंडे होते. भरजरी पदर होता, बुट्टे होते. तोच नेसून मी नटूनथटून ऐटीत लग्नाला गेले. लग्नविधी चालले होते. आम्हा मैत्रिणींच्या गप्पा जोरात चालू होत्या. हल्ली नाहीतरी लक्ष कुठे असत कुणाचं त्या लग्नविधीकडे. सगळा हॉल मस्त सजवला होता. वरच्या मजल्यावर छान बुफे लावला होता. मी बुफे या शब्दानं एकदम दचकले पण आता मात्र मी मागीलवेळी झालेल्या चुका करणार नव्हते. मी मनात यादीच केली. नं. (१) पापड, कुरडया, शंख बिल्कूल वाढून घ्यायचं नाही.(२) चालताना पायाखाली पाहायचं (३)जवळचीच खुर्ची आधीच पकडून ठेवायची. अशी सगळी मनात उजळणी करत होते.अगदी आत्मविश्वासाने मी बुफेच्या ठिकाणी गेले. संयमानं हळू हळू वाढून घेऊ लागले. अदबीनं पावलं टाकीत पुढे पुढे जाऊ लागले. मोजकं वाढून घेऊ लागले. वाढून घेतलं आणि वळणार तोच... जोरात पदर खेचला गेला व हिसका बसला. अचानक काय झालं? म्हणून मी मागे वळून पाहिल. तर काय !! एका तरुण देखण्या मुलाच्या कमरेच्या पट्टयाच्या बक्कलमध्ये माझा शालूच्या पदराचा गोंडा अडकला होता. गुंतून गेला होता. मी पुढे सरकू शकत नव्हते आणि तोही तरुण तिथून हलू शकत नव्हता. आमचे दोघांचेही चेहरे अगदी पाहण्यालायक झाले होते. ऐन थंडीत मी घामाघूम झाले होते. माझी मैत्रीण चटकन तिथे आली. तिने तो पदर सोडवण्याचा प्रयत्न केला पण यश आलं नाही. शेवटी सर्व प्रयत्न हरल्यावर स्वयंपाकघरातून मोठा भाजी कापायचा सुरा आणला आणि तो धागा कापला. तेव्हा आमची दोघांची ताटातूट झाली. घाम पुसत मी हूश्श केलं आणि शांत बसले. जेवणाची इच्छा पार उडाली होती. आता मात्र मी मनाशी पक्क ठरवलं. जिथे बुफे असेल तिथे कधीच जेवायला जायचं नाही. अगदी नाही म्हणजे नाही.

अगदी सकाळीच माझ्या मोठ्या बहिणीचा फोन आला. छानऽऽ बातमी सांगितली. भाचीचं लग्न ठरलं. इथला म्हणजे ठाण्यातलाच मुलगा आहे. रविवारी बैठक. तुझ्या म्हणजे माझ्या घरी करूयात. असा बेत झाला. रविवार उजाडला. मी घरातली आवराआवर केली सगळी जय्यत तयारी केली. मुलाकडची मंडळी आली आम्ही सगळे जमलो. बैठक चालू झाली. सगळं ठरलं. देणंघेणं, मानपान वगैरे ...शेवटी विषय निघाला - पंगत ठेवूया का बुफे? मी स्वयंपाकघरात आवराआवार करत होते. “बुफे” हा शब्द माझ्या कानावर पडला. आणि मी दचकलेच. जोरातच मी आतून जिवाच्या आकांताने ओरडले, ताई! ए “ताई!! बुफे नको! बुफे नको!! पंगतच ठेवूया. अगं ताई पंगतच ठेवूया!!”



# पारख

- नीता कोयंडे

"अगं आई, आज आमच्या ऑफिसात एक नवीन मुलगी आली." घरात शिरता शिरताच ललिता आईला म्हणाली.

"तुझ्यासारखी साधी, भोळी," आई सहजतेने म्हणाली, 'तुला कसं कळलं ग?' ललिताने तेवढ्याच सहजतेने विचारलं.

"तुला सर्वच माणसं साधी भोळी वाटतात ना!" आई म्हणाली, "आहेच ती." ललिता म्हणाली.

"अगं, मग तूच म्हणशील, तशी नाही ती मला माणसं ओळखू येत नाहीत हेच खरं!" आई म्हणाली.

'आई हिच्याबाबतीत नाही म्हणणार तसं! बघच तू!' ललिता म्हणाली.

'बरं बाई, राहिलं!' आई म्हणाली.

'अगं, तिनं काय केलं माहीत आहे? आमचा मोठा बॉस...मालक गं कॅंटीन बॉयने चहाचा ट्रे त्याच्या केबिनमध्ये ठेवल्यावर ती न विचारताच त्यांच्या केबिनमध्ये घुसली. नॉकसुध्दा केलं नाही. साहेबांचं लक्ष नव्हतं तिच्याकडे. ते कामात होते तर हिने काय करावं?' ललिताने विचारले.

'त्याच्यासमोर उभी राहिली असेल. आपल्याकडे कधी लक्ष देतात ते पाहात' आई म्हणाली.

'नाही गं ! चक्क दोन कपांत चहा ओतला आणि त्यांना काहीतरी सांगितलं.' ललिता म्हणाली.

'अगंबाई, मग?' आईने विचारले.

'त्रासिकतेने त्यांनी तिच्याकडे बघितले आणि लगेचच थोडासा हसरा चेहरा करून तिला चहा घ्यायला सांगितलं आणि स्वतः घेतला. काचेच्या पार्टिशनमधून आम्हांला दिसत होतं ना,' ललिता म्हणाली.

'मग?' आईने विचारलं.

चहा पिऊन झाल्यावर ते तिला काहीतरी सांगत होते. पण चेहरा मात्र थोडासा त्रासिकच दिसत होता. ती बाहेर आल्यावर जसं काही घडलंच नाही असा भाव चेहऱ्यावर.' ललिता म्हणाली.

**'कपडे साधे पण नीटनेटके. तिला शोभणारे थोडेसं जरी तिने स्वत:कडे लक्ष दिलं तरी चांगल्या दिसणाऱ्या मुलींत गणना होईल,'**

'मग, मालकांनी तुमच्या साहेबाला बोलावून असं डायरेक्ट कोणी माझ्याकडे पाठवू नका असं सांगितलं का?' आई, 'सांगितलं ना. त्यांना लगेच बोलावून तावातावाने बोलत असल्याचं दिसत होतं...पण केबिन साऊंडप्रूफ असल्याने बाहेर ऐकू येत नव्हतं. साहेब बाहेर आल्यावर थरथरत होते. त्यांनी सर्वांनाच वॉर्निंग दिली. कोणत्याही व्यक्तीने/स्टाफ मेंबरने डायरेक्ट त्यांच्या केबिनमध्ये जायचं नाही म्हणून, तर ही? कौतुकाने बघत होती.' ललिता.

'त्यातलं गांभीर्य तिला कळलं नसेल.' आई.

'पण असं वागणं शोभते कां?' ललिता.

'कामात कशी आहे?' आई.

'माहीत नाही. आजच पहिला दिवस तिचा.' ललिता.

'दिसायला?' आई.

'कपडे साधे पण नीटनेटके. तिला शोभणारे थोडेसं जरी तिने स्वतःकडे लक्ष दिलं तरी चांगल्या दिसणाऱ्या मुलींत गणना होईल,' ललिता

'आणि बोलणं?' आई.

'फार सुंदर बोलते. फारच इम्प्रेसिव्ह. चारपाच वाक्यांचा मजकूर, सहज...अगदी सहज...एका वाक्यात असतो तिचा. बोलण्यावरून वाटते उच्च सोसायटीतली, पण बाकी नाही हं!' ललिता.

'शिक्षण?' आई

'माहीत नाही.' पण माहीत नसलेलं विचारते. लंच टाईममध्ये सर्वांशी सहजच बोलून ओळख करून घेतली...काम कसं चालतं त्याचीही माहिती करून घेतली. दुपारचा चहा तिने कँटीनवरून स्वतःच्या टेबलावर मागवून घेतला. आम्ही विचारलं तर म्हणाली, 'चहावाल्याचा वेळ माझ्यापेक्षा जास्त कींमतीचा नाही. मला विचारीत होती. ऑफिसच्या वेळेपेक्षा जास्त थांबावं लागतं का ऑफिसमध्ये? मी म्हटलं, "हो. मग ओव्हरटाईम मिळत असेल?" मी म्हणाले, नाही, मग उशिरापर्यंत थांबण्याचे कारण? तिने विचारले. मी म्हणाले, नोकरी टिकवणं...मला माझ्या नोकरीची गरज. आई आणि मी...दुसरं उत्पन्न नाही. अगं तिला फार वाईट वाटलं. आज तिचा पहिलाच दिवस...ऑफिसच्या वेळेनंतर तिने थांबण्यास नकार दिला. जे थांबतात त्यांना ओव्हरटाईम द्या म्हणायला कचरली नाही ती आणि निघून गेली. नोकरीची पर्वा न करता ललिता. कमाल आहे तिची. नावं काय गं तिचं? आई.



'रेणुका...!' ललिता.

'आणि आडनाव?' आई

'रेणुकाच म्हणा म्हणते...'ललिता.

'तुला काय वाटतं, ती येईल उद्या?' आई.

'येईल तर बरं होईल.' ललिता

'का?' आई

'ती गेल्यानंतर मालकांचं आणि साहेबांचं बरंच बोलणं झालं. दीड तासानंतर साहेब मालकांच्या केबिनमधून बाहेर आले...घाम पुसत...अणि त्यांनी सर्वांना सांगून टाकलं. आजकालपासून अधिक काम करणाऱ्यांना ओव्हर टाईम मिळेल. उशिरा थांबणं ऐच्छिक असेल.' ललिता.

'तुला काय वाटतं? तिने यावं?' आई.

'हो. यावं तिनं. मला वाटतं पहिलीच नोकरी आहे तिची. सगळ्या गोष्टी मनासारख्या थोड्याच होतात.' ललिता.

'येईल ती. तुझी इच्छाशक्ती ओढून आणेल तिला.' असं म्हणून आई आपल्या कामाला लागली.

रोज ऑफिसमधून आल्यावर ललिता रेणुकाबद्दल सहजच सांगू लागली. आता तर ललिताला ऑफिस, रेणुका आणि आई ह्याशिवाय जग राहिलं नाही. रेणुकाशी सलगी दिवसेंदिवस वाढत चालली. तिच्यामुळे ललिताला ऑफिस ऑफिस वाटेना, तिला ते दुसरं घर वाटू लागले. एक दिवस

तिची आई म्हणाली, 'काय गं, रेणुकाबद्दल बऱ्याच दिवसांत काहीच सांगितलं नाहीस!'

'सांगेन म्हणते पण धीर होत नाही. अर्थात तुला सांगितल्याशिवाय ते कळणारही नाही म्हणा. अगं, रेणुकाबद्दल ऑफिसमध्ये बरंच काही बोललं जातं. आमच्या मालकांचा आणि तिचा काहीतरी संबंध असावा असं सर्व स्टाफ समजतो. पण नक्की काय कळत नाही.' ललिता.

'कळत नाही ना? मग तुम्हांला काय करायच्यात नसत्या उठाठेवी?' आई.

'तसं नाही पण तिच्यासमोर घडलेली प्रत्येक गोष्ट किंवा ऑफिसमध्ये घडलेली गोष्ट मालकापर्यंत कशी जाते हे गौडबंगाल आहे.' ललिता.

'मग त्यातून काही प्रॉब्लेम निर्माण होतो काय?' आई.

'नाही.' ललिता.

'नाही. झालं तर चांगलंच होतं.' ललिता.

'मग चर्चा कशाला? आणि तू का त्रास करून घेत्येस?' आई.

'म्हणणं खरं आहे तुझं. पण...खरं सांगू, रेणुका खरंच साधी आहे. तिचं वाईट काही होऊ नये असं मला सारखंच वाटतं. पंधरा दिवसांपूर्वी आमच्या ऑफिसच्या बिल्डिंगखाली तिची आई तिला निरोप देताना पाहिली. रेणुने बाय केलं. तिची आई चालतच निघून गेली. रेणूसारखीच साधी. मोठी बहीण वाटावी अशी. नीटनेटकी, कोणीही रिस्पेक्ट द्यावा असं व्यक्तिमत्व. थोडेसे उची कपडे, थोडेसेच दागिने अंगावर असतील तर...जाऊं दे. रेणुका वाटते माझ्याबद्दल विशेष बोलते, दोस्ती वाढवते म्हणून असेल कदाचित, मला तिचे वाईट होऊ नये असं वाटतं. पण परवाचीच गोष्ट सांगितली नाही तुला, सांगावीशी वाटली नाही. परवा ऑफिसच्या बिल्डिंगकडे गेले तर तिची आई...आमच्या मालकांबरोबर चालताना दिसली. मालकांनी तिला टॅक्सीत बसायला सांगितल्याचं मी बघितलं. ती बसत असताना पाठीवर थोपटल्याचंही मी प्रत्यक्ष बघितलं. टॅक्सी गेली...मालक माझ्यापुढे ऑफिसमध्ये आले. अर्थातच मी त्यांना बघितल्याचं त्यांना माहीत नसेल.' थोडी कासावीस झाली.

"जाऊ दे ना. त्यांच्या गोष्टीत आपण कशाला लक्ष द्या". आईने तिची समजूत काढली.

"ते खरं गं. पण रेणुकाचा विचार करताना मन अस्वस्थ होतं". ललिता तो विषय तिथंच थांबला.

दुसऱ्या दिवशी ललिता ऑफिसमधून घरी आली तीच मुळी विमनस्क स्थितीत. तिची अस्वस्थता बघून आईने विचारलं, "काय झालं गं? नक्की ऑफिसमध्ये काहीतरी झालंय". तिने पर्समधून आमंत्रणपत्रिका काढली आणि आईच्या हातात दिली. म्हणाली वाच, "आज संध्याकाळी ऑफिस सुटायच्या अगोदर मालकांच्या सहीची आमंत्रणपत्रिका मिळाली. त्यांच्या मुलीचा वाढदिवस पंचतारांकित हॉटेलात साजरा करताहेत आणि विशेष म्हणजे रेणुकाला आमंत्रण नाही.

"असं कसं होईल?" आई

"साहेबांनी मालकाला विचारलं तर ते म्हणाले की ज्यांची नावं लिहिली आहेत त्या सर्वांना द्या बस...तिथे मी काही अनाऊन्स करणार आहे. कार्डधारकांनी वेळीच उपस्थित राहा. रेणुकाबद्दल काहीतरी गडबड आहे. खास ललिता.

"रेणुका काय म्हणतेय"? आई

"ती बिचारी काय म्हणणार! नेहमीसारखंच! काहीच घडलं नाही असा चेहरा". ललिता.

"मालकाचे आणि तिचे ऑफिसमधले संबंध" ? आई

"पहिल्या दिवशी ती त्यांच्या केबीनमध्ये गेली होती तेवढीच मग मात्र तिला त्यांच्याशी बोलतानासुध्दा कोणी पाहिलेली नाही". ललिता

"बिचारी पोरं...आई .

मी तिला म्हटलं, " रेणुका तुला आमंत्रण नाही. मला बरं नाही वाटत. तिचा चेहरा कोराच. रेणुका, मला वाटतं मीही जाऊ नये. रेणुका म्हणाली का ?मी म्हटलं अगं जवळजवळ एक वर्ष होतंआलं. आपण दोघी एकत्र असतो आणि मालकांच्या मुलीच्य वाढदिवसाला मी एकटी कशी जाणार ? माझा स्वर कातर झालेला पाहून ती हसत हसत म्हणाली. "असं नको करूस. सर्वांनाच आमंत्रण आहे. तुलासुध्दा गेलं पाहिज". मी म्हटलं, "तुझं काय ?" माझ्या खांद्यावर थोपटून ती काहीच म्हणाली नाही. नेहमीसारखाच कोरा चेहरा. ललिता. "समजलं पहिल्याच दिवशी ऑफिसात रेणुका मालकांच्या केबिनमध्ये गेल्यानंतर त्यांचं काहीतरी झालेलं बोलणं. त्यानंत ती कधीही त्यांच्या केबिनमध्ये गेलेली नाही आणि मालकांचे तिच्या आईबरोबर आपुलकीचे संबंध आणि मुलीच्या वाढदिवसाचं आमंत्रण नाही. ह्या सर्व गोष्टींमुळे रेणुच्याबाबतीत तुझा गोंधळ झालेला आहे, बरोबर ? तू काय ठरवलंस" ? आई.

"आई, ह्या सर्व प्रकारात मी ह्या ऑफिसात काम करू शकणार नाही. असं मला वाटतं", ललिता म्हणाली.

"रिझाईन करणार ? मग दुसरी नोकरी ?" आईने विचारलं.

"बघु", ललिता म्हणाली.

"तू राजीनामा दिलास आणि नंतर काही दिवसांनी रेणुकाने राजीनामा दिला तर ? आणि तुला दुसरी नोकरी नाही मिळाली तर ?" आईने विचारले.

"पण मला अशा परिस्थितीत नाही काम करता येणार आणि तसं तिला मी स्पष्ट सांगू पण शकणार नाही". रेणुका म्हणाली.

"तू एक काम कर"...

"बोल...ग. लवकर बोल..." ललिता घाईघाईत म्हणाली.

"मालकाच्या मुलीचा वाढदिवस होईपर्यंत थांब. तू इतरांबरोबर वाढदिवसाला जा. मग दुसऱ्या दिवशी ऑफिसला जा. कदाचित रेणुकाच येणार नसेल त्या ऑफिसात. नोकरी सोडावी लागणार नाही कदाचित आणि जर रेणुकाने नोकरी सोडली नाही तर, आपल्याला तुझ्या नोकरीची गरज असली तरी... मग तू निर्णय घे. मी काहीच बोलणार नाही". आईने तिला समजावलं.

जाणं भागच होतं म्हणून आईने समजावल्यावर ललिता मालकाच्या मुलीच्या वाढदिवसाला जायचं म्हणून ऑफिसला गेली .



तिथूनच सगळा स्टाफ पंचतारांकित हॉटेलात जाणार होता. ललिता घरातून ऑफिसला जायला म्हणून बाहेर पडल्यावर ललिताची आई दिवंगत नवऱ्याच्या फोटोकडे गेली. म्हणाली. बघितलंत? ...किती चांगली दिसतेय ती? मैत्रिणीसाठीसुध्दां किती जीव टाकतेय. साधी आहे ...तुमच्यासारखी. प्रामाणिक आहे. समजावून सांगितलं तर ऐकते. लहानपणापासून सवय आहे तिला ती. एकुलती एक पोर चांगलं शिकवायचं - मोठ्ठं करायचं. स्वप्नं पाहिलीत. मलाही पाहायला लावलीत. आपण गेलात, सगळचं अपुरं राहिलं. चांगली स्वप्नं पुरी होत नाहीत. शेवटी स्वप्नंच ती.बी.ए. झाल्यावर पुढे नाही शिकता आलं तिला. नोकरी करणं भाग पडलं. खाणार काय? आता प्रश्न आहे तो पुढे काय? आता हीपण नोकरी जाणार तिची. बघताय ना? काय होणार तिचं? माझा नका विचार करू असंच काहीबाही ती नवऱ्याच्या तसबिरीसमोर संबंध दिवस बडबडत राहिली. रात्र झाली. साडेनऊ झाले तरी ललिता आली नाही. आता मात्र ती खुर्चीत बसून विचारात मग्न झाली.

दरवाजाची बेल वाजल्यावर ती दचकून जागी झाली. दरवाजा उघडल्याबरोबर आई अशी हाक मारून ललिता आत आली आणि तिने आईला मिठी मारली. डोळ्यांत आनंदाश्रू, पण अश्रू दिसल्यावर आईला वेगळाच भास झाला. तिचं मन धास्तावलं.

"अगंऽऽ अगं असं काय करतेस? काय झालं? का रडतेस? आधी रडणं थांबव बघू...हं बोल". आई म्हणाली, ललिताने आईकडे बघितलं ...परत तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू. आईला मात्र ती रडत असल्याचाच भास झाला. आईला तिने गोल गोल फिरवलं आणि तीही फिरली...हसली...म्हणाली...अगं काही झालं नाही मला...घाबरू नकोस...अगं पण खूप काहीतरी झालय. खूप..."आई संभ्रमात पडली.

"खरंच...बघतेस काय अशी"? ललिता म्हणाली. "बघू नको तर...रडतेस...हसतेस...प्रकार काय आहे? मालकाच्या मुलीच्या वाढदिवसाला गेली होतीस तिथूनच येतेस ना"? आईने विचारले.

"काय आहे? ऐकल्यावर तूही तसंच करशील" ललिता म्हणाली.

"म्हणजे?" आईने विचारले.

आम्ही सर्वांनी वाढदिवसाला म्हणून त्या हॉटेलमध्ये प्रवेश केला. बस्स! आई...हॉल असा सजवला होता स्वर्गात गेल्यासारखं वाटल. माझी पहिलीच वेळ ना अशा मोठ्या पंचतारांकित हॉटेलात जायची. स्टाफ मेंबरच्या बाहेरचे कोणीच नव्हते. आमचे मालक अगदी उत्साहाने सर्वांचे स्वागत करत होते. ते बघून सर्वच भारावून गेले. सर्वांच्या नजरा मात्र मालकाच्या मुलीकडे लागल्या नजरा मात्र मालकाच्या मुलीकडे लागल्या होत्या. स्टाफचेच सर्वजण होते. नव्हती फक्त रेणुका. मला मात्र तिची अनुपस्थिती जाणवत होती. मी अस्वस्थ व्हायला लागले...ऑर्केस्ट्रावर संथ लयीत वेस्टर्न म्युझिक चालू होतं...सिनेमात दाखवतात तसंच दृश्य होतं ते...माझी घालमेल चालू झाली...थांबावं की निघावं ह्या मूडमध्ये मी असतानाच मी उठले आणि दरवाजाच्या दिशेने जायला लागले, तर तिथेच मला मालकांनी गाठलं. हात पकडून मला सर्वांच्यासमोर आणलं आणि एक टेबलाकडे बसवलं. मी खरं तर घाबरलेच. त्या ए.सी.मध्येसुध्दा मला घाम सुटला. सर्वजण आश्चर्याने बघत होते. मला हळूच म्हणाले, "जाऊ नकोस ते माईक हातात घेऊन म्हणाले, मित्र हो, आजचा दिवस आपणासर्वांसाठी स्पेशल दिवस मी समजतो. आज मी तुमचा फक्त मित्र आहे" आणि इतक्यात ऑर्केस्ट्राची धून बदलली. उत्तेजक अशी फास्ट धून चालू झाली. सर्वांचं लक्ष पडद्याकडे गेलं आणि मला तर धक्काच बसला. रेणुकाच्या आईसारखी दिसणारी स्त्री तिथून प्रवेश करीत होती. मी संभ्रमित झाले. एक सुशील,

श्रीमंत, रूपवती स्त्री...मी ओळखलं, ती रेणुकाची आईच होती. मालक तिच्या रोखाने दोन पावले पुढे गेलेआणि तिचे हात हातात घेत ओळख करून दिली. "आमची सौ". मी उडालेच. म्हणजे खरंच ती त्यांची पत्नी होती आणि मी मात्र त्यांच्याबद्दल उगीचच नको तो विचार मनात घोळवत होते. त्या धक्क्यापासून सावरते न सावरते तोच ऑर्केस्ट्राची धून अधिक फास्ट झाली. पडद्याच्या कडेला धूर झाला आणि तिथून आगमन झालं मालकाच्या मुलीचं. जिच्या वाढदिवसाला आम्ही आलो होतो ती...सुंदर साडीत...अंगावर दागिने...एकदम स्टायलिश वाटणारी ती मुलगी... मालकांनी आणि त्यांच्या सौ.नी टाळ्यांच्या गजरात तिचं स्वागत केल्याबरोबर आम्ही सर्वजण उठून उभे राहून तिला मानवंदना दिली. तिच्या चेहऱ्यावरचं ते तेज पाहून...एकंदर सर्वच पेहराव पाहून उत्स्फूर्तपणे सर्वांनी तिला दिलेली ती मानवंदना. मी भारावून गेले. अगं तिच्या चेहऱ्यावर नजर ठरत नव्हती. अशी ती...सुंदर हसत प्रवेशत सर्वांनाच तिने अभिवादन केलं आणि ती आईवडिलांना बिलगली. जरा वेळाने माझ्या लक्षात आलं अगं ती रेणुका होती... रेणुकाच होती. सर्वांनी टाळ्या वाजवल्यावर मी मात्र मनोमनी सुखावले. एवढ्या मोठ्या मालकाची मुलगी माझ्याबरोबर ओळख वाढवते...आपुलकीने वागते. मैत्रीण बनून मला तिचा अभिमान वाटलाअआणि माझे डोळे आनंदाने पाणावले. मालक म्हणाले, आमची एकमेव कन्या, रेणुका...एम.ई.एम.बी.ए. मित्रहो उद्यापासून ती माझ्या केबीनमध्ये माझ्या जागेवर बसेल. आमच्या स्टाफची



सुखदुःखं आम्हांला कळावीत म्हणून आम्ही मुद्दामच अशा तऱ्हेने वागलो. ज्या अनिष्ट गोष्टी आम्हांला कळल्या त्या सोडवण्याचा आम्ही आमच्या परीने प्रयत्न केला, अजूनही करू. आई खरं सांगू...आमचं मन भरून आलं. सर्व गोष्टींचा तिथेच उलगडा झाला. इतक्यात रेणुका आईवडिलांना सोडून माझ्याकडे आली. माझे दोन्ही हात पकडले आणि मला आपल्य आईवडिलांकडे घेऊन गेली. तिच्या वडिलांनी आणखी एक घोषणा केली, " ही ललिता ग्रॅज्युएट आहे. तिला आम्ही आमच्या खर्चाने एम.बी.ए. करायला पाठवीत आहोत. सर्व खर्च आमचा आणि नेहमीचा तिचा पगार तिला चालूच राहील. आई...मला हर्षवायूच व्हायचा बाकी राहिला. मला धड श्वासपण घेता येईना, आनंदाने डोळे भरून आले...समोर मला आता रेणुकापण दिसेना. आई...मला तू दिसायला लागलीस. कधी एकदा भेटते असं वाटू लागलं आणि म्हणून तुला बघून आनंदाचं रडू आले. तू म्हणत होतीस ना, मला माणसं ओळखता येत नाहीत म्हणून...खरं असेल ते...पण हिच्या बाबतीत नाही घडलं तसं." असं म्हणून तिने आईला परत मिठी मारली.

आईच्या डोळ्यांतही आनंदाश्रू उभे राहिले. ती ललिताला नवऱ्याच्या फोटोजवळ घेऊन गेली. दोघींनी फोटोला नमस्कार केला. आई ललिताच्या वडिलांच्या फोटोकडे बघून म्हणाली, " म्हणत होता ना. आपली ललिता साधी आहे. खूप शिकवायचं आहे तिला. आता आशीर्वाद द्या. आता नाही राहणार ती साधी. शिकेल ती. मोठी होईल. चांगलंच होईल तिचं!" असं म्हणून तिने ललिताला मिठी मारली.

# पर्स

- अश्विनी चव्हाण

पर्स म्हटलं की लगेचच सर्वांचं लक्ष वेधून घेणारी, प्रत्येक गृहिणीच्या हातात किंवा खांद्याला अडकवलेली सुबक, नक्षीदार, मराठीमध्ये सांगायचे तर पैसे ठेवण्याची पिशवी. अहो पिशवी काय म्हणताय? पर्सला पिशवी म्हटल्यामुळे माझ्यावर ओढवलेला एक गंमतीशीर प्रसंग आपणांस कथन करू इच्छितो.

त्याचे असे झाले. आम्ही सर्व कुटुंबीय पिकनिकसाठी निघालो होतो. आई-वडील, मुले, पत्नी सर्वजण आनंदात होतो. दररोजच्या रामरगाड्यातून बरेच दिवसांत बाहेर पडण्याचा योग आल्यामुळे पत्नीच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सर्व जय्यत तयारी झाली होती. साहित्य गाडीत ठेवले होते. प्रवासाला निघता निघता मी पत्नीस चेष्टेने म्हणालो, "तुझी पिशवी घेतली का?

**पर्सचा आकार हा स्त्रीच्या हृदयासारखा आहे. हृदयामध्ये ती विविध भावना, मानअपमान, आनंद, दुःख, वेदना साठवत असते.**



प्रवास सुरू झाला, पत्नीच्या चेहऱ्यावरील हावभाव पाहून माझ्याकडून काहीतरी गंभीर चूक झाल्याचे संकेत मला मिळत होते. काय झाले असेल याचा अंदाज करताना मला असे जाणवले की, मांडीवर ठेवलेल्या पर्सवरून ती वारंवार हात फिरवीत होती, एखाद्या लहान मुलाची आपण समजूत काढतो तसे.ती निर्जीव वस्तू असून सुध्दा मला मत्सर झाला. पर्सचा अवमान झाल्याची चूक लक्षात येताच समयसूचकतेने मी पर्सचे वर्णन सुरू केले. तसे पत्नीच्या चेहऱ्यावर पुन्हा स्मित हास्य दिसू लागले.

आम्ही एका हॉटेलमध्ये चहासाठी उतरलो. नुकतीच चालायला लागलेली एक छकुली छोटीशी नाजूक पर्स घेऊन बागडताना दिसली. तिच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून या पर्सचे स्त्रियांच्या जीवनातील महत्त्व सहज लक्षात येत होते. त्या छकुलीच्या पर्सचे कौतुक करायचा मोह मी टाळू शकलो नाही. "माझ्या हॅपीबर्थडेला माझ्या ताईने मला दिलीय." असे म्हणून तिने पर्सवरून अलगद हात फिरवला.

पर्स म्हटले की दोन वर्षांच्या छकुलीपासून ते आजीपर्यंत सर्वांच्या जिवाभावाची कधीही साथ न सोडणारी सोबती. पर्सचा इतिहास पाहिल्यास प्राचीन काळापासून ती स्त्रियांची सोबती आहे पण त्या काळीसुध्दा तिचे नाव बटवा असे होते. आजीच्या बटव्याबाबत विविध कथा आपण ऐकतोच. संपुर्ण कुटुंबाची काळजी घेण्याची क्षमता त्यामध्ये असे.

प्रवासात आजी-आजोबांची औषधे, मुलांच्या खेळण्याच्या वस्तू, चष्मे यासारख्या अनेक वस्तू कोणी मागणी करताच ती जादूच्या प्रयोगाप्रमाणे

पर्समधून काढून देत होती व त्यामध्ये ठेवत होती. पर्समध्ये काय काय असते याचा विचार करता त्यामध्ये टिकल्यांची विविध प्रकारची पाकिटे, लिपस्टिक, नेलपेंट, पावडर, कंगवा, सेफ्टीपीन, क्लीप, नवऱ्याचे पैशाचे पाकीट, गाडीची चावी, फोनची डायरी, घरांच्या चाव्या, वेगवेगळ्या प्रकारचे दागिन्यांचे सेट...अशा अनेक वस्तू त्यामध्ये असल्याचे जाणवले. तरीसुध्दा जागा शिल्लक असतेच.

एवढ्या छोट्या पर्समध्ये इतक्या वस्तू कशा बसतात हो? या पर्सचा आकार हा स्त्रीच्या ह्रदयासारखा आहे. ह्रदयामध्ये ती विविध भावना, मानअपमान, आनंद, दुःख, वेदना साठवत असते. चेहऱ्यावर मात्र लवलेशही नसतो. तसेच या पर्सचे थोडेफार आहे.

पिकनिकच्या ठिकाणी पोहोचताच मी सर्वप्रथम एक सुंदर, नक्षीदार नाजूक पर्स खरेदी केली. पत्नीच्या हातात ती देताच तिच्या चेहऱ्यावरील आनंद लपत नव्हता.

## उखाणे आणि म्हणी

१) घाटावरून आला जोगी सात पासोड्या भोगी (कांदा)
२) एवढीशी बीबी चुलीपुढे उभी (फुंकणी )
३) काळी कचुबाई, हिरवी बचुबाई, पांढरा आजोब, उघडी सिताबाई (कात, पान, चुना, सुपारी )
४) पाण्यापेक्षा पातळ विषापेक्षा कडू माझा उखाणा ओळखील त्याला देईन सोन्याचा गडू (धूर)
५) दात विचकते बाजारात बसते असे कोण ( डाळिंब)
६) एवढासा गडू पाहून येते रडू ( कांदा)
७) आकाशातून पडली घार तिला केली ठार, रक्त पिऊ घटाघट, मांस खाऊ मटामटा (नारळ)
८) दोन पायाचा पक्षी तो कठीण फळे भक्षी दाणा खाईना पाणी पिईना (अडकित्ता)
९) राज्याच्या राज्यात नाही माळ्याच्या मळ्यात नाही ,खातात पण तोडीत नाही ( गारांचा पाऊस)
१०) लहानसे झाड त्याला इवलासा दाणा गरज लागली असता धावत जाऊन आणा ( ओवा)
११) काकीला दोन कान, काकाला काही नाही, कांकाचे शहाणपण काकीला येत नाही ( कढई,झारा )
१२) बारा लुगडी नेसली तरी केस उघडे ( मक्याचे कणीस )
१३) अब्बल पेटी तब्बल पेटी कुलूप किल्ली लागेना ज्यांची त्यास उसडेना .(पोट)
१४) भिंतीवरचे गाडगे हालते पण पडत नाही (डोके)
१५) बत्तीस चिरे त्यात नागीण फिरे (जीभ)
१६) एक अधाशी सदा भुकेला, कागद मागतो सदा खायल, बसे एका जागी तिन्ही त्रिकाळ तांबडा शर्ट निळी टोपी (पोस्टाची पेटी )
१७) पांढरा माझा झगा, डोळा माझा लाल उभी राहाते जितकी लहान होते तितकी (मेणबत्ती)

-मृदुला मराठे

# स्त्री–शक्ती

- अनघा मनमोहन रोगे

मुलगा म्हणजे कुलदीपक-वंशाचा दिवा अशी समज पूर्वीपासूनच आपल्याकडे आहे. तसेच मुलगी म्हणजे दुसऱ्याचे धन ही समजूत. मुलगा पुढे कसाही वागला तरी कुणी हसणार नाही पण मुलीचे काही वेडवाकडे पाऊल पडले तर लोक आपल्याला हसतील, घराण्याची इज्जत जाईल, कलंक लागेल अशा मानसिकतेमुळे व समाजाच्या काही वाईट चालीरीती(हुंड्यासारख्या) मुळे मुलगी जन्माला येण्यापूर्वीच तिला मातेच्या गर्भात मारले जाऊ लागले. शहरांपासून गावोगाव दरवर्षी अशा हजारो मुलींची हत्या झाल्याने, त्यांना जन्म देण्यास नाकारल्याने समाजाचा तोल बिघडला. हरियाणा, राजस्थानसारख्या काही राज्यांमध्ये तर इतर राज्यांच्या काही भागात, काही समाजात उपवर मुलांना पत्नी म्हणून मुली मिळेनाशा झाल्यात. परिणामी स्त्रियांवरील अत्याचारात वाढ झाली तेव्हा काही वर्षांपूर्वी सरकारने गर्भलिंग तपासणी विरोधी कायदा केला. कोणताही कायदा समाजातील गैरप्रकार पूर्णपणे थांबवू शकत नाही म्हणूनच तर काही शहरांमधील रुग्णालये व डॉक्टरांवर गर्भलिंग तपासणी केल्याने कारवाई झालीय. बरं गर्भलिंग तपासणी केवळ अशिक्षित, गरीब किंवा मध्यमवर्गीयच करतात असे नसून सुशिक्षित आणि काही प्रतिष्ठित व्यक्तीही चोरून गर्भलिंग तपासणी करतात व आपण आजही जुन्या पारंपरिक विचाराचे आहोत हे दाखवून देतात. हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिध्द नायक-शाहरूख खान याची अशा प्रकरणी चौकशी झाली होती.

**‘आजच्या काळात स्त्री पुरुषांप्रमाणे नोकरी करून घराची आर्थिक जबाबदारी सांभाळते तसेच पूर्ण घराला - कुटुंबाला एकसंध ठेवते. काही स्त्रियांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयही राजकारणात आपले स्थान बनविले आहे.’**

फार पूर्वी आपल्या पूर्वजांनी स्त्री-शक्तीचे महत्त्व ओळखले होते म्हणून त्याकाळी स्त्रियांना समाजात आदराचे स्थान होते. ऋषीमुनींबरोबर त्यांच्या धर्मपत्नी, धर्मकन्या वेदविद्यांचा अभ्यास करीत म्हणूनच विद्वानांच्या सभा मैत्रेयी, गार्गी, कात्यायनी यांच्या विद्वत्ताप्रचुर भाषणांनी विद्वत सभा-परिषदा गाजत होत्या. आपल्या धर्मात-देशात अनेक पराक्रमी स्त्रिया होऊन गेल्या. प्रत्यक्ष रणांगणात भाग घेणारी कैकयी, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी ताराबाई आदी अनेक. त्यानंतर समाजावर हळूहळू पुरुषप्रधान संस्कृतीने पकड घेतली. संपूर्ण भारतवर्षात देवांबरोबरच देवींचीही पूजा केली जाते तिला आदिमाया मानतात पण घरातील स्त्रीला जरी अर्धांगिनी म्हणून गौरविले तरी तिला कसलेही अधिकार न देता स्वयंपाकघरापुरते मर्यादित करून ठेवले. चूल आणि मूल यांच्यापुरतेच तिचे विश्व, तिला कसलेही स्वातंत्र्य नाही, तिला अबला मानले गेले. मुलगी लहान असताना पित्याच्या आज्ञेखाली, मोठी झाल्यावर पतीच्या धाकाखाली आणि वार्धक्यात पुत्राच्या मर्जीनुसार तिला जगावे लागते. पुराणकाळात तारामती, अहिल्या, सीताद्रौपदी परुषी अहंकारात होरपळून निघाल्या. खोट्या कल्पनांचे चटके त्यांना सहन करावे लागले. तारामती परित्यक्ता झाली, अहिलेची शिळा बनली, सीतेच्या नशिबी अग्निपरीक्षा



आणि परित्यक्तापणा आले तर द्रौपदीचे भरसभेत वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न झाला. नवऱ्याच्या मृत्यूनंतर पत्नीला जगण्याचा अधिकार नाकारला गेला. नवरा मेला हा जणूकाही तिचाच दोष. तिची इच्छा असो वा नसो नवऱ्याच्या चितेत तिला ढकलले जायचे. तिचा आक्रोश ऐकू येऊ नये म्हणून जोरजोरात ढोल बडवायचे. इतके पराकोटीचे क्रौर्य धर्माच्या नावाखाली स्त्रियांच्या बाबतीत होत असे. राजा राममोहन रॉय यासारख्यांच्या अथक प्रयत्नांनी ही अमानुष सतीप्रथा बंद झाली. तरीही आज इतक्या वर्षांनंतरही राजस्थानसारख्या काही राज्यांमध्ये अधून-मधून कुणा अबलेला 'सती' गेलेल्या बातम्या कानी पडतातच. सतीप्रथा बंद झाली तरी पतिनिधनानंतर स्त्रियांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाऊ लागले. पुढे आगरकर, महात्मा फुले प्रभृतींच्या चळवळीमुळे केशवपन, स्त्रीशिक्षण बंदीसारख्या प्रथा बंद झाल्या तरी...

...तरी हुंड्यासारखी भयानक प्रथा सुरूच राहिली. प्रबोधनकार केशवराव ठाकरे यांच्यासारख्या समाजसुधारकांनी हुंडा बंदीसाठी खूप प्रयत्न केले. त्यानंतर हुंडाबंदी कायदाही आला तरीही आजसुध्दा भारतात, महाराष्ट्रात हुंडा पध्दत सुरूच आहे. हजारो नववधूंना हुंडा मिळाला नाही किंवा कमी मिळाला म्हणून आपला जीव गमवावा लागतो. कित्येक वधु पित्यांनी हुंड्यापायी आत्महत्या केल्यात. सुनांना सासरी होणारा छळ, जाच बघुन पुढे आपल्या मुलीच्या नशीबी असेच भोग येतील, मुलीला जन्म देणे म्हणजे आयुष्यभर कमावलेला पै-पैसा तिच्या सासरच्या घरी देणे आणि तो देण्यास नसला किंवा कमी दिला तर मुलीला होणारा जाच, छळ तिला जाळून मारण्याचे प्रकार या भीतीने माणसांनी आपल्या घरी मुलींनी जन्मच घेऊ नये म्हणून स्त्रीगर्भाची मातेच्या गर्भातच हत्या सुरू केली. त्याचा परिणाम स्त्रियांचे प्रमाण घटले त्यातून स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रकार वाढले.

महर्षी कर्वे, महात्मा फुले, आगरकरादी समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षणादी अधिकार मिळाले पणे ते मिळवून देताना या महापुरुषांचा समाजाने छळ केला, द्वेष केला पण ते ध्येयापासून ढळले नाहीत. त्यांच्यामुळेच स्त्री शिकू लागली, घराबाहेर पडू लागली. तिला ज्ञानप्राप्ती होऊ लागली. गोपाळराव जोशी यांनी समाजाच्या विरोधाची पर्वा न करता आपली पत्नी आनंदीबाई जोशी यांना स्वतः शिकवून पुढे डॉक्टरी शिक्षणाकरिता परदेशात पाठवले. त्याकाळी एक एकटी स्त्री डॉक्टर होण्यासाठीचा ध्यास घेतला होता, तो आनंदीबाई जोशी यांनी अपार कष्ट, त्रास, मेहनत करून भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर बनून पूर्ण केला. स्त्रिया हळूहळू प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. स्त्री शिक्षणासाठी फुले दाम्पत्यांना समाजाचा सोडाच पण घरच्या मंडळींचाही विरोध होता. तोही त्यांनी मोडून काढला. त्यांनी अमर्याद छळ, निंदा सहन केली म्हणून आजची स्त्री शिकू शकली त्यामुळे आजच्या स्त्रियांनी फुले दाम्पत्याचे कृतज्ञ असायला हवे. त्यांनी स्त्रियांना

शिक्षणाची दारे खुली करून दिल्यानेच स्त्रिया आज शिक्षिका, डॉक्टर, इंजिनीयर्स, पोलिस अधिकारी, वकील, न्यायाधीश, वैमानिक, नाट्य-चित्रपट निर्मात्या, दिग्दर्शिका, अभिनेत्री, विविध प्रकारच्या खेळातील क्रीडापटू, सरपंच, तलाठी, जिल्हाधिकरी, नगरसेविका, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती, संशोधक, अंतराळवीर अशी सर्व महत्त्वाची आणि जबाबदारीची पदे समर्थपणे भुषवू लागल्या. कमळाबाई गोखले या भारताच्या पहिल्या स्त्री अभिनेत्री ठरल्या तर पी.टी.उषा ही भारताची पहिली सुवर्णपदक विजेती महिला क्रीडापटू ठरली. असे असले तरी अजूनही हुंड्यासाठी नववधूंना जाळून मारणे तसेच मुली-स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटना घडतच आहेत. नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना दुय्यम वागणूक, लैंगिक छळ केला जाणे, रस्त्यात वाहनात फिरताना तिला अश्लील बोलून किंवा किळसवाणा स्पर्श करून अपमानित करणे यासारख्या घटना नित्य घडत असल्याचे आपण पाहतो, वाचतो, ऐकतो. काही स्त्रिया अशा प्रकारांना घाबरून आपले जीवन संपवतात पण अशाने त्या नराधमांना काहीच फरक पडत नाही. उलट ते दुसऱ्या स्त्रीची शिकार करण्यास धजावतात. अशावेळी स्त्री संघटनांनी गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आज मेधा पाटकरसारखी एक स्त्री देशभरातील प्रकल्पग्रस्त, विस्थापितांना, पीडितांना, शोषितांना आपली तारणहार वाटते कारण कुणाच्या मदतीशिवाय प्रकल्पग्रस्तांना घेऊन त्या त्यांच्यासाठी वर्षानुवर्षे लढा देत आहेत. कित्येक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्यामुळे न्याय मिळाला. किरण बेदीसारखी एक स्त्री भारतातील पहिली महिला आय.पी.एस. अधिकारी बनते. पोलिस दलात आपला दबदबा तयार करते. तिहार जेलसारख्या तुरुंगातील कैद्यांना शिस्त लावण्याचे काम करते. देशभरात लोकप्रिय होऊन किर्ती मिळविते तिलाही स्त्री असल्याने सेवेतील ज्येष्ठता यादीत डावलले गेल्याने आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागतो. सिंधुताई सपकाळ हे आता नाव राहिलेले नसून कित्येक परित्यक्ता, अबला महिलांसाठी तो मंत्र झालाच. गरोदरपणात नवऱ्याने घराबाहेर हाकलून दिलेली, कुणाचा आधार नसलेली असहाय महिला पुढे काय करू शकते हे सिंधुताईंच्या उदाहरणावरून कळेल. त्यांना कुणीच वाली नसल्याने त्या दिवसा रेल्वे फलाटावर व रात्री स्मशानात सुरक्षितता म्हणून रहात होत्या. लहान मुलीला घेऊन रात्री स्मशानात राहण्याचे धाडस त्यांच्यात कुठून आले ? त्याच निराधार सिंधुताईंनी पुढे आपल्यासारख्या निराधार झालेल्या, अन्याय झालेल्या, नवऱ्याने सोडलेल्या स्त्रियांना आधार देऊन, स्वावलंबी बनवून त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलीच. शिवाय ज्या नवऱ्याने त्यांचा छळ करून त्यांना घराबाहेर काढले त्याच नवऱ्याला त्याच्या वृध्दापकाळात तो निराधार झाला असताना, त्याला आधार देऊन, त्याची सेवाशुश्रुषा करून आपला पत्नीधर्म निभावला. सिंधुताईंनी आधार दिलेल्या स्त्रिया, मुली आज काही ठिकाणी उच्चपदस्थ आहेत. अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे यांनी एकेकाळी



आपल्या भाषणांनी, धरणे, मोर्चा, आंदोलनांनी मुंबई-महाराष्ट्रात जनजागृती केली. लोकांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. मृणाल गोरेंना लोक प्रेमाने लाटणीवाली बाई असेही म्हणत. ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी आपले जीवन बालशिक्षण आणि वनवासी समाजासाठी कार्य करण्यात खर्च केले. व्यक्तिगत आयुष्यापेक्षा वनवासी, आदिवासी जनांची सेवा करून त्यांचे आयुष्य आनंदी, सुखी करण्यास प्राधान्य दिले. सेवाधर्म काय याचे हे उत्तम उदाहरण होय. शिक्षणामुळेच सुजाता मनोहर या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विराजमान झाल्या. प्रतिभाताई पाटील स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी तर अनेक वर्षे भारताच्या पंतप्रधान म्हणून कुशलतेने आणि समर्थपणे देशाचे नेतृत्व केले. त्या भारताच्या यशस्वी पंतप्रधान ठरल्याच पण जागतिक राजकारणातही त्यांनी आपला दबदबा तयार केला होता. सावित्रीने यमदेवाचा पाठलाग करून आपल्या पतीचे सत्यवानाचे प्राण परत आणल्याची आख्यायिका आहे. पुराणकाळातील सावित्रीसारख्या धाडसी स्त्रिया इतिहासातही आढळतात व वर्तमानतही हिरा गवळीण ही त्यातील एक. असामान्य धाडस, पुत्रप्रेमाचा, आईच्या त्यागाचा अलौकिक आविष्कार. किल्ले रायगडाच्या पायथ्याशी राहणारी हिरा एकेदिवशी रात्री रायगडाचे द्वार बंद झाल्याने किल्ल्यातच अडकली. तिला गडाखाली-घरी जाणे अशक्य झाले. अतिकडक सुरक्षा व्यवस्था आणि



काटेकोरपणे नियम पाळायचे बंधन असल्याने कुणीही सैनिक हिराने रडून आर्जवे करूनही गडाचे द्वार उघडेना. (नाहीतर आता शेजारच्या शत्रूराष्ट्राचे नागरिक, अतिरेकी खुलेआम देशात घुसून वास्तव्य करतात, अतिरेकी कारवाया करतात, हजारो निरपराध नागरिकांना कंठस्नान घालतात. देशाची सर्व व्यवस्था, सुरक्षा , शांतता बिघडवतात तरी सरकार-जनता -आपण सर्व शांतच.) हिराचे तान्हे बाळ घरी असल्याने तिच्या जिवाची घालमेल- तडफड सुरू झाली. संपूर्ण गडावर चोख सुरक्षा व्यवस्था असल्याने गडाखाली जाण्यासाठी कुठे वाट मिळते का ते शोधत हिरा गडावर फिरत असताना एका अतिकठीण, दुर्गम असा कड्याजवळ पहारेकरी-सैनिक नसल्याने तिच्या लक्षात आले आणि गड त्याच जागेवरून उतरण्याचा तिने निश्चय केला पण ते प्रत्यक्षात येणे कर्मकठीण होते. रात्रीच्या काळोखात कडा उतरतांना कोणत्याही क्षणी कडेलोट होऊन कपाळमोक्ष होण्याचा धोका होता पण बाळापुढे तिला कुणाचीच अगदी मृत्यूचीही भीती वाटली नव्हती. त्या कड्याजवळ सैनिक नव्हते कारण तो कडा रात्रीच काय पण दिवसाउजेडीही कुणी चढणे-उतरणे शक्य नाही असा शिवाजीराजांचा समज होता. हिराने, एका आईने आपल्या बाळासाठी तो कराळ कडा मिट्ट काळोखात, अंधाऱ्या रात्री बेडरपणे उतरण्यास सुरुवात केली आणि बघता - बघता कडा उतरून एका आईने साक्षात मृत्यूलाही चकित केले. एक अशक्य, जगावेगळा पराक्रम करून

शिवाजीराजांनाही अचंबित केले. शिवाजीराजांनी या शूर, निडर, पराक्रमी हिराचा यथोचित सत्कार करून त्या कड्या वर बुरूज बांधून त्यास हिरकणी बुरूज असे नाव दिले. अशा तऱ्हेने हिरा गवळण इतिहासात अमर झाली. पराक्रमाची, धाडसाची, त्यागाची परम सीमा ठरली.

दोन वर्षांपूर्वी डिसेंबर २०१३ मध्ये बारामतीच्या पिंपळी गावातील ६६ वर्षांच्या ग्रामीण लताबाई भगवान कारे यांनी बारामतीच्या मॅरेथॉन स्पर्धेत जेष्ठांच्या गटात भाग घेण्याचा निश्चय केला तेव्हा त्यांच्या घरच्यांनी, शेजाऱ्यांनी विरेध केला; त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा निश्चय पक्का होता. स्पर्धेच्या ठिकाणी नऊवारी साडी नेसून डोक्यावरून पदर घेतलेली अनवाणी वृध्द स्त्री पाहून लोक आश्चर्यचकित झाले. काहींनी त्यांची चेष्टा केली पण लताबाईंना त्याची पर्वा नव्हती. आपल्या आजारी पतीच्या उपचारार्थ त्यांना १५ सहस्त्र रुपयांची गरज होती त्यासाठी लताबाई पैसे जमवत होत्या व ही स्पर्धा जिंकून ५ सहस्त्र रुपयांचे पारितोषिक जिंकून त्यांना ते पैसे उपचारासाठी हवे होते पण अशा स्पर्धेत धावण्याचा त्यांना सराव नव्हता ना तसा पेहराव. त्यांच्याजवळ होते नवऱ्यावरील निस्सीम प्रेम, स्वतःच्या प्रयत्नांवर - मेहनतीवर निष्ठा, परमेश्वरावर विश्वास. याच बळावर जबरदस्त इच्छाशक्तीने लताबाईंनी स्पर्धेत धावण्यास सरुवात केली आणि पहाता - पहाता त्यांनी अव्वल क्रमांकाने स्पर्धा जिंकून सर्वांना थक्क केले. पौराणिक काळात, इतिहासात जशा पराक्रमी, दृढनिश्चयी स्त्रिया होऊन गेल्या तशा आताच्या काळातही आहेत हेचलताबाईंनी सिध्द केले. कोणत्याही सामान्य स्त्रीने एकदा निश्चय केल्यावर तो ती पूर्ण करतेच कारण स्त्री ही सामान्य नसतेच मुळी हेच यावरून समजते म्हणूनच म्हणतात, 'स्त्री जगली तरच समाज जगेल.' 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी', एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. आज सुशिक्षित स्त्रियांमुळेच त्यांची मुले चांगली शिकू लागलीत. निसर्गाने स्त्रीला ममत्व, वात्सल्य, त्यागाचे वरदान दिले आहे त्यामुळेच ती स्वतःवरील अन्याय सहन करून स्वतःचे मन मारून कुटुंबातील माणसांना आनंदी ठेवते. कुणाच्याही घरातील आई चार दिवसांसाठी घराबाहेर गेली तर त्या घरात गोंधळ उडतो. कुणाला स्वतःची वस्तू वेळेवर, जागेवर सापडत नाही, घराची शिस्त, चौकट बिघडते. मग स्त्री नसेलच तर घर, समाज, देश शिस्तीत राहील काय ? शिस्तच नसेल तर स्थैर्य सुख मिळेल काय ? स्त्री नसेल तर आई, बहीण, पत्नी, मुलगी, मावशी , आत्या, आजी कशा मिळतील ? नव्हे स्त्रीच नसेल तर पुरूषांना जन्म तरी मिळेल काय ? मुली जन्मल्या तरच पुरुषांच्या आई, बहीण, पत्नी, मुलगी बनून त्यांची जीवनभर काळजी घेणार, त्यांच्यावर प्रेम करणार. प्रेमाशिवाय जीवन निरस होईल. व्यर्थ जाईल, स्त्रीविना पुरूष अपूर्णच आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आजच्या काळात वृध्द आई-वडिलांची सेवा शुश्रूषा मुलांपेक्षा जास्त मुलीच करताना दिसतात. काही कुलदीपक तेही श्रीमंत आपल्या





घराला - कुटुंबाला एकसंध ठेवते. काही स्त्रियांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयही राजकारणात आपले स्थान बनविले आहे. आज असे एकही क्षेत्र नाही जेथे स्त्रीने स्वतःला सिध्द केलेले नाही. कल्पना चावला, सुनिता विल्यमसारख्या महिला कित्येक देशातील तरुणींच्या आदर्श बनल्या आहेत. सुनिता विल्यमसारखी मूळ भारतीय वंशाची नारी आज अंतराळ संशोधनासाठी सहा-सहा महिने अंतराळात वास्तव्य करू शकते. असे स्त्रियांचे कर्तृत्व पाहिले की कोण म्हणेल, मुलगी नको? उलट आपल्याला मुलगी आहे याचा अभिमान बाळगून तिला स्वतःच्या पायावर स्वतःचे कर्तृत्व सिध्द करायला प्रत्येक माणसाने तयार असायला हवे.

**नारी नसे दीनवाणी, प्रसंगी होई महिषासुरमर्दिनी !**
**बाळासाठी संजीवनी, चराचराची असे जननी !!**

इंम्पोर्टेड गाडीतून स्वतःच्या वृध्द, आजारी आईला रात्रीच्यावेळी रस्त्यावर टाकून पळून जातात हे आपण वृत्तपत्रात वाचले. कितीतरी वृध्द आई-वडील आज मुलगे असूनही अनाथासारखे वृध्दाश्रमात आहेत तर कितीतरी जण आपल्या मुलीच्या घरी राहतात, मग मुलगा - वंशाचा दिवा काय कामाचा? आपल्या वृध्द आई-वडिलांची अडचण मुलांना आपल्या संसारात होते पण मुलींना ती अडचण वाटत नाही अर्थात वृध्दांच्या या हालाखीस काही प्रमाणात स्त्रिया-सुनाही जबाबदार आहेत म्हणून प्रत्येक स्त्रीने आपल्या सासू-सासऱ्यांच्या जागी आपल्या आई-वडिलांना पाहिले पाहिजे. संपत्तीसाठी, पैशासाठी कित्येक कुलदीपक आज आपल्या आई वडिलांच्या जिवावर उठलेत, कुलनाशक झालेत हे आपण पाहतो. याचा विचार केल्यास मुलगी नकोच हे म्हणणे मुर्खपणाचेच नसून आत्मघाताचेही आहे.

आजच्या काळात स्त्री पुरुषांप्रमाणे नोकरी करून घराची आर्थिक जबाबदारी सांभाळते तसेच पूर्ण

## चारोळी

जीवन आहे खरी कसोटी,
मागे वळून पाहू नका.
येईल तारावया कोणी ,
वाट कोणाची पाहू नका.
हे सारं जग जिंकायचं आहे,
हार कधी मानू नका,
यश तुमच्याजवळ आहे,
जिंकल्याशिवाय थांबू नका.

## थोडं हसा...

**आरती**

गुरुजी : आरती झाल्यावर सगळे गोल गोल का फिरतात?

गण्या : सर, आरतीला कोण कोण आलं आहे ते बघण्यासाठी.

# 'अन्नपूर्णा'

- ज्योत्स्ना सोनाळकर

गेल्या दोन-तीन वर्षांपासून घरखर्चाचा ताळमेळ बिघडतोय हे लक्षात कसे आले नाही याचे नवल आज पुष्पाला वाटत होते. आपल्या दोघांतील चिडचिड वाढत वाढतच आहे, हे तिला कबूल करावेच लागले कारण आज साऱ्याचा कहर झाला होता.

शैल आणि शांभवीच्या शाळेच्या डायरीत ह्या महिन्याची फी वेळेत न भरल्याबद्दल शेरा मिळाला होता. ते वाचून ती हादरलीच. गेल्या दहा वर्षांच्या संसारात मुलांचे शिक्षण, खाणे, खेळ व परवडतील इतके लाड करण्यात पैसा कमी पडला नव्हता. मंगेश लग्न व इतर समारंभाचे, व्हिडिओशूटिंग करायचा. कामानिमित्त नेहमी तो बाहेरच असे. कोणतेही विशेष शिक्षण नसताना आपला गृहिणी हा व्यवसाय ती चोख पार पाडत होती. आपण हे सर्व इतक्या क्षमतेने करू शकता ह्याचे तिलाच भान नव्हते. नेहमी तिच्या कर्तव्यदक्षतेचे सासरी-माहेरी कौतुक होत असे. कस्तुरीमृगाला कस्तुरीच्या सुगंधाचा ठाव नसावा तसे पुष्पाला आपल्या नियोजनबद्दलचा ठाव नव्हता.

मग आज काय बिनसले? असे झालेच कसे? पावणेबारा वाजले होते. शाळेची फी भरावयाची आहेच पण पर्समध्ये पुरेसे पैसे नव्हते, काल रात्रीच डायरी पाहिली असती तर मंगेशकडून पैसे मागून घेतले असते! पण तो आज पहाटेच चार दिवसांकरता बाहेर गेलाय.

कपाटाचे कोपरे, जुन्या पर्सचे खण, पॅन्टचे खिसे सारे तपासून झाले व एकदाची रक्कम जमा झाली. फी वेळेत भरली गेली पण तो दिवस पुष्पाला बरेच काही शिकवून गेला.

पुढील सारा दिवस गेल्या महिन्याभरातले संवाद ती आठवत राहिली.

'मंगेश, आज मिलिंदच्या मुलाचा पहिला वाढदिवस तू गेला नाहीस?' 'नाही त्याचा फोन आला नाही. त्याच्या मेव्हण्याने सिंगापूरहून कॅमेरा आणलाय. तो घरीच फोटो काढणार.'

**'आता छोटे कॅमेरे आलेत. त्याने घरीच कोणीही शूटींग करू शकते. तेवढीच आपली ऑर्डर कमी होते.'**

'आता छोटे कॅमेरे आलेत. त्याने घरीच कोणीही शूटींग करू शकते. तेवढीच आपली ऑर्डर कमी होते.'

'मग आपण नवा कॅमेरा का आणत नाही? बघतोय, हा कॅमेरा विकून दुसरा घ्यावा का?' संवाद नेहमीचेच पण आज ते धोक्याची घंटा वाजावी तसे डोक्यात आपटून घाव घालत होते.

आज तो भरभराटीचा व्यवसाय आहे तो उदय नसू शकतो? आज सर्व खर्च भागवणारे काम उद्या नसेलच तर? आता चाळिशीत व्यवसाय बदलायचा? नवे करावे काय?

"मी नोकरी करू का?"

"मुलांचे कोण करील?"

"अरे, पण मुलांच्या भविष्यासाठीच..."

"मी आहे नं? विश्वास ठेव."

"आहे रे विश्वास, पण महागाई व वाढत्या गरजा.... मी तुला काहीच मदत करू शकत नाही हा

विचार मला अस्वस्थ करतो."

संवादाची तीव्रता वाढत होती. प्रश्न अगदी उंबरठ्याबाहेर उभा होता व केव्हाही इतक्या वर्षांचा जपलेला संसार उद्ध्वस्त करणार हे दिसत होते. मन डगमगले की जे करायला हवे तेच तिने केले. " आई जिवती माझ्या मुलांच्या गरजा पूर्ण करण्याचे बळ मला दे." दोन्ही हात जोडून ती प्रर्थना करतच राहिली आणि...

दारावरची बेल वाजली. ह्या वेळेस कोणी अनोळखीच असावे म्हणून खबरदारीचा भाग म्हणून तिने खिडकीतून बाहेर पाहिले. वयस्कर गृहस्थ दारात उभे होते. कडेवर चार वर्षांची मुलगी रडत होती.

"थोडं उकळवलेलं पाणी मिळेल का एक ग्लास," घाम पुसत ते म्हणाले. शेजारी मॅटर्निटी होममध्ये माझ्या सुनेला ॲडमिट केले आहे.

प्रथमदर्शनीच सज्जन वाटणाऱ्या त्या आजोबांसाठी दार उघडत या बसा ना असे म्हणत तिने पाणी आणून दिले.

"भूक लागली आजोबा" ती छोटी त्यांचा शर्ट ओढत सांगत होती.

भानावर येत माणुसकीच्या नात्याने पुष्पाने



विचारले, "वरण-भात खातेस ?" दोन मुलांची आई असण्याचा अनुभव तिला गप्प बसू देईना. भुकेच्या वेळेला गरम वरणभात खाऊन ती तान्ही निरागस मुलगी पंख्याच्या गारव्यात झोपून पण गेली.

"हिचे वडील."

"सुनेला अचानक त्रास सुरू झाला. आमच्या घरात कोणी बाईमाणूस नाही. घाबरून आम्ही सुनेला इथे ॲडमिट केली, नाहीतर ती माहेरीच जाणार होती पुढच्या आठवड्यात. माझा मुलगा औषधांसाठी धावपळ करतोय, ही आईशिवाय राहीना."

"तुम्हांला देऊ का चहा-पाणी ?"

"चालेल... " खूप संकोचाने ते बोलले.

"खरं तर माझी सकाळी औषधे घ्यायची राहिली आहेत...असले तर एखाद -दोन बिस्किट द्या." चहा बिस्किट औषधे झाल्यावर आजोबा स्थिरावले. झोप झाल्यावर ती मुलगी शांभवीबरोबर खेळत राहिली.

पूर्ण संध्याकाळ आजोबा रस्त्यावर फिरत राहिले. रात्री उशिरा बाळ जन्माला आले. नातू झाला म्हणून पेढे द्यायला आजोबा आले तेव्हा त्यांचा आवाज कापत होता.

"कमी दिवसांचा झाला. दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये इन्कुबेटरमध्ये ठेवावे लागले."

पुढील तीन दिवस त्या कुटुंबाची फरफट व आनंद ह्यात पुष्पा नकळत सहभागी झाली. त्यानंतर दोनच दिवसांत "आम्हांलाही दोन कप चहा द्याल का ? एवढी बॅग ठेवू का ? थोडा वेळ आमच्या सासुबाईंना बसू दे का ? त्यांना फार काळ उभे राहावत नाही. फार चांगले काम करताय तुम्ही. भुकेच्या वेळेला साधे जेवण. पेशंटच्या मागे धावणाऱ्या नातेवाईकांना वेळेला पोटभर जेवण मिळाले तर अजून काय हवे ? किती द्यायचे पैसे ?"

"पैसे कसले ?" पुष्पाला हात पुढे करवेना, मेहनत आहे तुमची! नाही म्हणू नका. घ्या. मुलांना खाऊ म्हणून समजा. हातातली शंभराची नोट व जाताना अन्नपूर्णा सुखी भव असे त्यांचे आशिर्वाद. पुष्पाला खूप बरे वाटले.

दौऱ्यावरून आल्यावर मंगेशला हे सांगताना तिचा चेहरा चमकत होता. "आपण हे करू शकतो. लग्नाचे फोटो रोज नसतात पण भूक तर रोजच लागते. काय हरकत आहे हे असेच चालू ठेवले तर ?"

"तुला झेपणार आहे का हे? एकटीच करणार सर्व ?" मंगेशने आपला सहभाग नसणार हे त्याच्या पध्दतीने स्पष्ट केले.

"चांगले झाले तर दोन बायका ठेवीन." पुष्पाचा निर्धार नशीब बदलवणारा ठरला. त्यानंतर पुढील तीस वर्षे राहत्या घरीच वेगवेगळ्या हॉस्पिटलमधील पेशंटना त्यांच्या डॉक्टरच्या सल्ल्यानुसार जेवण पुरवण्याचे कंत्राट तिने मिळवले. शिवाय वयोवृध्दांना घरपोच सात्त्विक जेवण. कॅटरिंग, हॉटेल, लग्नाचे हॉल...

आज यशस्वी उद्योजिका हा पुरस्कार स्वीकारताना चार शब्द बोलायला सुचवल्यावर ती म्हणाली. "कोणताही व्यवसाय हा कालबाह्य ठरू शकतो. समाजाच्या गरजा बदलतात. आजची नोकरी उद्या असेलच असे होऊ शकत नाही. त्यामुळे एकाच्या कमाईवर विसंबून राहू नका. गरज असो वा नसो कमावत राहा, आपल्या लेकरांसाठी जिवती व्हा. अन्नपूर्णा व्हा."

## फक्त हसा

१. माणूस जर माकडापासून उत्क्रांत झाला असेल तर आजही माकडे कशी आहेत ?

२. अनुभवी डॉक्टरही कुठेतरी 'प्रक्टीस' कसे करतात ?

३. शेंगदाणा तेल- शेंगदाण्यापासून, सूर्यफूल तेल -सूर्यफुलापासून तर मग बेबी ऑईल कशापासून बनवतात ?

४. प्रकाशाचा वेग माहिती आहे.... अंधाराचा किती असतो ?

५. गोल पिझ्झा नेहमीच चौकोनी पॅकमध्ये का पाठवतात ?

६. जंगल मॅन टारझनला दाढी कशी काय नव्हती ?

७. 'फ्री गिफ्ट' म्हणजे काय ? गिफ्ट फ्रीच असतात ना ?

८. ५ मधील ४ लोक डायरियाने त्रस्त आहेत...म्हणजे ५ वा काय डायरियाचा आनंद घेतोय काय ?...

९. जर आपला जन्म इतरांची मदत करण्यासाठी झाला असेल तर इतर लोक कशासाठी जन्मलेत ?

१०. 'पार्टी' संपल्यानंतर एखादीतरी मुलगी रडताना का दिसते ?

११. कंप्युटर बंद करण्यासाठी स्टार्ट वर का क्लिक करावे लागते ?

१२. २१- ट्वेंटी वन, ३१ - थर्टीवन, मग ११-वन्टी वन का नाही ?

# चिंता

**- आशा खिल्लारे**

सकाळीच रजनीची धावपळ चालली होती. लवकरच स्वयंपाक करून बाहेर पडावे लागणार होते. पोळ्या लाटत असतानाच मध्येच फ्रिज उघडून भाजी काढण्यासाठी रजनी फ्रिजजवळ गेली व मी फ्रिज कशासाठी उघडला हेच क्षणभर तिला आठवत नव्हते .क्षणभर थांबून तिने फ्रिजमधून भाजी काढली.
थोपर्यंत तव्यावर टाकलेली पोळी करपून गेली होती.

मला स्वतःचा खूप राग येत होता .आयुष्यभर ही धावपळ . एकाच वेळी मेंदूने अनेक कामे करावी व तो कुणा कुणाचे आदेश पाळणार.भांबावूनजात असेल बिचारा मेंदु म्हणून तर काही सुचत नसावे आपल्याला. रजनी मनाशीच पुटपुटली.

तशीच तयार होऊन रजनी बाहेर पडली. झटपट पावले उचलण्याच्या प्रयत्नांत तिची चप्पल तुटली. घाईघाईने दुसरी चप्पल घालून झपाझप पावले टाकत चालू लागली ,काय हे आयुष्य खडतर ,आपल्याच नशिबी असे भोग का यावेत ? याचाच ती विचार करत चालू लागली. कशीबशी बस पकडून मिळालेल्या जागेवर बसली शेजारीच तिची मैत्रीण सुधा बसली होती, बऱ्याच दिवसानंतर सुधा भेटली होती. तिला पाहून रजनीच्या डोळ्यांत पाणी आले

"काय ग ? रजनी ,तुझा चेहरा एवढा निराश का झालाय ?"

काही नाही गं ? आज माझी मुले हॉस्टेलमधून घरी येणार आहेत. मला लवकर कामावरून परतावे लागेल.

रजनीची दोन्ही मुलं अंध होती म्हणून ती विशेष शाळेत शिकत होती.आठवड्यातून एकदा त्यांना घरी आणणे त्यांना आवडते ते खाऊ घालणे.त्यांचे आठवड्यांचे कपडे धुवुन इस्त्री करून देणे त्यातच कामावर जाणे, श्रमिक व वेदनादायी चालले होते.

खरे तर, मी तिची अवस्था-वेदना, प्रयास, दुःख जवळून पाहीली होती ती एक आईच नव्हती तर एक विशेष आई होती. आई होण खूप सोप असते.परंतू रजनीसारखी आई होण खुपच कठीण असते.हो मी अगदी जवळून पाहीले होते.

**"धन्य तो आईचा जन्म .परमेश्वराला पुन्हा जन्म घेता आला नाही म्हणून तर त्याने आईला धर्तीवर पाठवले म्हणतात. ते अगदी खरेच आहे. आत्मा आणि ईश्वर सारेच आहे ना."**

मला आठवते ,रजनी तिच्या बाळाची आई झाल्यावर आनंदाने फुलून गेली होती.

रजनीला सातव्या महीन्यात जुळे मुले झाली होती. कमी वजनाचे व कमी दिवसाचे त्यातही जुळे त्यांना वाढवण्यात रजनीचे विशेष परीश्रम घेतले होते. त्यातच दररोज हॉस्पीटलच्या फेऱ्या, आजारपण, कमी प्रतिकार शक्ती असल्यामुळे बाळांना वारंवार होणारा जंतू संसर्ग या सर्व कारणांनी तिची होणारी ससेहोलपट सारे काही विशेषच होते.

प्रत्येक बाळाने पहावे,बोलावे,ऐकावे याकडे तिचे



विशेष लक्ष असे. परंतु आपल्या बाळांना एवढे टवटवीत डोळे असुन देखील दोघेही अंध आहेत हे जेव्हा डॉक्टरकडून कळले. तेव्हा तिला खुपच दुःख झाले. जिवाच्या वेदनेने तिने मजजवळ हंबरडा फोडला होता. म्हणजे दोघीही जुळ्यांना दृष्टीच नव्हती. मुलांच दृष्टीहीन होण म्हणजे रजनीला सार जगच अंधकारमय वाटायला लागले होते.तरीही मनाला धीर देऊन मुलांना वाढवण्यासाठी विशेष परीश्रम घेतले होते.

रजनीला खुपच भरून आले होत .काय ग ?काय झाले बोल काहीतरी .मी आपले बळेच बोलण्याचा प्रयत्न केला.मीतरी तिचे दुःख कसे पचवू शकेल व ऐकू शकेल हे मला कळत नव्हते.

रजनी म्हणाली , "सुधा आजकाल मी फारच वैचारीकदृष्ट्या कमकुवत झाले आहे. मी माझी विचार करण्याची शक्तीच नाहीशी झाली असे वाटते. सतत या अंध मुलांच्या भवीष्याचा विचार करून झोपच येत नाही. त्यामुळे जिवन जगण्याची ऊर्जाच नाहीशी होत चाललीय माझी."

"नको ग ? जास्त विचार करूस .परमेश्वराने जन्म दिलाय तर तोच सांभाळणार."मी आपला समजावण्याचा प्रयत्न करत होते.

नाही मला काहीही सुचत नाही. माझ्यानंतर माझ्या मुलांचे काय होईल या चिंतेनेच मला जिंवतपणी चितेवर ठेवले आहे. व मी प्राणांच्या वेदनेने चिंतेच्या आगीत होरपळते आहे.आजकाल तर मी बधीर होत आहे. ह्या स्वार्थी जगात आपल्या विकलांग मुलांचा टिकाव कसा लागेल. या विचारांनी मला ग्रासले आहे.

सतत विचार करून मला जीवनात काही अर्थ उरला नाही असे वाटते. मी तीला म्हणाले अग ? उगीचच विचार करण्याणे परिस्थितीत काही बदल होणार आहे का ? प्रत्येकाल आपल्या परीने जीवन जगावेच लागते.

रजनी म्हणाली , मला आजकाल काय होते मलाच समजत नाही.परंतु मन सदैव एका अनामिक भितीने ग्रासले आहे. दिवसरात्र मी मुलांचा विचार करीत असते. माझ्यानंतर माझ्या मुलांचं काय होईल ?त्यांना तर सर्व जगच अंधकार मय आहे.परंतू मी त्यांच्या जगण्याचा आधार जर नसेल तर त्यांचे जीवन कोण फुलवणार.साधे जेवन कोण देणार, बाळ इथे भाजी आहे. इथे या बाजूला वरण आहे. पोळेल बरं का ? जरा जपून .दुधावा ग्लास गरम आहे या बाजूने हळूच पकड असे किती आणि कोण सांगणार या विवंचेत मलाच वेड लागण्याची पाळी आलीय मी सतत चिंताग्रस्त होत चाललेय .काय करावे सुधा,काहीच कळत नाही.

याच विचारात रजनीचा स्टॉप कधी आला कळलेच नाही. रजनी माझा निरोप घेऊन बसमधून उतरून पावले चालू लागली .मी मात्र बसमधून तिच्या पाठमोऱ्या

आकृतीकडे डोळे भरून पहात होते. खरेच तिची खुपच होरपळ होत असेल हे माझ्या लक्षात आले होते. हळूच डबडबलेले डोळे हातातील रुमालाने पुसले .पण मन मात्र रजनीच्या विचारात मग्न झाले होते.

खरचं जे आवडले ते मिळते ते यश व जे मिळते ते आवडायला लागते हे सूख असे रजनी मला म्हणायची.तर जे आवडते ते मिळाले नाही व जे मिळाले ते आवडत नाही यालाच काय दैवी दर्विलास म्हणावा का ?मी स्वतःशीच पुटपूटले.

धन्य तो आईचा जन्म .परमेश्वराला पुन्हा जन्म घेता आला नाही म्हणून तर त्याने आईला धर्तीवर पाठवले म्हणतात. ते अगदी खरेच आहे. आत्मा आणि ईश्वर सारेच आहे ना. रजनीला सारे काही सहन करण्याची शक्ती देवो. याच विचारात माझा स्टॉप आला व मी बसमधून उतरून कार्यालयाच्या दिशेने भराभर पाऊले टाकत जात होते.आणि मन मात्र रजनीच्याच विचारात गढून गेले होते. व म्हणत होते.

अंधाराची खंत तू कशाला करिशी रे...
गा प्रकाशगीत.

## मुली लग्न का करतात....

१) एकातरी पुरूषाला जन्माची अद्दल घडविण्यासाठी...
२) गुलाम ठेवणे बेकायदेशीर आहे म्हणून...
३) जीवन अर्थपूर्ण बनवण्यासाठी एक फायदेशीर गुंतवणूक म्हणून...
४) पुरुष किती वाईट असतात याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन रडण्यासाठी...
५) आई-बापावर दया करण्यासाठी...
६) मैत्रिणीने केले मग मी का नको ?
७) नवीन नवीन डिझाइनची मंगळसूत्रे घालावयास मिळावीत म्हणून...
८) नवऱ्याच्या जिवावर मुलांची हौस भागवता यावी म्हणून...
९) मुक्त होण्यासाठी लग्नच केले नाही तर मुक्ती कोणापासून मिळविणार...
१०) आपल्या पाककृतीचे भन्नाट प्रयोग ज्याच्यावर बिनबोभाट करता यावेत असा हक्काचा बकरा मिळण्यासाठी...
११) लग्नानंतर मुली उजळतात म्हणे...फेअरनेस क्रीम फासून फासून थकल्यावर शेवटचा एक झालीम उपाय...

## विमबार

पप्पा : आज चिकन आणलं पण लिंबू नाही...
झम्प्या : जाऊ द्या ना आता, नवीन विमबार आलाय. त्यात १०० लिंबांची शक्ती आहे. तेच टाका दोन थेंब!

# बहुगुणी मीठ

- साक्षी पाटील

असं म्हणतात की, मिठाचे १४००० पेक्षा जास्त उपयोग आहेत. एवढे माहीत असणं शक्यच नाही. पण काही थोडे उपयोग असे आहेत की, आपल्या स्वयंपाकघरापासून ते बाथरूमपर्यंतचे अनेक प्रश्न मिठानं सुटू शकतात. भाज्या किंवा पास्ता पाण्यात उकळवताना त्या पाण्यात थोडं मीठ घालण्याची पध्दत आहे. ज्या प्रमाणात मीठ घातलं जातं त्यामुळे पाण्याच्या उत्कलन बिंदूमधे अजिबात वाढ होत नाही त्यामुळे शिजण्याच्या वेळेत काहीच फरक पडत नाही फक्त पदार्थाचा स्वाद वाढतो.

मिठामुळे साखरेची गोडी जास्त लागते म्हणून काही ठिकाणी श्रीखंडात अगदी थोडंसं मीठ घालण्याची पध्दत आहे.
लिंबाच्या सरबतात, कोकम सरबतात, पन्ह्यामध्ये, नारळाच्या दुधात थोडंसं मीठ घातल्याने स्वाद वाढतो. कणकेत किंवा भाकरीच्या पिठातही चवीपुरतं मीठ घालण्याची पध्दत आहे.

**मिठामुळे साखरेची गोडी जास्त लागते म्हणून काही ठिकाणी श्रीखंडात अगदी थोडंसं मीठ घालण्याची पध्दत आहे.**

२ चमचे जिरेपूड, २ चमचे पादेलोणाची पूड, १ चमचा हिंगपूड व १ चमचा साधं मीठ किंवा शेंदेलोणाची पूड असं एकत्र करून ठेवावं. ताक, लिंबूपाणी यामध्ये किंवा फळांच्या तुकड्यांवर अथवा सॅडलवर घालून खावं. पचनासाठी उत्तम आणि रुची चाढवणारं आहे. यात कधी कधी १ चमचा सुंठपूडही घातली जाते, तर कधी कधी थोडी मिरपूड घातली जाते.

केक, बिस्किटं यांसारखे उच्च तपमान लागणारे पदार्थ करताना शक्यतो साधं मीठ वापरावं. आयोडीनयुक्त मीठ वापरू नये. उच्च तपमानाला पोटॅशिअम आयोडाईडची रासायनिक विक्रिया होऊन आायेडिन तयार होण्याची शक्यता असते. ज्यामुळे पदार्थांना उग्र वास येऊ शकतो. आम्लधर्मी पदार्थांच्या संपर्कात आल्यावरही पोटॅशिअम आयोडाईडची विक्रिया होऊन आयोडीन तयार होऊ शकतं. त्यामुळे कैरीची आणि लिंबाच्या रसातली लोणची व व्हिनेगर घातलेल्या चटण्या व लोणची यासाठी आयोडीनयुक्त मीठ वापरू नये.
पॉपकॉर्न, खारे काजू यांसाठी अगदी बारीक मीठ लागतं. मार्गरिटासारख्या ड्रिंक्सच्या ग्लासेसना वरच्या काठाला लावण्यासाठी थोडं जाड मीठ लागतं. असं मीठ लावण्यासाठी प्रथम ग्लासाच्या काठाला लिंबाचा रस लावावा. मग एका बशीत मीठ घालून त्यात तो ग्लास उघडा ठेवावा म्हणजे सगळीकडे काठावर मीठ नीट चिकटतं. मीठ फार बारीक असेल तर ते चिकटत नाही, विरघळून जातं.

घरी आइस्क्रीम पॉटमध्ये आइस्क्रीम बनवताना ते गोठण्यासाठी बर्फात खडेमीठ घालतात. खडेमिठाचे कण मोठे असल्यानं त्यांचं बर्फाच्या संपर्कात येणारं पृष्ठभागीय क्षेत्रफळ कमी असतं त्यामुळे ते पाण्यात हळूहळू विरघळतात व त्यामुळे बर्फ, पाणी आणि मीठ या मिश्रणाचं तपमान हळूहळू कमी होतं. त्यामुळे आइस्क्रीमच्या मिश्रणाचं तपमान हळूहळू कमी होऊन

पंखा भांड्यात बराच वेळ फिरत राहिल्यानं मिश्रणात हवा चांगल्या प्रकारे मिसळली जाऊन आइस्क्रीम मुलायम व हलकं होतं.

पाच किलो बर्फाला एक किलो मीठ पुरते. जास्त मीठ घातल्यास बर्फ, मीठ व पाणी हे मिश्रण लवकर थंड होतं आणि त्यामुळे आइस्क्रीम फार लवकर थंड होतं. त्यामुळे त्यात बर्फाचे जाड कण तयार होतात. बारीक मीठ वापरायचं असल्यास आइस्क्रीम मुलायम होईल. हे करावं लागतं कारण बारीक मीठ लवकर विरघळतं. व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं तांब्या, पितळेची भांडी उजळू शकतात. मिठाचा संपृक्त द्राव स्वयंपाकघरातील सिंकमध्ये ओतला तर तेलकटपणा जातो आणि घाणेरडा वास येत नाही. लाकडी टेबलावर गरम थाळ्या किंवा पाणी यामुळे पडलेले पांढरे डाग मीठ आणि तेल यांच्या मिश्रणानं जातात. थोडं मीठ घातलेल्या थंड पाण्यात सफरचंदाच्या, पेअरच्या, बटाट्याच्या फोडी टाकल्यास त्यांचा रंग तसाच राहतो. या गोष्टी अख्ख्या मिठाच्या थंड पाण्यात बुडवल्या तर त्यांची साल काढल्यावरही रंग तसाच राहतो. पालकसारख्या भाज्या मिठाच्या पाण्यात धुतल्या तर लवकर स्वच्छ होतात.

मीठ सूक्ष्मजीवविरोधी असल्यानं मिठाच्या पाण्याच्या गुळण्यांमुळे घशाला आराम पडतो.


१ चमचा अगदी बारीक मीठ आणि २ चमचे बेकिंग सोडा एकत्र करून त्या मिश्रणानं दात घासल्यास ते पांढरेशुभ्र होण्यास मदत होते आणि हिरड्यासुध्दा मजबूत होतात.

थकवा किंवा एखादेवेळेस आपण खूप दमतो आणि विशेषत: पाय खूप दुखतात अशावेळी मूठभर मीठ घातलेल्या गरम पाण्यात पाय बुडवून ठेवल्यास पायांना आराम वाटतो. मिठाचं पाणी असलेल्या टबमध्ये थोडा वेळ बसलं तर संपूर्ण शरीराचा थकवा जातो.

अंघोळीनंतर त्वचा ओली असताना कोरड्या मिठानं घासली असता मृत त्वचा निघून जाते आणि रक्ताभिसरण वाढते. हा मसाज झाल्यावर पुन्हा अंग पाण्यानं स्वच्छ करावं.

मधमाशी चावल्यास तो भाग ओला करून त्यावर मीठ लावल्यास वेदना कमी होतात. डास किंवा किडा चावल्यास तो भाग प्रथम मिठाच्या पाण्यात बुडवावा आणि नंतर त्या जागी तूप आणि मीठ यांचं मिश्रण लावावं.

आपल्या गॅसच्या शेगडीजवळ मिठाची बरणी कायम ठेवावी. एखादे वेळेस तेलानं पेट घेतला तर ज्वाळेवर मीठ टाकावं पाणी अजिबात टाकू नये. आपण पाण्यात फुलं घालून ती फ्लॉवरपॉटमध्ये ठेवतो त्यामुळे फ्लॉवरपॉटमध्ये डाग पडतात ते घालविण्यासाठी त्यावर मीठ चोळावं. काही वेळा फ्लॉवरपॉटमध्ये खोलवर आपला हात पोचू शकत नाही अशावेळी मिठाच्या जवळजवळ संपृक्तद्राव पुष्पपात्रात ओतून ते



चांगलं हलवावं मग तो द्राव ओतून देऊन साबणाच्या पाण्यानं पुष्पपात्र धुवावं. असं केल्यानं फ्लॉवरपॉट डागविरहित होतो आणि त्याला वासही येत नाही. फ्लॉवरपॉटमधील पाण्यात थोडं मीठ घालून मग त्यात फुलं ठेवली तर ती जास्त काळ ताजीतवानी राहतात.

व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं कपावरचे चहा- कॉफीचे डाग जातात.

बिडाच्या तव्यावर डोसे करताना काही वेळा डोसा तव्याला चिकटून तवा खराब होतो अशा वेळी तो तवा मिठानं घासल्यास एकदम स्वच्छ होतो आणि मग डोसे चिकटत नाहीत.

कांदा-लसणाचा वास हाताला येत असल्यास व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं हात घासल्यास तो वास जातो.

चीजवर बुरशी येऊ नये म्हणून मिठाच्या पाण्यात कापड बुडवून त्यात चीज गुंडाळून मग फ्रीजमध्ये ठेवावं.

मिरच्या, आलं, लसूण वगैरे मिक्सरमध्ये किंवा पाट्यावर वाटताना त्यात थोडं मीठ घातलं तर ते वाटण जास्त सोपं जातं.

आपला नेहमीचा झाडू जास्त टिकण्यासाठी तो नवीन असताना त्याची टोकं एका मीठ घातलेल्या गरम पाणी असलेल्या बादलीत बुडवून ठेवावीत. वीस मिनिटांनी बाहेर काढून झाडू वाळू द्यावा, वाळला की वापरायला काढावा.

आपण स्वयंपाकघरात आणि इतरत्र स्वच्छतेसाठी वापरत असलेले स्पंज खराब होतात. ते पूर्ववत होण्यासाठी १ लिटर पाण्यात पाव कप मीठ घालून त्या पाण्यात बुडवून ठेवावेत. रात्रभर ठेवून सकाळी बाहेर काढावेत. कोरडे करून वापरावेत.

कॅनव्हासच्या बुटांना उन्हाळ्यात वास येऊ लागतो तो येऊ नये म्हणून त्या बुटांमध्ये थोडं मीठ शिंपडावं. ते मीठ आर्द्रता शोषून घेतं आणि घामाचा वास येत नाही.

कचऱ्याच्या डब्याला वास येऊ नये म्हणून त्यातही मीठ शिंपडून ठेवलं तर फायदा होतो.

कधी कधी दूध करपतं किंवा एनॅमलच्या भांड्यात एखादा पदार्थ करपतो. करपलेल्या दुधाचा वास जाण्यासाठी पातेलं ओलं करून त्यात मीठ शिंपडावं. दहा मिनिटांनी पातेलं घासावं. एनॅमलच्या भांड्यातले करपलेले डाग जाण्यासाठी ते भांडं मिठाच्या पाण्यात रात्रभर ठेवावं. दुसऱ्या दिवशी त्या भांड्यात मिठाचं पाणी उकळवावं डाग जातील.

---

## चारोळ्या

१.तुझ्या आठवणी जागवताना
मन मोर होऊन जाते,
पण वास्तवाचे भान होताच
जीवन वैशाखवणवा वाटू लागते...

२.आजही तुझ्या स्मृतींचा
बेधुंद वळीव बरसतो आहे,
नि आजही मी त्याच नवलाईने
त्यामध्ये चिंब भिजत आहे...


३.तुझी आठवण आली की,
मन मोरपीस होऊन जाते,
अन् स्वप्नांच्या हिंदोळ्यावर
ते अलवार विहरत राहते..

**- ज्योती जाधव**


# मॅच

- शुभांगी निमकर

आज रविवार असूनही मीना सकाळी जरा वेळेतच उठली. सगळे प्रात:विधी उरकले. दूध गरम करण झाले. एकदा ती पतिराजांना हाका मारून आली आणि लगबगीने मुलांच्या खोलीत जाऊन मुलांना हलवून आली. आज फायनल मॅच आहे ना, सगळ्यांनी लवकर उठा. मग ती दिवाणखान्यात पेपर वाचत बसली. थोड्या वेळाने पुन्हा ती पतिराजांना उठावायला गेली, तर डोक्यावरून पांघरूण ओढून घेऊन स्वारी पुन्हा ढाराढूर झालेली. मुलांना गदागदा हलवले पण कोणीच उठेना. कूस बदलून पुन्हा सगळे झोपी गेले.




नऊ वाजता अखेरीस हळूहळू सर्वजण खोलीतून बाहेर आले. चहा, दूध, नाश्ता, आंघोळी हे सर्व उरकता उरकता अकरा कधी वाजून गेले ते कळलेच नाही.आता देवपूजा करून पटापट स्वयंपाकाला लागले पाहिजे. तरच आज दोन वाजता फायनल मॅच पहायला टीव्ही समोर बसता येईल. अशी विचारात तल्लीन होऊनच बागेतील फुले तोडून देवपूजेला बसली. सर्वजण आपापले उरकून घराबाहेर पडले एवढ्यात दारावरची बेल वाजली. दार उघडले तर मुलाचा मित्र त्याला खेळायला बोलवायला आला होता. तो बिल्डिंगध्येच कोणाकडे तरी खेळायला गेलाय असे सांगून त्याला पिटाळून लावले. पुन्हा नव्या जोमाने मीना कामाला लागली. विळीवर ठाण मांडून भाजी चिरायला हातात घेतली आणि पुन्हा बेलचा आवाज कानात घुमला. हातातली भाजी खाली ठेवून जमिनीवर हात टेकत कसरत करत घाईघाईत उठून उभी राहिली. जरा घुश्शातच दार उघडले, तर दोन दिवसापासून ज्या मेकॅनिकची वाट पाहत होती तो फ्रीज रिपेअर करणारा उभा होता. एक क्षण मनात असाच विचार आला की ह्याला आत्ता नाहीच सांगावे, उद्या ये पण ही जीवघेणी गरमी आणि थंड पाणी प्यायला नसल्यामुळे जीव आधीच कासावीस झाला होता. त्यामुळे आज हा हजर झालाय तर येऊच दे म्हणून त्याला आत घेतले. हो आणि हा फ्रीज तर स्वयंपाकघरातच थाटात उभा होता. म्हणजे मेकॅनिक काम करेपर्यंत तिला दिवाणखान्यातच बसाणे भाग होते. आजकाल स्वयंपाकघर इतके लहान असते की एकावेळी दोघांनी तिथे काम करणे शक्यच नाही. म्हणून भाजीचे ताट व विळी घेऊन ती बाहेर येऊन बसली. टीव्हीवरचे कार्यक्रम बघतबघत भाजी चिरून झाली. मेकॅनिक त्याच्या बॅगमधील सामान पसरून व फ्रीजचे एकेक अंग जमिनीवर काढून ठेवत होता. ती वॉशिंग मशीन सुरू करून आली, एकीकडे कपडे धुवून होतील म्हणून. मधूनच स्वयंपाकघरात डोकावत होती. मेकॅनिक फ्रीजच्या रेग्युलेटर मधील बारीकबारीक वायर काढून परत लावण्यात गुंतला होता. तिचे कपडे धुवून वाळतही घालून झाले. मग मात्र मीनाचा जीव भांड्यात



पडला, कारण आता मेकॅनिक आपली शस्त्रे गोळा करून बॅगेत भरत होता. तो गेला आणि तिने धाडकन दार लावून घेतले. झरझर केर काढून जमीन पुसून स्वच्छ केली. घड्याळाची स्वारी भिंतीवर बसून आपले दोन्ही हात सरावाने गोल गोल फिरवीत होती. परंतु मीनाला मात्र प्रत्येक क्षेत्रात क्षेत्ररक्षण करून नाकी नऊ आले होते. टीव्ही चालू केला तर पूर्ण स्टेडियम प्रेक्षकांनी भरले होते. एव्हाना कॉमन्टेटरही हातात माईक पकडून आपले तोंड चालवत होते. मग मात्र तिचा संयम सुटला, चिरलेलली भाजी जाळीच्या पिशवीत भरून फ्रीजमधे सरकवून दिली. पटापट डाळ-तांदूळ धुवून कूकरमधे खिचडी शिजत ठेवली. कूकरच्या १-२-३ शिट्या वाजायला लागल्या आणि दारातून एकेक जण आत शिरायला लागले. आई भूक लागली लवकर जेवायला वाढ म्हणून ओरडत मोठ्या चिरंजिवांची स्वारी आत गेली. ती पण अगदी स्टाइलमध्ये बोलली दोन मिनिटं हं. आणि पटापट टेबलावर खिचडी, ताक, लोणचं, पापड आणि कोशिंबिरीने सर्वांची ताटे वाढली. धाकटा मुलगा धावत धावत टेबलापाशी येत विचारू लागला आई आज रविवारचा मेनू काय? आणि त्याची नजर ताटातील खिचडीवर जाताच तो काही प्रतिक्रिया व्यक्त करायच्या आतच मीनाने मोठे डोळे करून त्याच्याकडे पाहिल्यावर तो खाली मान घालून गुपचूप आपले ताट घेऊन टीव्हीसमोर जाऊन बसला. सर्वजण बाहेर ताटं घेऊन गेल्यावर मी एकटी का म्हणून आत बसू म्हणून तीही ताट घेऊन बाहेरच आली. मॅच पाहात पाहात जेवणाची खूपच रंगत आली. घाईघाईत स्वयंपाकघर आवरले. थंड पाणी पिऊन मसाला सुपारी चघळत चघळत तिने टीव्हीसमोरील सोफ्यावर आपले शरीर झोकून दिले. जसजशी मॅचमध्ये रंगत वाढू लागली तसतशी ती तिचा देह पसरवू लागली. एव्हाना संपूर्ण सोफ्याचा कब्जा तिने घेतला होता.अतिशय उत्कंठापूर्वक मॅच बघत असतानाच बेलचा नाद कानाच्या पडद्यावर आदळला. “ए तू ऊठ ना, मी नाही, तू ऊठ ना” असे करत शेवटी धाकट्या चिरंजीवांना दार उघडायला जाणे भाग पडले. आत्ता कोण कडमडले म्हणून तिने पाहिले तर दारात श्यामभाऊजी व कल्पना वहिनी उभ्या होत्या. तिने चपळ प्रयासाने सोफ्यावरील आपला देह संकुचित केला व लगबगीने उठून उभी राहिली. मग काय म्हणता चहा-नाश्ता बनवण्यास ती पुन्हा स्वयंपाकघरात घुसली आणि कोपऱ्यात उभा असलेला फ्रीज जणू मला एकट्याला आत ठेवून तू आरामात बाहेर बसतेस काय अशा रीतीने चिडवीत होता. नाश्तापाणी झाल्यावर ती जरा फ्रेश होऊन आली आणि बघते तर काय तिच्या ह्यांची श्यामभाऊजींची गप्पांची मैफिल चांगलीच रंगली होती, मुले अंगणात छू झाली होती. म्हटलं मॅच सोडून मुले खेळायला कशी गेली आणि हेही मॅच बघायची सोडून एवढ्या मोठमोठ्याने गप्पा कसे काय मारताहेत. असा विचार करीतच ती बाहेर आली आणि बघितले तर टीव्हीचे तोंड बंद. म्हटलं लाईट गेले की काय पण छतावर लटकलेला पंखा तर गरागरा फिरतोय की, नंतर कळले की जोराचा पाऊस आल्याने मॅच खेळणे शक्य नाही. हरे राम! म्हणजे सकाळपासूनचा माझा सर्व आटापिटा व्यर्थच म्हणायचा की आणि मीनाही

# फॅशन - काळाची गरज

- ओमनी फीचर्स

भारतात स्त्री अनेक रूपांने नावांनी ओळखली जाते. माता, गृहिणी, भगिनी अशी अनेक रूपे गुण तिच्या अंगी आहेत. तिला लक्ष्मीचा, दुर्गामातेचा दर्जा दिला जातो. मायाळू, प्रेमळ, येईल त्या परिस्थितीला झुंज देणारी अशी ही स्त्री आहे. जणू गुणांचा व सौंदर्याचा अमूल्य असा खजिना तिच्यात सामावलेला आहे. स्वर्गात देवदेवतांच्या दरबारात अप्सरा म्हणून ओळखली जाणारी ही स्त्री. स्त्रीला अथांग रूप व गुण दऊन कोणी बरे पाठवले असेल आपल्या वसुंधरेवर! जितकी ती सौंदर्यवान तितकीच मायाळू, आईच्या रूपात ती आपल्या मुलांना इतकी माया देते की तशी माया कुणीही देऊ शकत नाही. अगदी स्वतःच्या मुलांसाठी तिचे काळीजसुध्दा काढून देऊ शकत नाही. स्त्री ही दोन्ही कुळांचा उध्दार करते स्त्री ही आई-वडील, पती, भावंडे सासू-सासऱ्यांकडच्या व्यक्तीवर कुठल्याही प्रकारचा स्वार्थ न बघता अथांग प्रेम करत असते. सांभाळ करत असते. घरांतल्या लोकांच्या आवडी-निवडी, कुणी आजारी असतील तर त्यांना औषधी वेळेवर देणे, त्यांची सेवा करणे इत्यादी अनेक कामे ती करीत असते. खरोखर स्त्रीमुळे हे विश्वच सौंदर्यवान झाले आहे. तिच्यामुळेच सगळ्या विश्वाला सौंदर्य प्राप्त झाले आहे. ती कुणाला आवडत नाही. असे कुणीच म्हणणार नाही, तिच्या आई-वडिलांना, मुलांना, भावंडांना, पतीला व सासरकडच्या लोकांना ती आवडत असते. जीवनात इतर अभिनय करताना ती शिक्षिकेचे अभिनयसुध्दा अप्रतिमपणे करत असते. ज्यावेळी आपला स्वतःचा प्राण धोक्यात टाकून ती बाळाला जन्माला घालते त्यावेळी तिच्या वेदना बघवल्या जात नाहीत. त्या वेदना फक्त तिलाच माहिती असतात. यानंतर तिचे शिक्षिकेचे रूप सुरू होते. बाळाला बोलायला, चालायला, खायला इतर सर्व गोष्टी ती शिकवत असते. बाळाला चांगले संस्कार मिळावेत, म्हणून ती चांगल्या संस्कारित गोष्टी सांगत असते आणि तिला हे रूप प्राप्त करण्यासाठी काही शिक्षण घ्यावे लागत नाही, तर हे रूप प्राप्त होते ते तिच्या मायेमुळेच.

**“ परंतु माझ्या घरंच्याना ड्रेस तर दुरच परंतु मॅक्सी सुध्दा घरात घालायला परवानगी नाही बरे...असो नाही तर नाही साडी का असे ना.. ”**

महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कामे सुध्दा करते. कुणी डॉक्टर, पायलट, अंतराळवीर, इंजिनियर, पंतप्रधान, राष्ट्रपती, अधिकारा. घरकाम करणाऱ्या स्त्रिया आपले करियर आणि कुटुंब अशारीतीने सांभाळत असतात की जणू काही तारेवरची कसरतच असते. कुठल्या क्षेत्रांत स्त्रिया मागे आहेत? प्रत्येक क्षेत्रात त्या पुरुषांच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या आहेत. इतकी सामर्थ्यशील महिला अफाट शक्ती, माया, रूप, गुण असलेली आहे. खरोखर स्त्री - वर्गाचे कौतुक करण्यासारखेच आहे. ती रिक्षा चालवू शकते, ती हमालाचे कामसुध्दा करू शकते. तसेच ती बसचालक, कंडक्टर सुध्दा आहे. एकदा मी जळगावला गेले होते आणि तेथून मला आईकडे जायचे होते. मी बसडेपोत गेले असताना तिथे मला



बसकंडक्टरच्या गणवेशात चांगल्या आठ ते दहा बायका दिसल्या आणि त्याचक्षणी मला इतका अभिमान वाटला त्या स्त्रियांचा. गावाकडेसुध्दा स्त्रिया मागे नाहीत तर खरोखर अशा स्त्रियांचा मला हेवा वाटतो. कुटुंब सांभाळता सांभाळता स्त्रिया देशालाही सांभाळण्यातही काही मागे नाहीत आणि कार्य केले ते इंदिरा गांधी व प्रतिभाताई पाटील यांनी. तसेच तुरूंगात कैद्यांना चांगल्या वळणावर चांगला त्यांना रोजगार मिळत असे त्यांचे हित साधणाऱ्या त्या पोलिस दलातील किरण बेदी याही स्त्रीच आहेत. कल्पना चावला, सुनिता विल्यम्ससारख्या स्त्रियाही काही मागे नाहीत त्या अंतराळातसुध्दा जाऊन आल्या आहेत म्हणजेच स्त्री जात ही किती हुशार, गुणवान अशी आहे.

स्त्री आपले कुटुंब सांभाळते आणि तिला ते सांभाळायला आवडते तिला उंच भरारी घ्यायला आवडते. म्हणजे थोडक्यात तिला तिचे करियर करायला आवडते. जितका जिव्हाळा तिला ह्या गोष्टींचा आहे, तितकाच जिव्हाळा तिला फॅशनबाबतीतही आहे आणि फॅशन म्हणजे 'स्त्रीचे जीव की प्राण' मग ती कुठल्याही शाखेत असो. अशी कुठलीही स्त्री नाही की तिला फॅशन हा प्रकार आवडत नाही. एवढेच की, कुणी कमी प्रमाणात फॅशन करते तर कुणी जास्त प्रमाणात करते. फॅशन या अनेक प्रकारच्या आहेत. त्यात कपड्यांची फॅशन, अनेक प्रकारच्या साड्या, ड्रेस, पंजाबी ड्रेस यातसुध्दा अनेक फॅशन आहेत. पटियाला, धोती, चुडीदार, पॅरलल, त्यानंतर जिन्स पॅन्ट, थ्री फोर्थ पॅन्ट, वेगवेगळ्या प्रकारचे टी शर्टस, साडीवरचे ब्लाऊज हे वेगवेगळ्या गळ्यांचे, हाताचे वेगवेगळ्या प्रकारचे अशी फॅशन असते. त्यानंतर वेगळ्या प्रकारचे ज्वेलरी, हार, कानातले, अंगठी, बांगड्या, ब्रेसलेट, पीन अशा कितीतरी प्रकार आहेत. ज्या प्रकारची फॅशन निघेल त्या प्रकारच्या फॅशनच्या मागे स्त्रिया धावत असतात. आता ज्वेलरी फॅशनच्या बाबतीतही म्हणायचे झाले तर एक ग्रॅम सोन्याचे दागिने घेणे जास्त स्त्रिया पसंत करतात. त्या एक ग्रॅम, पाच ग्रॅम, दोन ग्रॅम असे कमीत कमी सोन्यात अगदी चांगली कलाकुसर केलेले दागिने असतात. तसेच रंगीबेरंगी खड्यांचेही दागिने काही बाजारात कमी नाहीत. वेगवेगळ्या प्रकारच्या टिकल्या, बांगड्या म्हणजे जशी फॅशन बदलत जाते तशी स्त्री ती अवलंबत असते. पूर्वी स्त्रिया कपाळावर कुंकू, केसांचा आंबाडा, नऊवारी साडी, हात भरून काचेच्या बांगड्या; परंतु काळानुसार स्त्रीही बदलत गेली आणि आता कपाळावर कुंकवाऐवजी वेगवेगळ्या साड्यांवर किंवा ड्रेसवर मॅचिंग टिकली, बांगडी, कोणाचा यु कट, कोणाचा बॉय कट, कोणाचा स्टेप कट अशाप्रकारे फॅशन करत असतात. पूर्वी सर्व स्त्रिया साडी घालत होत्या; परंतु आता मात्र बोटावर

मोजण्याइतपत स्त्रिया साडी घालतात. जशी फॅशन बदलत गेली तशीच फॅशनबरोबर स्त्रीसुध्दा बदलत गेली. तिला हे करायला भाग पाडावे लागले कारण स्त्री ही मुळात प्रगतिपथावर आहे. धकाधकीचे जीवन यामुळे तिला काळानुसार बदलणे भाग आहे आणि फॅशनबरोबरच तिचे विचारसुध्दा बऱ्यापैकी बदलले आहेत.

देशातल्या प्रत्येक स्त्रिला शृंगार करावासा वाटतो. तिची पहिली आवड असेल तर शृंगार करणे. शृंगार आला म्हणजे फॅशन आलीच. त्यांना लागणाऱ्या शृंगाराचे काही कमी प्रकार नाहीत आणि तिच्या या शृंगारामुळे अनेक व्यावसायिकांना व्यवसाय मिळाले. चलन मिळवण्याचे माध्यम मिळाले. आज कुठल्याही बाजारात जर गेला तर जास्त स्त्रियांच्याच वस्तू आपल्याला दिसतात. स्त्री ही दिसायला कशीही असो तिने जर शृंगार व्यवस्थित केला तर ती जणू स्वर्गातील अप्सरा या वसुंधरेवर अवतरली आहे. स्त्री ही एक फॅशन कलेचा नमुना म्हणायला हरकत नाही. स्त्रीला फॅशन करायला तर आवडते परंतु त्यांच्या घरच्यांना मान्य नसते कारण बऱ्याच ठिकाणी आपल्या भारतीय संस्कृतीलाही जपणारी काही माणसे असतात. मग अशा ठिकाणाच्या स्त्रियांना मन मारून साडीच वापरावी लागते. काहींच्या घरच्यांना फॅशन केलेली आवडत असेल तर त्या मात्र बिनधास्तपणे फॅशन करत असतात. बऱ्याच स्त्रियांचे मत आहे की आपण फॅशनेबल राहिले तर काही ठिकाणी करिअरवर सुध्दा फरक पडतो. स्त्रीने साडी जरी घातली तरी त्यावर गळ्यात हार, मॅचिंग बांगड्या,पैंजण, वेगवेगळ्या प्रकारच्या लिपस्टिक्स, नेल पॉलिश अशा कितीतरी वस्तू आहेत की त्यामुळे स्त्रीचे सौंदर्य अगदी खुलून दिसते. कुणीही आपल्या पतीचे मन जिंकण्यासाठी त्याला आवडण्यासाठी, करिअरसाठी तर कुणी स्वतःच्या समाधानासाठी फॅशन करतात. मूळ गोष्ट फॅशनही स्त्रियांचा एक छंदच आहे. हा छंद घेऊन त्या या भूमातेवर अवतरल्या आहेत. काही स्त्रिया नोकरीला असतात त्यांना तिथे गणवेश असला तर गणवेशात त्या समाधान मानतात. काहींचे म्हणणे असते की आम्हांला जर गणवेश नसता तर आम्ही रोज नवनवीन फॅशन केली असती. मग फॅशन प्रत्येक स्त्रीला करावीशी वाटते, जशी फॅशन बदलत असते तशी फॅशन ती अवलंबत असते. फॅशनच्या मागे धावणारी आजची ही स्त्री आहे. त्याची तिला गरज आहेच, ती जर फॅशनेबल नसेल तर तिला थोडे हीन दर्जानेही बघितले जाते किंवा तिच्या आयुष्यातले जीवनच उद्ध्वस्त होऊही शकते. ही दशा आजच्या काळातली आहे.

एखादा नवरा मुलगा जर नवरी मुलगीला बघायला गेला असेल आणि ती मुलगी जर फॅशनेबल नसेल तर तिला पसंत केली जात नाही. आजकालच्या मुलांनासुध्दाम फॅशनेबल मुलगी आवडते आणि बऱ्यापैकी फॅशनला वाव दिला जातो. स्त्रीला नेहमी



सुंदर दिसावे असे वाटते व वेगवेगळ्या रूपांत दिसायला आवडते. फॅशनमुळे तिला वेगवेगळे रूप मिळते सुध्दा. अशी बहुगुणी स्त्री आहे. मी अनेक माध्यमांतल्या स्त्रियांना फॅशनबाबत विचारले त्यांची मुलाखत घेतली.

प्रथम मी डॉक्टरांची मुलाखत घेतली.

१. डॉक्टर मला म्हणाल्या की खरोखर फॅशन ही स्त्रियांची आवड तर आहेच; परंतु आम्हांला सुध्दा फॅशन आवडते. आम्ही जर चांगले नीटनेटके फॅशनेबल राहिलो, तर रुग्णालाही वाटते स्वच्छ राहावेसे वाटते. आम्ही जर चांगले राहिलो नाही तर आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांचा बदलेल की डॉक्टरच्याच अंगी जर स्वच्छता नसेल तर रुग्णांना काय चांगला सल्ला देणार. फॅशनही आम्हांला शोभेल अशीच करतो अगदी प्रमाणातच. आम्ही अलंकारही फार कमी प्रमाणात वापरतो. आम्ही जर फॅशन केली नाही तर आमच्या क्लिनिकवर सुध्दा फरक पडू शकतो.

२. कॉलेजातल्या विद्यार्थिनींना विचारले असता, तिचाही अनुभव मला सांगितला की फॅशनला ही सध्या खूप महत्त्व आहे. फॅशन हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखादी मुलगी फॅशनेबल नसेल तर तिला महत्त्व दिले जात नाही. तिला अगदी पायापासून निसखून बघतात व तिरस्काराची भावना, नाक मुरडणे या गोष्टी सहज त्या मुलीच्या बाबतीत घडतात. याउलट जर फॅशनेबल मुलगी असेल तर ती सर्वांना आवडते. तिच्याशी पटकन मैत्रीचा हात पुढे केला जातो. असाच अनुभव मला कॉलेजमध्ये मिळाला, म्हणजे स्वतः मी दृश्य बघितले, फ्रेंडशिपडेचा दिवस होता आणि सगळ्या कॉलेजमधल्या मुलींनी एकमेकींना फ्रेंडशिप बँड बांधायचे होते. सगळ्यांनी अगदी छान छान वेगवेगळ्या प्रकारच्या फॅशनचे कपडे परिधान केलेले होते. झाले काय की, फॅशनवाल्या मुलींनी फॅशनेबल मुलींनाच फ्रेंडशिप बँड बांधले आणि साध्या



वेशातल्या मुलींना त्यांनी फ्रेंडशिप बँड बांधले नाहीत. त्यांच्याशी कुणीही मैत्री केली नाही. त्याच्याकडे बघून त्यांनी नाक मुरडले. बिचाऱ्या त्या मुलीचा चेहरा रडका झाला. त्यांना अतिशय दुःख झाले. त्या सामान्य कुटुंबातल्या होत्या. परिस्थितीमुळे त्या फॅशन करू शकत नव्हत्या. मुळात म्हणजे फॅशन ही मर्यादित असावी, मर्यादेच्या बाहेर नसावी. थोडक्यात म्हणजे फॅशन ही अंगप्रदर्शन करणारी नसावी.

३. शिक्षकांना विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, आम्हांला शाळेत ड्रेस वगैरे घालायला बंदी असते. आम्हांलाही वाटते की ड्रेस वगैरे घालावे परंतु काय करणार आम्हीच जर अतिफॅशन केली तर मुलांना शाळेत चांगले संस्कार देऊ शकत नाही; परंतु आम्ही मर्यादेत फॅशन करत असतो, बऱ्याचपैकी आम्हांला फॅशन करायला मिळते सुध्दा. वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या, चपला, बांगड्या, पर्स अशा प्रकारे फॅशन करत असतो. १५ ऑगस्ट, गॅदरिंग, २६ जानेवारी अशावेळी तर आमची मजाच असते. वेगवेगळ्या साड्या, वगैरे घालून जणू काही आमचा फॅशनशोच असतो म्हणून आम्हांला जास्त काही वाटत

नाही.

आम्हांला बऱ्याचपैकी फॅशन करायला मिळते आणि आमचा एकमेकींचा संवादही होतो की, अग तुझी साडी किती छान आहे अशा अनेक वस्तु एकमेकींच्या आम्हांला आवडतात. मग त्या म्हणतात की, आता फॅशन ही आहे म्हणून मीही साडी घेतली आणि आता हॅन्डवर्कच्या साड्यांची फॅशन आहे म्हणूनआम्ही त्या साड्या घेणे जास्त पसंत करतो. फॅशन तर करायला हवी परंतु मर्यादेतच आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आपण जपला पाहिजे.

४. पदवीधर स्त्रीला फॅशनच्या बाबतीत विचारले असता मला तिचा अनुभव सांगितला ती स्त्री बी.ए.बी.एड आहे. परंतु नोकरीला नाही. तिने सांगितले की, ज्यावेळी मी इंटरव्ह्यू गेले होते त्या ठिकाणी भरपूर स्त्री- पुरूष आले होते. एकेकाला आत इंटरव्ह्यूसाठी कॅबिनमध्ये बोलवत होते, आणि त्यात मीही उभी होती आणि माझ्या मागे माझ्यापेक्षाही फॅशनेबल लेडी होती. बाकी लेडीजची राहणीमानही अगदी साधी होती. माझीही साधीच राहणीमान होती. पाच-सहा जण जायचे अजून बाकीचे होते परंतु त्यांना न बोलावता माझ्या मागच्या स्त्रीला बोलावले गेले व तिची निवड केली गेली म्हणजे फॅशनला आधी प्राधान्य दिले गेले म्हणजे फॅशनला किती प्राधान्य दिले जाते हे मला त्या दिवशी समजले. फॅशन ही केलीच पाहिजे. फॅशनमुळे करियरवर फरक पडतो व स्त्रीचे सौंदर्यसुध्दा खुलून दिसते असे तरी मला वाटते.

५. घरकाम करणाऱ्या स्त्रियांनाही विचारले असता त्या काही त्यांचा अनुभव सांगायला मागे राहिल्या नाहीत. मला साडी घालायला जास्त आवडत नाही. ती फक्त पूजेच्या वेळी वगैरे आवडते. मला ड्रेसच घालायला आवडतात. मला शृंगार करायला आवडतो; परंतु माझ्या घरच्यांची ड्रेस तर दूरच परंतु मॅक्सी सुध्दा घरात घालायला परवानगी नाही बरे, असो! नाही तर नाही. साडी का असेना; परंतु साडीसुध्दा वेगवेगळ्या फॅशनची घालायला आवडते. चांगले टीपटॉप राहायला आवडते कारण आम्ही जर चांगले राहिलो नाही तर लोकही आम्हांला घरकामाला ठेवणार नाहीत. त्यांना सुध्दा वाटते की, आम्ही तर अगदी हायफाय फॅशन करणारे मग कामवालीसुध्दा आम्हांला उत्तम प्रकारची असावी. माणसं बायकांनाही चांगल्या क्वालिटीची घरकाम करणारी स्त्री हवी असते की जेणेकरून त्यांचे इम्प्रेशन डाऊन होणार नाही याची ते लोक काळजी घेतात. आम्ही जर अगदी साधे राहिलो तर आमच्याकडे बघून माणसे नाक तोंड मुरडायलाही मगे पाहत नाही.

६. हाऊसवाईफला विचारले. त्यांचे अनुभव सांगितले की, माझा मुलगा इंग्लिश मिडियमच्या शाळेत ज्युनियर केजीच्या वर्गात होता. मी रोज त्याला शाळेत सोडायला - आणायला जायची. एके दिवशी गॅदरिंग संबंधी माहिती हवी होती. तशी शाळेच्या आवारात नोटीस लावलेली होती आणि ती इंग्रजीत होती. मला नोटीस वाचता तर आली खरी; परंतु त्याचा अर्थ समजला नाही, मग मी इतर बायकांना त्याचा अर्थ विचारला असता त्या बायकांनी चक्क माझ्याकडून नाकतोंड मुरडून घरी गेल्या. मला वाटले मला अर्थ समजला नसेल म्हणून त्यांनी नाक मुरडले असेल परंतु



ज्यावेळी मी पंजाबी ड्रेस घालून टापटीप गेली तर त्याच बायका माझ्याशी स्वतः बोलायला आल्या व त्यांनी माझ्याशी मैत्रीही केली. यावरून मला असे दिसून आले की फॅशन ही आजच्या काळाची गरज आहे. दुसऱ्या हाऊसवाईफला विचारल्यानंतर तिने मला एकच उत्तर दिले की, फॅशनमुळे करियरवर काही फरक पडत असेल असं मला वाटत नाही कारण **प्रतिभाताई पाटील** या डोक्यावर पदर घेतात मग आजच्या त्या राष्ट्रपती आहेतच ना. काही स्त्रिया ह्या अंगप्रदर्शनाची फॅशन करतात, मुलीसुध्दा करतात त्यामुळे त्या अनेक वाईट कामाला बळी पडतात म्हणून फॅशन ही प्रमाणात असावी म्हणून मीही म्हणेन फॅशनमुळे जीवनात खूप फरक पडतो; परंतु ड्रेस किंवा पॅन्ट-शर्ट घातल्यामुळे किंवा प्रमाणाच्या बाहेर फॅशन करायला पाहिजे असे काही नाही. साडी जरी स्त्रीने व्यवस्थित घातली थोडा शृंगार केला तरीही स्त्री छान दिसते. उलट तिला साडीसारखे कुठलेही वस्त्र शोभून दिसत नाही. स्त्रीचे स्त्रीत्व हे साडीतच आहे. आपल्या देशातील संस्कृती आपण जपली पाहिजे. स्त्री ही अशी आहे की जगाचा उद्धार तिने कला आहे. खरोखरच काहीतरी पुण्य म्हणा की इतके रूप तिला प्राप्त करून या भूमातेवर पाठवले याहून वेगळे मला काय हवे? म्हणून आपली संस्कृती ही नष्ट होत आहे. तिला सावरायला हवे. भारत देशात संस्कृतीचा साठा आहे. संस्कृतमय देश म्हणून या जगात, विश्वात त्याचे नाव आहे, म्हणून मीही म्हणेन की फॅशन जरा प्रमाणातच करायला हवी. मुंबईसारख्या स्त्रियांचे सांगायचे म्हटले तर बऱ्याचपैकी स्त्रिया या नोकरीला असतात. त्यांना लोकल ट्रेनने प्रवास करावा लागतो. ऑफीसला जावे लागते. ट्रेनमध्ये बऱ्याच वेळा गर्दी असते आणि मुळात ट्रेनही जास्त वेळ थांबत नाही म्हणून धावत धावत ट्रेन पकडाची असते. साडी घातल्यामुळे स्त्रियांना ते शक्य होत नाही म्हणून त्यांना ड्रेस हा घालावाच लागतो. मग ती फॅशन आज गरजेची वाटू लागली आहे.

## कुकिंग टिप्स

१. शेवेसाठी डाळ दळायला देताना त्यामध्ये मूठभर पांढरी चवळी घालावी. यामुळे शेव छान हलकी होते.

२. बटाट्याचे वेफर्स करताना काप पातळ चिरावेत आणि थोडा वेळ पाण्यात ठेवून नंतर कोरड्या फडक्याने पुसून घ्यावेत. यामुळे वेफर्स कुरकुरीत होतील.

३. लोणी नेहमी मिठाच्या पाण्यात ठेवावे. यामुळे ते बरेच दिवस टिकते; त्याचप्रमाणे घाण वास येत नाही.

४. केकच्या बॅटरमध्ये थोडे ग्लिसरीन घातल्यास केक मऊ होतो.

५. केळी जास्त पिकली तर काळी पडून वाया जातात.हे टाळण्यासाठी केळी कुस्करून त्यात पुरेशी साखर घालावी आणि हे मिश्रण प्लास्टिकवर थापून केळे पोळी बनवावी. वाळल्यावर ही पोळी छान लागते.

६. इडल्या उरल्या असतील, तर कुस्करून छानसा उपमा बनवावा.

# सौंदर्याला आधुनिकतेची जोड

**- कीर्ती वैती**

फॅशनची व्याख्या बदलू शकते पण आरोग्याची मात्र बदलत नसते. बदलून चालतही नाही. श्रीमती पिंटो नावाच्या एक महिला एक दिवस माझ्याकडे आल्या. त्यांची तक्रार जरा वेगळीच आणि काहीशी गमतीशीर होती ! श्रीमती पिंटोंच्या चेहऱ्यावर गेली दोन वर्षे पुटकुळ्या उठत होत्या. पण पुटकुळ्यांची पध्दत अशी की त्या शनिवार-रविवारी अगदी फुलून येत आणि नंतर आपोआप हळूहळू मावळून जात! गरुवारी शुक्रवारपर्यंत चेहरा स्वच्छ होऊन जाई. नंतर पुन्हा शनिवारी चेहरा भरून जाई.

पिंटो अगदी वैतागून गेल्या होत्या. त्यांनी दोन वर्षांत अनेक उपचार करून पाहिले. तपासण्या, क्रीम, घरगुती औषधे सगळं झालं. पण शनिवारी - रविवारी पुटकुळ्या चेहऱ्यावर आपल्या हजर! त्यांना तपासले खरं, पण मलाही काय करावं प्रथम समजेच ना! त्यांनी ठरवून टाकलं होतं आता हा शेवटचाच उपाय, यापुढे उपचार बंद. त्यांचा निर्णय कळल्यामुळं माझीही जबाबदारी वाढली होती. मी पहिल्या प्रथम माझा सुरुवातीचा उपचार केला आणि त्यांना त्यांच्या कुटुंबीयांबद्दल विचारलं.

**फॅशनची व्याख्या बदलू शकते पण आरोग्याची मात्र बदलत नसते. बदलून चालतही नाही.**

त्यांचे पती मुंबईला एका बड्या आंतरराष्ट्रीय कंपनीत एक्झिक्युटिव्ह होते. ते पुण्याला शनिवार-रविवार यायचे. दोन दिवस कुटुंबात राजून सोमवारी परत मुंबईला जायचे. मिस्टर पिंटो पुण्याला आले की त्यांना भेटायला घेऊन येण्याबद्दल मी मिसेस पिंटोंना सांगितलं. नंतरच्या शनिवारी पतिपत्नी दोघं कन्सल्टिंगरूममध्ये आले. ते आत येताच इंपोर्टेड सेंटचा मंद सुवास रूममध्ये पसरला. ती दोघं बसली. पिंटोंच्या अंगावरचा वास मला अस्वस्थ करू लागला. वास आवडला नाही तर हा सेंटच मिसेस पिंटोंच्या पुटकुळ्यांना कारणीभुत असेल काय असा विचार मनात आला म्हणून! मिस्टर पिंटोंना या आफ्टर शेव्हलोशनची खूप आवड. ते शनिवार-रविवार पुण्याला आले की साहजिकच ते इथंही दाढी केल्यावर हे लोशन वापरीत असणार!

दोन दिवस पत्नीच्या सहवासात काढून ते सोमवारी जात म्हणजे त्यानंत शनिवारपर्यंत मिसेस पिंटो एकट्याच. मिस्टर पिंटोंना मी सांगितलं की तुम्ही पुण्याला पुन्हा आलात की दोन दिवस हे आफ्टर शेव्हलोशन वापरू नका. त्यांनी तसं केलं. दोनच दिवसांनी मिसेस पिंटो आनंदी चेहऱ्यानं आल्या आणि सांगू लागल्या, हा शनिवार-रविवार पुटकुळ्या आल्या नाहीत!

अशा तऱ्हेच्या कितीतरी केसेस सांगता येतील. लोशन, क्रीम यांसारख्या सौंदर्यप्रसाधनांमुळे कितीतरी स्त्रीपुरुषांना त्रास भोगावा लागत असतो. पण ते जागरूक राहत नाहीत. सध्याच्या दिवसांत सौदर्यप्रसाधने आणि फॅशनच्या बाबतीत प्रत्येकाने विशेषतः महिलांनी त्यांची निवड करताना अत्यंत सावधगिरी बाळगायला हवी. खरं म्हणजे प्रसाधनं ही सौंदर्यवृध्दीसाठी तयार केलेली असतात. पण जर कोणी त्यांचे दुष्परिणाम काय होतात हे जर लक्षात घेतलं नाही, तर सौंदर्याऐवजी त्या प्रसाधनांपासून

त्रासच होईल.

खाली उल्लेख केलेली सौंदर्यप्रसाधनं नेहमी वापरली जातात आणि त्यांच्यापासून अपायही होण्याची शक्यता असते.

१) **हेअर डाईज :**

आकर्षक आणि तरुण दिसण्यासाठी कलप वापरणारी कितीतरी माणसं असतात. या कलपांमध्ये फेनिल-अलानाईन-डायमाईन नावाचं द्रव्य वापरलं जातं. बऱ्याच पेशंटच्या बाबतीत ते सैतानी उपद्रव देणारं असते! असे कलप वापरल्यानं चेहरा सुजणं, लाल होणं, तसच टाळू, चेहरा आणि डोळ्यांची आग होणं अशा व्याधी सुरू होतात. दीर्घ काळापर्यंत हे कलप वापरल्यामुळे या व्याधी व्यक्तीला कायमच्या चिकटतात.कलप वापरल्यानं त्वचेचा कॅन्सर झाल्याचीही उदाहरणं आहेत. मेहेंदी हा नैसर्गिक कलप असून अत्यंत कमी धोकादायक आहे.

२) **शांपू :**

अनेक सुगंधी शांपूच्या सतत वापरानं डोक्याच्या त्वचेला गंभीर स्वरूपाचे अपाय होऊ शकतात. तसंच शांपूमुळे केसांची चमकही नाहीशी होत जाते आणि केस गळायला लागतात.



३) **साबण :**

बहुतेक सर्व साबणांमध्ये कॉस्टिक सोडा वापरलेला असतो. विशेषतः औषधी साबणांमध्ये जंतू प्रतिबंध द्रव्ये वापरलेली असतात. या द्रव्यामुळे त्वचेला कोरडेपणा येतो. त्यातून पुढे त्वचेचे विकार उद्भवू लागतात.

४) **केसांचे सुगंधी तेल :**

जर कुणाला सुगंधी द्रव्यांची ॲलर्जी असेल, तर त्यांनी सुगंधी तेल न वापरणंच इष्ट असतं. कित्येकांना अशी तेलं वापरल्यानं डोक जड होणं, दुखणं अशी दुखणी सुरू होतात. आयुर्वेदिक साबण व सौम्य तेलं विशेषतः खोबरेल तेल वापरणं हितकारक असतं.

५) **कुंकू :**

ज्या रंगाची साडी त्या रंगाची कुंकवाची टिकली कपाळावर हवीच, अशी हल्लीची फॅशन आहे. निरनिराळ्या रंगांची कुमकुम हल्ली बाजारात मिळतात. त्यात अनिलाईन डाईन आणि मधमाश्यांचं मेण वापरलेले असते. अशा कुंकवाच्या वापरामुळे आगपण आणि कोडसुध्दा होऊ शकतं.

६) **मस्करा व आय शॅडोज :**

या प्रसाधनांमध्ये विविध धातूंचा उपयोग केला जात असल्यामुळं त्वचेचा रंग कायमचा बदलू शकतो. डागही पडू शकतात.

७) **लिपस्टिक :**

लिपस्टिकच्या वापरामुळं ओठ अत्यंत आकर्षक आणि आव्हानात्मक दिसतात, हे खरं असलं तरी काही जणींना यातील मेण आणि रंग अपायकारक ठरू शकतात.

८) **फेस पावडर क्रीम :**

विविध प्रकारच्या फेस पावडरींमध्ये क्रीम्स आणि फाऊंडेशन्समध्ये असे काही पदार्थ वापरलेले असतात



की त्यांची अनेकांना ॲलर्जी असते. त्यामुळं त्वचा लाल होते.

९) **जीवनसत्त्वांचा वापर :**

आपली प्रकृती तंदुरुस्त ठेवण्यासाठी जीवनसत्त्वयुक्त औषधांचा तात्पुरता वापर केला तर त्वचा ठीक राहतेही पण सततच्या वापरामुळं त्वचा कधीही दुरुस्त होऊ शकणार नाही इतकी खराब होऊ शकते.

१०) **ब्लीचिंग एजंटस् :**

आपल्या त्वचेच्या काळ्या, सावळ्या रंगावर नाराज होऊन बऱ्याच स्त्रीया ब्लिचिंग करून गोरे बनण्याचा अट्टहास करतात. पण या काळ्या सावळ्या रंगातही सौंदर्य असतं, तेज असतं याची कल्पना स्त्रीयांना नसते. या ब्लीचिंग एजंटमध्ये अमोनियाकंरण केलेला पारा वापरलेला असतो, त्याच्यामुळं त्वचेला अपायच होत असतो.

११) **नेल पॉलिश :**

सर्वसामान्यपणे नेल पॉलिशमध्ये फॉर्मलडिहाईड लिकर या द्रवाचा वापर केलेला असतो. त्यामुळे पॅरानोसिया म्हणजे नखांचा विकार होऊ शकतो आणि काहीजणींना तर नखापासून दूर असलेल्या ठिकाणी म्हणजे पायाजवळ इसब वगैरेसारखे विकार होऊ शकतात. याचबरोबर एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की प्रत्येकीला प्रत्येक सौंदर्यप्रसाधनाची ॲलर्जी असेलंच असं नाही. प्रत्येकीच्या त्वचेची संवेदनक्षमता वेगवेगळी असते.सौंदर्यप्रसाधनं वापरण्यापूर्वीच नीट दक्षता घेतली गेली तर त्याचा त्रास होण्याचा संभव कमी होतो. नेहमी वापरात असलेले ब्रँड एकदम बदलून दुसरे सुरू करू नयेत. जर नवीन प्रकार वापरायला सरुवात केल्यावर त्वचेवर काही अनपेक्षित चमत्कारिक बदल दिसले तर लगेच त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि तो प्रकार वापरणं बंद करावं. किंमत जास्त असलेलं अगदी परदेशी प्रसाधनही एखादीला छळू शकतं. तेव्हा आणि अपाय यांचा काहीही संबंध नाही. कधी कधी अगदी साधं मलमसुध्दा त्रासदायक ठरू शकतं. तेव्हा निसर्ग आणि नैसर्गिक उपचार हेच खरं. पाण्यानं स्वच्छ धुतलेला चेहरा नेहमीच टवटवीत दिसत नाही का? तेव्हा आपल्या सौंदर्यासाठी आणि आरोग्यासाठी प्रसाधनांचा उपयोग न केलेलाच बरा!


**Siddhivinayak Estate Agency**

**414, Paradise Tower, 4th Floor,**
**Opp. Alok Hotel, Gokhale Road,**
**Naupada, Thane (W) 400 602**
**Cell : 9096694194**

**Prop. Sudhakar Chavan**

# शेवगा

- मंजिरी दिलीप सरवटे

आमच्या सोसायटीच्या कंपाऊंडच्या पलीकडे कुणीतरी एक शेवग्याचे झाड आणून लावले. झाड कसले, फांद्या, पाने काहीच नसलेला तीन साडेतीन फुटी खुंटाच होता तो आणि तो लावलाही होता अशा ठिकाणी की तिथे तो जगेल वाचेल याचीच मुळात शक्यता नव्हती. कारण सोसायटीच्या सभासदांनी वेळेवेळी केलेल्या घरदुरुस्ती कामाचे डेब्रिज भिंतीपलीकडे पसरले होते. त्या दगड माती, सिमेंटच्या ढिगाऱ्यात ते झाड कसे तग धरणार होते. देव जाणे पण खरोखर, देवच त्याचा वाली असावा. एकदा दुसऱ्या मजल्यावरच्या माझ्या घराच्या बेडरूमच्या खिडकीतून खाली नजर गेली तर खुंटाला दोन बाजूंनी दोन कोवळ्या फांद्या फुटलेल्या. लुसलुशीत पोपटी पानांच्या हिरव्यागार फांद्या असलेले ते झाड आता दोन्ही हात उंचावून 'मला उचलून घे ना' असे सांगणाऱ्या लहान मुलासारखे निरागस दिसत होते. मनात म्हटले, 'चला जगला वाटतं शेवगा!'

पावसाळा सुरू झाला नि हळूहळू चहूअंगांनी शेवगा वाढू लागला. आता तर मूळ खुंटालाही फूट आलेली दिसू लागली. बघता बघता शेवगा चांगला आठ दहा फूट उंच झाला. आता जवळच असलेल्या खाडीवरून येणारा एखादा चुकार पक्षीही त्यावर विसावू लागला. रोज खिडकीशी उभे राहून शेवगा आज किती वाढला ते पाहणे हा माझा छंदच झाला. पावसाळा संपून हिवाळा सुरू होता होता तर तो चांगला माझ्या दुसऱ्या मजल्यावरच्या घरापर्यंत आला. आता तर तो सरळ सरळ माझ्या नजरेच्या टप्प्यात आला आणि अगदी हात जरासा पुढे करून हस्तांदोलन करावे इतका जवळ.

**"निसर्गाचा तो अनोखा चमत्कार, कितीही पाहिले तरी मनाची तृप्ती होणार नाही असे ते दृश्य, मानवी डोळ्यांशिवाय दुसऱ्या कुठल्या कॅमेऱ्याने बंदिस्त केले असते!"**

लवकरच त्याच्या एका बाजूच्या फांदीवर पांढरी, नाजूक फुले दिसू लागली. त्याचबरोबर त्याच्यावर कीटक, पक्षी, प्राणी यांचा संचारही सुरू झाला. फुलांभोवती रेंगाळणारे मधभक्षी कीटक दिसू लागले. खारींचा वावर दिसू लागला आणि पक्ष्यांचे तर ते लाडके झाड झाले. हे पक्षीही विशिष्ट क्रमाने येत. अगदी पहाटे शेवग्याच्या उंच शेंड्यावर बसून 'दयाळ' सुरीले गाणे म्हणत असे. सकाळी सकाळी 'शिंपी' पक्ष्यांची जोडी 'टिविट टिविट' करीत त्याच्यावर बागडत असे.त्यानंतर खुठूनस एक पिवळाधम्मक हळद्या चोचीतबोटभर लांबीची अळी घेऊन येऊन बसे. झाडाच्या फांदीवर ती अळी आपटून तिला पार निर्जीव करून मटकावून टाकत असे. दुपारी ऊन तापले की नित्यनेमाने दोन पोपट शेवग्यावर येऊन शांतपणे बसून राहत. कावळे आणि साळुंक्या आपल्याच मालकीचे झाड आहे, अशा थाटात एकमेकांना हुसकावून लावत. संध्याकाळी अगदी अंधार पडेपर्यंत एक नाचरा आपले पंख पंख्यासारखे फुलवून शेवग्याच्या फांदीफांदीतून नाचत असे. लाल रंगाचे डोके असणारा सुंदर असा


ंब ता ट



पक्षीही कधीकधी येत असे. बुलबुल तर नेहमीच शेवग्यावर दिसत असत पण सहसा कधी प्रत्यक्ष दर्शन न देणारी कोकिळाही बऱ्याचवेळा इथे बसून कोकिळा पक्ष्याच्या हाकेला प्रतिसाद देत असे. एकदा मी दुसऱ्या खोलीत असताना अचानक बेडरूमच्या खिडकीत खूप गलका ऐकू आला. धावत येऊन पाहिले तर शेवग्यावर आणि माझ्या खिडकीच्या ग्रीलमध्येही साधारण कबुतराएवढे पण जरासे गुबगुबीत, मातकट रंगाचे बरेच पक्षी बसले होते. त्यांना सातभाई म्हणतात ते नंतर मला पक्ष्यांविषयीच्या पुस्तकावरून समजले. हे सातभाई खरोखरच सात पक्षी असत आणि बरेच दिवस येत राहिले होते. माझ्या घराच्या जवळपास खूप झाडे असल्यामुळे यापूर्वीही आसपास खूप वेगवेगळे पक्षी पाहिले होते. पण शेवग्यामुळे मला ते अगदी जवळून पाहायला मिळाले. त्यांचे निरीक्षण करता आले. अगदी खंड्या, फूल-चुखे, भांगपाडीमैना असे अगदी अनोळखी असणारे पक्षीही पाहता आले.

आता तर मी शेवग्याच्या प्रेमातच पडले. सकाळी उठल्या उठल्या त्याला पाहिल्याशिवाय माझा दिवस सुरू होत नसे. माझ्या घराची एक बाजू पूर्वेला असल्यामुळे सकाळच्यावेळी घर सूर्यप्रकाशाने भरून जात असे. एरवी आल्हाददायक वाटणारा हा प्रकाश उन्हाळ्याच्या दिवसात मात्र नकोसा वाटे. पण आता शेवग्याच्या पारदर्शक हिरव्या पानांमधून पाझरणारा हिरवा सूर्यप्रकाश मनाला सुखावू लागला.

शेवग्यावर फक्त पक्ष्यांचाच वावर होता असे नाही. प्राण्यांनाही बहुतेक तो हक्काचा निवारा वाटत होता. कधीकधी एवादा कुत्रा मागे लागला म्हणून एवादे छोटेसे मांजर शेवग्यावर चढून बसे. शेवग्यावर पक्षी कधी घरटे बांधीत नाहीत कारण हे झाड तसे विरळ फांद्यांचे असते. पण मांजर त्यावर चढलेले दिसले की पक्षी उगीचच त्याच्यावर आरडाओरडा



करून त्याला खाली उतरायला भाग पाडत. एकदातर एक साप, कसा कोण जाणे, पण शेवग्यावर चढला. साधारण सात/आठ फुटावरच्या फांदीवर लोंबकळत राहिला. कावळे आणि साळुंक्या त्याला टोचून टोचून इतके हैराण केले की तो बिचारा इतक्या उंचीवरून धप्पकन गवतात उडी मारून पसार झाला. या शेवग्यावरचे जीवन म्हणजे प्रत्यक्षातले डिस्कव्हरी चॅनलच होते.

उन्हाळा संपून पावसाळा सुरू झाला. पहिल्या वादळी पावसात जोरदार वाऱ्याने शेवगा इतका पिळवटून निघत होता की त्याला पाहून छातीत धस्स होत होते. पाऊस पडून गेल्यानंतर चिंब भिजून निथळणारा शेवगा मात्र त्याही स्थितीत आनंद देत होता. जणू त्याच्या जिवाला काही धोकाच नव्हता.

श्रावणातल्या एका सकाळी भुरूभुरू पाऊस पडून गेला आणि नंतर लख्ख ऊन पडले. मी सहज म्हणून बेडरूममध्ये आले नि समोरचे दृश्य पाहून अक्षरशः थिजून गेले. शेवग्याच्या प्रत्येक पानाच्या टोकाशी एक थेंब निथळत होता आणि त्यावर सूर्यप्रकाश पडल्यामुळे माझा शेवगा लक्ष लक्ष दिवे अंगावर घेऊन एखाद्या दीपमाळेसारखा दिसत होता. आता पाऊस पडून गेल्यावर क्षणभर जरी ऊन पडलेले दिसले की ती तेजस्वी दीपमाळ पहायला मी हातातले काम सोडून धावू लागले. निसर्गाचा तो अनोखा चमत्कार, कितीही पाहिले तरी मनाची तृप्ती होणार नाही असे ते दृश्य, मानवी डोळ्यांशिवाय दुसऱ्या कुठल्या कॅमेऱ्याने बंदिस्त केले असते! शेवग्याने असे अनेक आनंदाचे क्षण मला दिले. त्याने दिलेल्या शेंगा, फुले, पाला यापेक्षा कितीतरी अधिक मोलाचे क्षण.

मात्र आज उरल्यात त्याच्या फक्त आठवणी. डेब्रिजमध्ये उभा असलेला तो शेवगा, डेब्रिज उचलताना एका छोट्याशा धक्क्याने कोसळला. त्याला असे जमीनदोस्त होताना पाहून माझ्या काळजाच्या अक्षरशः चिंध्या चिंध्या झाल्या. अजूनही तिथेच आडव्या पडलेल्या त्याच्य बुंध्याकडे पाहून एक वेडी आशा वाटते. या बुंध्यातूनच तो पुन्हा उगवेलही कदाचित!

एक मात्र खरे, त्या शेवग्याने माझ्या मनात कायमचे घर केले आहे.

## नव वधूचा मेकअप

प्रत्येक मुलीला स्वतःच्या लग्नात जास्तीत जास्त सुंदर दिसायचे असते.त्यासाठी लग्नाच्या आधी कमीत कमी आठवडाभर तरी आधी पासून त्वचेची निगा राखायला सुरूवात करावी.

१.रोज आंघोळीआधी त्वचेला तिळाच्या तेलाने किंवा गाईच्या तुपाने मालिश करावे.

२अंघोळ करताना मसुर डाळीचे पीठ , हळद, साय घालून ते त्वचेला चोळावे.

३. वाळा, लोध्र,मंजिष्ठ,अनंतमूळ यांच्या उटण्याने त्वचा स्वच्छ करावी.

४. दूधात जायफळ व आंबेहळद उगाळून लावावे.

५. झोपताना वाफ घेऊन क्रीम लावावे.

६.झोपण्याआधी डीप क्लिंसिंग मिल्कने त्वचेवर हळूहळू मालिश करावे.

७. चेहरा, गळा, मान, हात या सर्वांना एकच पध्दत घ्यावी.

८.चेहरा,गळा,मान,हात यांना नरिशिंग क्रीमने मालिश करून सकाळी उठल्यावर क्रीमने मालिश करून गार पाण्याचे हबके मारावेत.

९.कोरडी त्वचा असेल तर मॉइश्चराइझर लावावे.

१०.तेलकट त्वचा असेल तर दूध लिंबू लावावे.मॅनिक्युअर व पॅडीक्युअर करून मगच मेंहदी काढावी.

मेकअपआधी फेशिअल करावे व चेहरा अतिचमकदार व सुंदर दिसण्यासाठी काही त्वचेचे मास्क वापरावे.

# मोलकरीण

**-विजया गोरे**

मोलकरणीचे मला खूप अनुभव आले आहेत.दिसायला साध्या पण खूप कावेबाज व चोरट्या होत्या.

पहिला अनुभव मला पेंडसेनगरमध्ये आला.आम्ही डोंबिवलीला बऱ्याच जागा बदलल्या .माझ्याकडे बकुळा नावाची मुलगी कामाला होती.तिची बहीण ताई शेजारी काम करायची,तेव्हा आमची भाड्याची जागा होती.जागा नवीनच बांधलेली होती.मालकपण ओळखीचे होते.खाली पाच बिऱ्हाड होती. माझी कॉर्नरची जागा होती. हॉल खुप मोठा दहा बाय सोळा चा होता व किचन लहान होते.तेथे मी नवीनच शिवण्याचे मशीन घेतले होते व दोन बायका सौ.नेने व सौ. राजे माझ्याकडे शिवण शिकायला यायच्या. तेव्हा दोघीकडून मी ५ रू घ्यायची.

**एकदा मी मुद्दाम स्वयंपाकघरांत हळूहळू गेले तर ही बाई नऊवारीच्या ओच्यात प्लॅस्टिकच्या पिशवीत साखरेचा डबा ओतत होती. मी लगेच ओरडले “अहो,बाई काय करताय?”**

आत मोलकरीण बकुळा कपडे धूत होती.मी स्वयंपाकघरात नाही असे पाहून बाहेर हॉलमध्ये आली व भिंतीतल्या कपाटाचा पडदा बाजुला करून माझे पाकीट पैस कुठे दिसते का पहात होते.कारण तिथे मी माझी पर्स ठेवत असे. तिने पाहीले असणार.

मी सहज मागे आत पाहीले तर बकुळा पडद्या जवळ उबी होती. मी तिला इथे काय करतेस ? विचारले तर मला म्हणाली पाणी प्यायला हवं. मी म्हटले इथे पाणी आहे ? नळाचे पाणी प्यायचे. तिने माझ्या पर्समधून किती पैसे चोरले असतील देवास ठाऊक.कारण पर्समध्ये १० रू किती नोटा आहेत ,आपण मोजत नाही.

माझ्या वडिलांचे अंबरनाथला घर होते.त्यांना बरे नसायचे.त्यांना हार्टचे दुखणे होते.मी १५ दिवसांनी शनिवारी कल्पनाची शाळा सुटली की११ वाजता रेल्वेने जायची कारण तिची शाळा असल्याने वडिलांना आम्ही दादा म्हणायचो. दादा आमची जेवणासाठी वाट पहायचे.

मोलकरीण रविवारी काम करायला येत नसे.एकदा हे सोमवारी मला म्हणाले .अंगाचा साबण संपला होता मी नवीन वडी काढली.मी म्हटले अहो परवाच तर साबणाची वडी काढली.शनिवारी भराभर बकुळाकडून काम करून अंबरनाथला जात असे.तेव्हाच ती वडी चोरून स्कर्टच्या खिशात ठेवत असे अशा माझ्या ३/४ साबणाच्या वड्या गेल्या होत्या.

तिची बहीण ताई पण शेजारी काम करायची त्या सौ.सानेबाई तिला चावी द्यायच्या व शेजारी मैत्रिणीकडे जायच्या. ती काम करून चावी आणून द्यायची पण नंतर त्यांना कळले ५ केळी असतील तर २ केळी असायची. ती कांदे,बटाटे,लसूणपण चोरायची.नंतर बकुळाला मी कामावरून काढून टाकले.एकदा आम्ही नागपुरला हयांच्या बहिणिकडे गेलो व येताना मला गाडीतच खुप ताप आला.फ्लू झाला होता.घरी आल्यावर औषध घेऊन बरे वाटले पण खुप अशक्तपणा होता.
यांचा सकाळी डबा करायला जमत नसे.शेजारच्या सौ.जोशीने इथे फाटकबाई स्वयंपाक करतात .त्या फाटकबाइना घेऊन आल्या.लगेच त्यांना मी स्वयंपाक करायला ठेवले.

मला बरे नसल्याने हे सकाळचा चहा असत.एकदा दोन दिवसांनी यांनी मला विचारले रोज छोटा डबाभर साखर लागते का? मी म्हटले छे काहीतरीच काय सात आठ दिवस डब्यातील साखर पुरते.

तेव्हा आषाढी एकादशी होती.सर्व वऱ्याचा भात फाटकबाईने कच्चा ठेवला होता.मी परत पाणी घालून शिजवला.

एकदा मी मुद्दाम स्वयंपाकघरांत हळूहळू गेले तर ही बाई नऊवारीच्या ओच्यात प्लॅस्टिकच्या पिशवीत साखरेचा डबा ओतत होती. मी लगेच ओरडले "अहो,बाई काय करताय?" तीने पंधरा दिवस काम केले असेल तिला मी उदयापासून स्वयंपाक करायला येऊ नका सांगितले.

समोरच्या सौ.काणेबाईने ती पोळपाटाखाली कणकीचे ३/४ गोळे रोज ठेवत असे व घरी जाऊन पोळ्या करीत असे अशी चोरटी बाई.

नंतर आम्ही मंदारमध्ये ओनरशिपची १ रूम किचन जागा घेतली.गॅलरी दहा बाय आठची होती .स्वयंपाकघर मोठे होते. जरा आत जागा होती .तिथे मी वरती काचेचे दोन कप्पे व खाली तीन कप्पे सुताराकडून करून घेतले.पण पुढचा हॉल जरा लहान म्हणजे दहा बाय बाराचा होता.

सकाळी मी धाकटी मुलगी अर्पणा व सानेच्या दीपाला शाळेत पोहचवत असे. सानेबाई साडे बाराला दोघींना घरी आणत असत.

तेथे वैजू नावाची मोलकरीण माझ्याकडे कामाला होती.ती नेहमी कापडाची पिशवी व आत प्लॅस्टिक पिशवी आणत असे. एकदा सकाळी अकरा वाजता मी पेपर वाचत बसले होते व समोरच वैजू कपडे धूत बसली होती मी पाहीले तर कपडे आमचे नव्हते तिचा स्कर्ट व ब्लाऊज होता व ती साबण लावलेले कपडे प्लॅस्टिक पिशवीत ठेवत होती.मी जाम तिला ओरडले व तुझ्या कपड्यांना साबण लावतेस.

मी पावडर मध्ये कपडे भिजवीत असे वरून साबण लावत नसे.नंतर तिला कामावरून काढून टाकले.नंतर आम्ही रामनगरमध्ये पारिजातमध्ये रहायला गेलो.पहिल्या मजल्यावर रहात होतो रस्त्याच्या बाजूला गॅलरी होती.

तिथे तर अजब नमुना पहावयास मिळाला तेथे आमच्या मागेच झोपडपट्टी होती.

तिथली मुलं फारच त्रास देत असत.

आमच्या अंगणात बाहेर नळ होता. त्याचे पाणी लहान मुले बाटलीत भरून एकमेकांच्या अंगावर उडवत असत. नळाला कुलूप लावले तर ते तोडत असत. रस्त्यावर संबंध दिवस बॉल खेळत असत व रात्री झोपडपट्टीतले बेवडे लोक झिंगून येत व जोरजोरात भांडत असत.जरासुध्दा शांतता नव्हती.

त्या झोपडपट्टीतील द्रौपदी माझ्याकडे कामाला लागली .ती बरीच ठिकाणी काम करायची.ती खूप चांगली पण होती.कामपण चांगल करायची. पण तिच्याकडे सासू,नवरा व २ लहान मुलगे होते पण तिचा नवरा काही कामधंदा करत नसे.खुप दारू प्यायचा व द्रौपदीला खुप मारायचा.

एकदा ती दोन दिवस काम करायला आली नाही .खालून तिची सासू चालली होती. तिला मी वरूनच



विचारले.सुन कामाला का नाही आली ?ती काहीच बोलली नाही.
नंतर तिच्या नवऱ्याचा फोन आला.त्याने मला काय सांगू ताई. द्रौपदी आता जगात नाही. तिने रेल्वेलाईनवर जीव दिला. “मी त्याला काय काय सागताय काय ?” म्हणाले. कुठे तर डोंबिवली स्टेशन जवळ.
तिची मावस सासू आमच्या सोसायटीचे जिने झाडायची,अंगण झाडायची.
मी मनातच म्हटले आता तिला आणतील मावशीपण उदया कामाला येणार नाही.

रात्री द्रौपदीला स्मशानात नेतील.द्रौपदीने जीव दिल्याचे दोन्ही मुलींना सांगितले.द्रौपदीने मुलांसाठीतरी जीव द्यायचा नाही.

रात्रभर मला झोप लागली नाही. सकाळी चहा केला व हॉलमधल्या गॅलरीतून बघत असतांना मला द्रौपदी दिसली. ती माझ्याकडे पाहून हसली मला वाटले हे भूत तर नाही. नंतर बेडरूमच्या गॅलरीतून मी परत तिला पाहिले. ह्यांनापण बोलावले. हे पण म्हणाले अग,आपलीच बाई द्रौपदी आहे.
जरा वेळ मी सुन्न झाले.असे एकेक अनुभव आले. नंतर तर तिला मी कामावरून काढून टाकले.
नंतर आम्ही दत्तनगर मध्ये ओमकार मध्ये जागा घेतली.





**-: चुटका :-**

एक स्त्री-कंडक्टर साहेब एक प्रभादेवी द्या.
दुसरी स्त्री- साहेब मला काळबादेवी द्या.
तिसरी स्त्री- एक लक्ष्मीबाई द्या.
चौथी स्त्री- (नुकतीच गावातून आलेली असते)एक गंगूबाई द्या.

**-: विनोद :-**

पत्नी : अहो दुबई आणि अमेरिकेला फिरायला जायचा मी विचार करते किती खर्च येईल ?
पती :एकही रुपया खर्च होणार नाही.
पत्नी : ते कसे काय ?
पती : अगं विचार करायला कुठे पैसे लागतात.

**-: चारोळ्या :-**

जेव्हा मुलगी पळून जायची धमकी
देते तेव्हा आई-बाबांनी काय करावं ?
तिंच टक्कल करावं !
५-६ महिने पळून काय घरातून बाहेर
पण पडणार नाही...
टकली ....

# नेलपॉलिशची गंमत

-ओमनी फीचर्स




कोणती चावी कसली हे पटकन ओळखायचं असेल .नखांना कुल लूक देऊन काही हटके करायचं असेल तर संपत आलेली नेलपॉलिश वापरून बघा.
कधी कधी काही गोष्टी सहज गंमत म्हणून करायच्या असतात. त्याला काही अर्थ असतोच किंवा असायलाच हवा असा आग्रह नाही.पण त्या करताना कल्पनाशक्तीचा जो वापर होतो आणि जे साध्य होते त्यामुळे मिळणारा आनंद हा खूप मोठाअसतो.काहीतरी हटके केल्याचं समाधान यातूनच मिळतं.गंमत आणि समाधान देणारा हा प्रयोग घरातल्या चाव्यांवर आणि आपल्या नखांवर नेलपॉलिशच्या सहाय्याने करून बघायला काय हरकत आहे.

चाव्यांचं रंगकाम:

टू व्हीलर,फोर व्हीलर म्हणा किंवा कपाट,लॉकर वैगरेच्या टिपीकल काळ्या कव्हरच्या चाव्या सगळ्याजवळच दिसतात आणि त्याचमुळे अनेकदा अशा चाव्या इतरांच्या चाव्यांबरोबर एकत्र होतात आणि ऐनवेळेला सापडत नाहीत. वेगवेगळ्या की चेन वापरले तरीही सतत हरवतात, तुटतात हे सगंळ टाळायचं असेल आणि आपली चावी इतरांच्या चाव्यांपेक्षा वेगळी व उठून दिसावी म्हणून एक सोपा उपाय आहे.घरातील जुनी संपत आलेली नेलपॉलिश घ्यायची आणि ती चाव्यांना लावून ठेवायची.नेलपॉलिशनं रंगवलेली प्रत्येक चावी वेगळी तर दिसते शिवाय कपाटाच्या ड्रॉवर्सच्या गाड्या आणि सायकल वेगवेगळ्या लॉक्सच्या चाव्या गहाळ जरी झाल्या तरी नेमक्या रंगामुळे चटकन सापडतात.

नखांवरची कलाकुसर :

नखांवर वेगवेगळ्या प्रकारची कलाकुसर करण्याची फॅशन सध्या बूममध्ये आहे.त्यासाठी बाजारात भरपूर साधनं उपलब्ध आहेत.वेगवेगळ्या प्रकारच्या टिकल्या ,चमकी,डिझाइन बाजारात मुबलक मिळत आहेत.मात्र बाजारातल्या वस्तू न वापरता घरच्या घरी नखांवर मस्त कलाकुसर करू शकतो.नखांवर हवं ते टेक्शचर रंगवू शकतो.नखांवर टेक्शचर पेंटिग केल्याने नखांना कुल लूक देता येऊ शकतो याची पध्दतही एकदम सोपी असते.

ेक्शचर पेंटिग करताना सुसंगत अशा रंगाची दोन वेगवेगळ्या शेड्सची नेलपॉलिश घ्यावी.प्लॅस्टिक पेपरचे दोन नखांच्या आकाराचे लहान लहान तुकडे घ्यावेत. एका तुकड्यावर एक अशाप्रमाणे दोन्ही नेलपॉलिश प्लॅस्टिकच्या कागदावर लावाव्या. नंतर दोन्ही तुकडे अर्धावर ठेवावेत. टूथपिकच्या सहाय्यांन दोन्ही तुकड्यांच्या समान भागावरील नेलपॉलिश शेंडिग केल्याप्रमाणे एकत्र कराव्या आणि स्पंजच्या तुकड्यावरील डिझाईन उमटवांव. नंतर फिक्या रंगाचे नेलपॉलिश नखांवर लावावं आणि ते पूर्ण वाळल्यावर त्यावर स्पंजच्या तुकड्यावरील डिझाइन उमटवाव. अशा रीतीनं सगळ्या नखांवर डिझाइन उमटवल्यावर नखाबाहेरील बाजूस लागलेलं जास्तीचं नेलपॉलिश रिमूव्हरच्या सहाय्यानं पुसून टाकावं. सहज गंमत म्हणुन केलेलं नखांवरचं हे कोरीव काम एकदम भारी दिसतं.

# काव्यविश्व

## स्त्रीचं आयुष्य

आई पासून आजीपर्यंत
प्रत्येक नात्यात वावरतेस तू!
सगळ्यांना सांभाळून घेत घेत
आयुष्य सार्थकी लावतेस तू !
आई बनून वावरतेस तू
लहांनासाठी झटतेस तू
आपल्या बाळाला जपण्यासाठी
वातीप्रमाणे झिजतेस तू
सगळ्यांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू !
बहिणीच्या भूमिकेत
ठामपणे वावरतेस तू
प्रत्येक वेळेस भावाला
सांभाळून घेतेस तू
त्याच्यासाठी देवाकडे
प्रार्थना रोज करतेस तू
सगळ्यांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू !
होतेस क्षणभर मैत्रिण तू
राखतेस मैत्रीची लाज तू!
कर्तव्य आपल्या मैत्रीचे
समर्थपणे पार पाडतेस तू
सगळयांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू !
प्रेयसीच्या रुपातही
दिसतेस खूप छान तू
प्रेमासाठी त्यागाचं मोल
जाणतेसही खुप तू
त्याच्या सुखासाठी
स्वतःही खूप दुःख सोसतेस तू
सगळ्यांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू
होतेस नंतर पत्नी तू
कायमची त्याची अर्धांगिनी बनून
देतेस त्याला साथ तू
सुखी संसाराची गोड स्वप्नं रंगवत
आयुष्य समाधानाचे जगतेस तू
सगळ्यांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू !
शेवटी होतेस आजी तू
आयुष्याचे चांगले क्षण
नातवंडासोबत जगतेस तू
हसत हसत जीवनाचा निरोप
एक दिवस घेतेस तू
सगळ्यांना सांभाळून घेत घेत आयुष्य सार्थकी
लावतेस तू !

**-जुई प्रधान**



# गाणे

गाणे असते मनमोराच्या
पिसाऱ्यातले पाचू
गगनधरेचा बंध रेशमी
गोफ गुंफुनी नाचू
पहाट वेलीवरी उमलती
गंधबावरी सुमने
जरी तारांवर लहरत येते
रविराजाचे गाणे
पानामधली सळसळ गाते
संजीवक गीत
क्षितिजावरचे सांध्यरंग ते
मोहरती कवितेत
झुळझुळ वाहे जळ सरितेचे
छेडीत मधूर तराणे
इवले इराले पंख पालवित
झुलते पाखरगाणे
रिमझिम रिमझिम पागोळ्यातून
नुपूर नाद सरींचा
चैत्रबनामधी वसंत येता
पंचम कुहूकुहूचा
घुंगुरनादी रमत चालल्या
तिन्ही साजेला धेनू
गोरजवाटेवरी वाजतो
गोपाळाचा वेणू.

**-वृन्दा भांबुरे**



# कुठे...कशी...

आली दिवाळी दिवाळी
सण सौख्याचा हा मोठा
मज्जाच मज्जा भारी ,नाही आनंदाला तोटा
लक्ष्मीपूजनाचा थाट,उजळल्या दशदिशा
दीप सर्वत्र लाविले,लखलखते ही निशा
धनिकांची लक्ष्मी सोन्या-रुप्याने नटली
रौप्य तबकी रौप्य दीप,रौप्य समई तेवली
हजारी फटाक्यांची माळ दारी पेटवली
काही क्षणातच दारी राखरांगोळी उरली
मध्यम वर्गीयांकडे सण साजरा करती
हौस मौज वाटे तरी हात राखूनी ठेवती
महिनाअखेर ही आली
सण कैसा हो करावा
अंथरूण आपुले पाहून हात-पाय पसरावा
दरीद्री,सुतकी न लाविती दिवली
झोपडीत  गरिबांच्या कैसी होईल दिवाळी
रोजचे अन्न न मिळे,त्यासी फराळ कुठला
वीज-रॉकेलची भ्रांत तेथे रोषणाई कसली
अज्ञान ,दारिद्र्य ऐसे,कैसे कधी हो संपेल ?
विषमतेची दरी कधी -कशी नष्ट होईल ?

**-सुधा नांदेडकर**

# कुणी असेल तर...

ऐकून घ्यायला कुणी असेल तर रागावून घ्यावे
ऐकणारे कुणी असेल तर मनसोक्त बोलावे
सावरणारे कुणी असेल तर बेहोश व्हावे
हातात हात घेणारे कुणी असेल तरच स्वच्छंद भटकावे
स्वाद घेणारे कुणी असेल तर मनापासून बनवावे
आसू पुसणारे कुणी असेल तरच रडावे
शोधणारे कुणी असेल कशात तरी हरवावे
थोडक्यात काय उद्याचे कुणी पाहीलाय
जिवलग कुणी असेल तर जगून घ्यावे
दोन हातांनी भरपूर उधळावे
दोन हातांनी भरभरून घ्यावे

**-रश्मि लुकतुके**

# निराधार

आई बघ जरा आढ्यावरती
तो लटकला झुला,
लेक तुझी झुलतेय आधाराविना,
झोजवताना पाळण्यामध्ये
झरला होता तुझा अंगाई गळा,
हिरवा हिरवा पान बहर
नि फुलला होता मळा,
पाकळी पाकळी फुलवत फुलवत
तूच लावलास लळा,
वेलीवरंच फूल तुझं
अडवत होतीस भन्नाट वारा
उशीर होता परतायला
तुझ्या जिवा नव्हता थारा
सासरी निघता घराचा
भिजला होतास उंबरा,
माझ्या एका एका शब्दासाठी
भोळा जीव होता आतुर तुझा
साऱ्या माझ्या स्वप्नांसाठी
उधार होता जीव तुझा,
मग आई, चटके माझे देहावरले
चटके माझे मनावरले-सासरच्या छळाचे
उमजले नाहीत का तुला ?
तुझ्या कुशी परतण्याची भाषा
उमगली नाही का तुला ?
जेव्हा माझ्या माहेराला
तू बंद केलास दरवाजा,
तिथेच माझ्या आयुष्याचा
संपला होता रस्ता,
लोकापवादाची भीती,केलीस तिची सरशी
लेकीच्या मनाची मात्र, जाणीव नव्हती जराशी,
आई,बघ माझं आता कसं,तन मन झुलतंय
कुणी झोका दिल्याशिवाय , मीच निराधार झुलतेय ।

**-वैदेही केवटे**



# जगत जननी

नारी नसे दीनवाणी, प्रसंगी होई महिषासुर मर्दिनी
बाळासाठी संजीवनी , चराचराची असे जननी
एकाच जन्मी होतसे,तनया-माता-भगिनी
मावशी,आत्या,काकी,आजी,नणंद आणि वहिनी
वाढविसी उदरी भविष्य उद्याचे बनुनी जननी
तशी कर्तव्य चूर-प्रेमळ,जन्मोजन्मीची तु पत्नी
कुठे लाडली तर कुठे नकोशी स्नुषा
कतृत्वाने तव दावीसी जगता दशदिशा
नको जगू या पुढे होऊनी गडकऱ्यांची सिंधुबाई
पाडुनी भिंती हो नवी सपकाळ सिंधुताई
दीन-दुबळ्या, वृध्द अनाथांची माई
सोशीत-पिडित परिव्यक्तांची आई
कधी  गवसणी घालसी तू तारांगणा
जिंकिले नदी-सागरा,मारीशी मैदाना
धैर्य ,शौर्य,वात्सल्य त्यागाची तू मूर्ती
चहुकडे दरवळे अशी तुझी कीर्ती
तरीही न होतेसे तव कार्याची पूर्ती
शब्द अपुरे पडती गावया तुझी महती !

**-अनघा रोगे**

# तिच्या ऋणातच राहू दे

देवा जन्मोजन्मी हीच आई मला दे
दुधावर तिच्या माझी भूख शमू दे
तिच्या रक्ताने माझे शरीर धष्टपुष्ट होऊ दे
तिच्या मायेचे उबदार पांघरुण मला मिळू दे
कुशीत तिच्या माझे जीवन सुरळित राहू दे
तिच्या ऋणातच मला जन्मोजन्मी राहू दे
व्याजावर व्याज वाढून चक्रवाढ खाती जमा होऊ दे
नेहमीच असे तिचे पारडे जड असू दे,
म्हणजे देवा तूला ही सोपे होऊन जाऊ दे.
माणसाचा नाही दिलास जन्म तर राहू दे.
जनावराचा देता आला ,तर  बघ पक्ष्याचा तरी दे
चोचीत दाणे भरवून उडण्याचे बळ तिच्याकडून मिळू दे
असे जन्मोजन्मी आमचे नाते घट्ट असू दे
किंड्या मुंग्यांचा देता नाही आई मात्र हीच दे
कुठेही कसाही तिचा सहवास मला लाभू दे
माझ्या वाटणीचे सुख मला कमी मिळु दे
पण तिला मात्र भरभरून सुख दे
तिला सुख देताना तुझी ओंजळ मंद होऊ दे
तिच्यातील आईपण माझ्यातही उतरू दे
तिच्या ऋणातच मला जन्मोजन्मी राहू दे.

**-शीतल चाळके**

# सावली

सावलीसारखी साथ देईन,
जेव्हा तुला म्हटले होते.
तुझ्या पंखांमधले बळ,
तेव्हाच मी आजमावले
होते !
गगनाला गवसणी घालशील
विश्र्वास होता मनात.
म्हणूनच निश्चित मनाने
हात दिला हातात!

आकाशात झेप घे,
सूर्याकडे नजर ठेवून
लवकर माघारी ये,
यशाचा शिरपेच घालून!

ऊन जेव्हा माथ्यावर येईल,
जमिनीवर पाऊल ठेव जपून,
पावलांखाली मीच असेन
तुझी सावली होऊन!!

**-मंजिरी सरवटे**

# स्त्री

आपली बाजू मांडण्याची
हिंमत आहे तिच्यात
भरकट विचारांना सावरण्याचे
धैर्य आहे तिच्यात.
नराधमांना धडा शिकविण्याची
ताकद आहे तिच्यात
स्त्रीत्व,पावित्र्य जपण्याची
अस्मिता आहे तिच्यात.
दुर्गेसम उग्ररूप धारण्याची
शक्ती आहे तिच्यात
बरोबरीने देशनेतृत्व करण्याचे
साहस आहे तिच्यात.
थकल्याभागल्या जीवा
संजीवन देण्याची ममता आहे तिच्यात
हा सृजनशीलतेचा वारसा
एकमेव हक्क आहे तिच्यात.
सांगा ?तिच्यात काय दिसे उणे ?
तरीही तिचे जिणे का जीवघेणे !

**-ललिता टोके**



# लेक जन्मा आली...

लेक जन्मा आली आली -आई जगदंबा
पावली
वाटा साखर नि बरफी-शुभलक्ष्मी हो
प्रकटली-लेक जन्मा आली
काया कोमल कोमल
काळे शोभती कुंतल
बोल बोबडे लडिवाळ
चाले दुडू दुडू चाली-लेक जन्मा आली
आली
भाग्य थोर दो भावांचे
लाड पुरविती भगिनीचे
लेणे लाभे नक्षत्रांचे.
अशी भावंडे लाभली -लेक जन्मा आली
आली.
लोक सद्गुणी सुंदर,
माया करिते अपरंपार,
घरा दाराचा आधार,
सान,थोरांना सांभाळी-लेक जन्मा आली
आली
तिला देईन शिक्षण
तिला करीन महान
तिचे बहरेल जीवन
होई सर्वांची लाडकी-लेक जन्मा आली
आली .

**-इन्दुमति ठक्कर**

# याखुदा क्या नुर है !

राजहंसी चाल तवं अन् नजर होती माशुकी
सहज अस्फुट बोलली मी क्या अदा है आपकी !
वाह क्या अदा है आपकी !
केस कुरळे स्वैर की
गालावरी झुलती बटा
मुग्ध होती पाहणारे
मद्भरी त्यांची छटा.
यौवनाचे तेज उजळी ..उफ ..मुलायम कंचुकी
सहज अस्फुट बोलली मी क्या अदा है आपकी !
अधर किंचित विलग होता
हासती जुईच्या कळ्या
गे कुणाचे हृदय लपले
सांग ना नेत्री निळ्या ?कल्पनेतच चुंबितो तवं रुप
अद्भुत केतकी
सहज अस्फुट बोलली मी क्या अदा है आपकी !
कोण तू ? बिजली नभिची ?
उतरली धरतीवरी,
अंबरीची चंद्रिका ?की
उगवली अवनीवरी ?
येखुदा क्या नुर है हे सत्य आहे ?स्वप्न की ?
सहज अस्फुट बोलली मी क्या अदा है आपकी !
वाह क्या अदा है आपकी !

**-इन्दुमति ठक्कर**



# आठवणींचा झोका

ढगांना बांधला आठवणींचा झोका
वाऱ्यानं गुंफला सुरांचा ठेका
मन-मयूच्या फांद्याला फुटला चैतन्याचा सूर
चैतन्याच्या सुराला मिळाला आताशा नूर
संकल्पनेच्या पखांवर हेच सदा पाहिलं
जीवनातील आनंदाचं जणू गुपितच जाणलं
आयुष्याच्या कोऱ्या पाटीवर प्रेमगीत लिहिलं
प्रेमगीतात थोडे तिखट मीठ घातलं
त्याच्या शिवाय मजा नाही हे सुध्दा जाणलं
जाणीवेच्या कोंदणात म्हणूनच प्रेम टिकलं
प्रेमाच्या अंगणात आठवणी फेर धरू लागलं
फेर धरून आठवणी नाचू गाऊ लागल्या.
नात्यांच्या रोपट्याला प्रेमाचं खत-पाणी घातलं
आनंदाच्या शिडकाव्यानं सारं काही जपलं
म्हणूनच आनंदलोकात आठवणींच घर बांधल
असा हा आठवणींचा झोका वर-वर गेला
ढगांच्या खिडकीतून सर-सर बरसला.
प्रत्येकाच्या दारी फुलण्यासाठी हे रोप असतं
सावली आणि सुगंध सारखं पसरत असत...
पसरत असतं.

**-शुभांगी घाग**

# पाककृती



## उपवासासाठी खमंग खाऊ :

### १)उपावासाचे वडे :



साहित्य : १वाटी कच्चे शेंगदाणे,२ मोठे उकडलेले बटाटे,अर्धी वाटी वरी तांदळाचे पीठ,५-६ हिरव्या मिरच्या,जिरे,चवीपुरती साखर,लिंबू रस,सोडा,तळण्यासाठी तूप.

कृती : प्रथम शेंगदाणे भिजवा.तासाभराने त्याची साले काढा.शेंगदाणे, मीठ, जिरे, मिरच्या एकत्र वाटून घ्या.त्यात बटाटे किसून घाला. चवीला साखर घाला,लिंबूरस घालून चांगले एकत्र करून त्याचे गोळे करा.दुसऱ्या भांड्यात वरी तांदळाचे पीठ घ्या. त्यात चवीपुरते मीठ आणि थोडा सोडा घाला आणि भज्यांप्रमाणे सरबरीत पीठ भिजवा.कढईत तळण्याचे तूप तापत ठेवा.त्यातील एक चमचा गरम तूप हया पीठात घाला .मग वड्याचे गोळे वरीच्या पिठात बुडवून हया तुपात सोडा आणि गुलाबी रंगावर तळा.बटाट वड्याप्रमाणे दिसतात.

### २)शिंगाड्याच्या पिठाचा ढोकळा :



साहित्य : १ वाटी शिंगाड्याचे पीठ,अर्धी वाटी भाजलेल्या दाण्याचे कूट,अर्धी वाटी ताक,मीठ, ओल्या मिरच्या,जिरे,खोबरे,सोडा,चार चमचे तूप

कृती : एक वाटी ताकात ,एक वाटी शिंगाड्याचे पीठ कालवून एकत्र करा.गरज भासल्यास थोडं पाणी घाला.झाकण ठेवून ७-८ तास तसेच ठेवा.ढोकळा करायच्या आधी त्यात जिरे,आले,मिरचीचे वाटण करुन घाला.चवीप्रमाणे मीठ घाला,तूप आणि सोडा किंवा फ्रूटसॉल्ट घालून एकाच दिशेने,जोरात फेसा.नंतर थाळीला तूप लावून त्यात हे मिश्रण ओता.कुकरमध्ये हा ढोकळा वाफवून घ्या .१५ मिनिटांनी आच बंद करा.ढोकळा थंड झाल्यावर त्यावर तूप जिऱ्याची फोडणी घाला.वरून ओले खोबरे घालून सर्व्ह करा.

### ३) वऱ्याचा पुलाव :



साहित्य : १ वाटी वऱ्याचे तांदूळ ,३/४ लवंगा,दालचिनीची छोटी काडी,२ लाल मिरच्यांचे मध्यम आकाराचे तुकडे,एक टी स्पून वाटलेलं आलं ,१ मोठा बटाटा,७/८ भोपळ्याच्या मध्यम आकाराच्या फोडी,१ वाटी शेंगदाण्याचे कुट,तूप आवश्यकतेनुसार,काजू-बदाम आवडी नुसार ,मीठ चवीपुरते.

कृती : वऱ्याचे तांदूळ स्वच्छ धुवुन ४/५ मि.निथळत ठेवा.एका जाड बुडाच्या पातेल्यात तूप गरम करून त्यात जिरे घाला.जिरे तडतडले की लाल मिरचीचे तुकडे घालून परता.लवंगा,दालचिनी घालून परता,सुका मेवा व आलं घालून परता.भोपळा व बटाट्याच्या मध्यम आकाराच्या फोडी करुन टाका.भाज्या फोडणीत मिनीटभर परतल्यावर तांदूळ घाला.तांदूळ परतल्यावर त्यात कूट घालून परता. मीठ घाला आणि तांदूळ जरासे लालसर होईपर्यंत परता. त्यात आधणाचे पाणी घालून मंद आचेवर शिजवा किंवा कुकरमध्ये एक शिट्टी काढा.

**४) वरी तांदुळाचा खिचू:**



साहित्य : वरी तांदुळ १ कप,खवलेला नारळ २ चमचे,मीठ चवीप्रमाणे,जिरे किंवा ओवा चिमूटभर, तूप फोडणीसाठी.

कृती: वरी तांदूळ ४तास भिजत घाला.जास्त पाणी बाजूला ठेवलेला वरी तांदुळ आणि ताजा खवलेला नारळ मिक्सरमधून बारीक वाटून घ्या.

जरुरीप्रमाणे मीठ आणि जिरे किंवा ओवा घाला.कढईमध्ये तूप गरम करून त्यात वरील मिश्रण घाला आणि घट्ट गोळा होईपर्यंत शिजवा. वरून अजुन तुप घालून गरमागरम खावे.

**५)राजगिरा खीर:**



साहित्य : राजगिरा पीठ २ चमचे, दूध २ कप, बदाम/काजु/बेदाणे/खारीक पावडर जरुरीप्रमाणे, साखर चवीनुसार,वेलची पुड पाव चमचा,१चमचा तूप.

कृती : पीठ तुपामध्ये खरपूस भाजुन घ्या.त्यात दूध घालून व्यवस्थित ढवळून घ्या म्हणजे गुठळी राहणार नाही. इतर सर्व जिन्नस घालून उकळी येऊ द्या.घट्टपणा आला की आच बंद करा आणि गरम खीर प्या.जास्त घट्ट असल्यास आणखी थोडे दूध घाला.

**६)दशमी :**



साहित्य : राजगिऱ्याचे पीठ, दूध.

कृती : राजगिऱ्याच्या पिठात दूध घालून घट्ट पीठ भिजवा.पीठ चांगले मळून राजगिऱ्याच्याच पिठावर दशमी थापा किंवा लाटा.पिठाकडची बाजू तव्यावर टाकून दोन्ही बाजूंनी शेकवा,नंतर वरून तूप लावून सर्व्ह करा.

**७)राजगिऱ्याचे उप्पीट :**



**साहित्य:** १वाटी राजगिरा पीठ ,२-३ हिरव्या मिरच्या,अर्धी वाटी कोथिंबीर, जिरे,डावभर तेल किंवा तूप,मीठ-साखर चवीनुसार,ओले,
किंवा सुके खोबरे,३ वाट्या गरम पाणी

**कृती :** राजगिऱ्याचे पीठ चाळून घ्या.कढईत डावभर किंवा थोडे जास्त तूप घाला.त्यात जिरे घाला.मीठ व साखर घालून उकळल्यावर त्यात राजगिऱ्याचे पीठ हळू हळू घालून ढवळा. पाणी कमी वाटल्यास पुन्हा थोडे गरम पाणी घालून ढवळा व झाकण टाकून आच मंद करा.एक सणसणीत वाफ आली की झाकण उघडून चांगले ढवळा व पुन्हा एक वाफ येऊ द्या.नंतर खाली काढून वरून खोबरे,कोंथिबीर शिवरून खाण्यास द्या.ह्या उप्पीटात भाजलेले दाणे घातले तर फारच छान लागते.

**-ओमनी फिचर्स**

## बिटाचा हलवा :

**साहित्य :** अर्धा किलो.बीट (साधारण ४),१वाटी चिरलेला गूळ,२वाट्या ओला नारळाचा कीस, ४ वेलदोडे व थोडे जायफळ यांची पुड, साजूक तूप ४ चमचे, दूध सायीसकट १ कप, काजूचे तुकडे, चिमूटभर मीठ.



**कृती :** बीटात थोडे पाणी घालून कुकरला शिजवून घ्यावेत.थंड झाल्यावर दोन्हीकडील खराब भाग काढून टाकावा.साल काढुन घ्यावे व किसणीवर किसावे.जाड बुडाच्या कढईत ४ टेबलस्पून तूप टाकावे. तूप तापल्यावर त्यात बिटाचा किस खमंग परतावा. आच मंद ठेवावी. ६ते८ मिनिटे परतल्यावर त्यात नारळाचा चव घालावा ओले नारळ किसणीवर किसुन किंवा मिक्सरला लावुन चव केला तरी चालेल. परत मध्यम आचेवर ५ मिनिटे परतावे. नंतर त्यात चिरलेला गुळ घालावा.गॅस बारीक करावा.चांगले हालवून झाकण घालावे.६ ते ८मिनिटांनी सायीसकट दुध घालून परत मिश्रण चांगले एकजीव करावे.परत झाकण घालावे. मिश्रण आळू दयावे. दूध घातल्यावर ५ मिनिटे शिजवावे .नंतर काजूचे तुकडे व वेलची - जायफळ पुड घालावी.२-३ मिनिटे होऊ द्यावे व गॅस बंद करावा.आल्या नारळाच्यामुळे खमंग लागतो. टीपः केल्यानंतर २-३ तास मुरु द्यावा,खाताना परत अर्धा कप दूध व दीड चमचा साजूक तूप घालून चांगले मिसळावे.

**- प्रिया पाटील**

## काकडीची भाजी :



**सहित्य :** पाव किलो काकडी ५-६ उकडलेले बटाटे,३-४ हिरव्या मिरच्या,१ वाटी कच्चे शेंगदाणा तेल ,१चमचा जिरे,कोंथिबीर ,१टे.स्पून तेल.

**कृती:** हिरव्या मिरच्या व जिरे वाटा.त्यातच कच्चे शेंगदाणे भिजत घालून त्यातील अर्धे शेंगदाणे वाटा.तेलावर अर्धा चमचा जिरे घालून त्यावर साले काढलेल्या काकडीच्या फोडी घाला.त्यात भिजवलेले उरलेले शेंगदाणे घाला. त्यात दोन वाट्या पाणी घालून झाकण ठेवून शिजवा.शेंगदाणे व काकडीच्या फोडी शिजल्यावर त्यात उकडलेल्या बटाट्याच्या फोडी,वाटण,मीठ,साखर घालून झाकण न ठेवता
उकळा.सर्व चांगले शिजल्यावर त्यात कोंथिबीर घाला.लिंबू पिळुन गॅस बंद करा.

## नाचणीचा उपमा :

**साहित्य :**१वाटी नाचणी,१टीस्पून मेथी,१टे.स्पून मोडाचे मूग,१ टे.स्पून गाजर -टोमॅटो प्रत्येकी,
२ बारीक चिरून मिरच्या, हिंग, मोहरी, आलं-लसूण पेस्ट, तेल, जीरे,हळद, कढीपत्ता, कोंथिबीर, लिंबूरस.

**कृती:** नाचणीला भिजवून मोड आणून वाफवावे.थोड्या तेलात मोहरी जिरे घालून फोडणी घालावी.यात मिरच्या,कढीपत्ता घालावा.आलं-लसूण पेस्ट घालावी.गाजर किसून,टोमॅटो चिरून,मुग,मेथ्या सर्व घालून पाच मिनीटे शिजवावे.२-३ वाफा आल्या की नाचणी घालावी.मीठ व लिंबूरस घालून ढवळून परत २ मिनिटे गॅसवर ठेवावे.
गरम गरम उपम्यावर कोथिंबीर व शेव घालून खायला द्यावे.

## मिश्र डाळीचे वडे :

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ,१वाटी हरभऱ्याची डाळ,१ वाटी उडदाची डाळ,अर्धा वाटी मसुराची डाळ,मीठ,२कांदे बारीक चिरून ,हळद,तळण्यासाठी तेल,हिंग.

**कृती :** सर्व डाळी एकत्र भिजत घालाव्यात.३/४ तासांनंतर बारीक वाटून घ्याव्यात.
नंतर त्यात मीठ,हिरव्या मिरच्यांचे तुकडे,हिंग हळद घालून चांगले कालवावे.
बारीक चिरलेला कांदा घालून,लहान-लहान वडे तळून काढावेत.
कांदा न खाणाऱ्यांनी कांद्याऐवजी कोबी घालावा किंवा कढीलिंब बारीक चिरून घालावा.



**-ओमनी फीचर्स**

## आंब्याचा शिरा:

**साहित्य :** १ वाटी जाड रवा,पाऊण वाटी साजुक तूप,१वाटी साखर,२वाटी हापूस आंब्याचा पल्प (फ्रेश किंवा कॅनमधला)
दीड वाटी गरम दूध,काजू भिजवलेले, साल काढलेले बदामाचे काप,बेदाणे.
**सजावट :** ड्राय फ्रुट्स थोडे मिक्स करायला आणि थोडे सजावटीसाठी ठेवावे.
आंब्याचा सिझन असेल तर आंब्याच्या फोडी.
**कृती :** अर्धी वाटी तुपावर रवा मंद आचेवर खमंग भाजून घ्या.
त्यात दीड वाटी गरम दूध घालून रवा छान फुलवून घ्यायचा.
फुललेल्या रव्यमध्ये एक वाटी साखर मिक्स करून रवा नीट हलवून घ्या.
साखर मिक्स झाल्यावर हापूस आब्यांचा रस घाला आणि मग उरलेलं तूप त्यात घालून रवा,आमरस सगळं नीट मिक्स करायचं. गॅस बारीक करून झाकण ठेवायचं.
दोन तीन मिनिटांनी वाफ आली की बेदाणे घालून मिक्स करा. शिरा तयार झाला.





## पांढरा ढोकळा:

**साहित्य :** तांदूळ -२ वाट्या,
उडदाची डाळ-१/२ वाटी (आवडीप्रमाणे)
पोहे -१वाटी (जाड,मध्यम,पातळ कोणतेही)
हरभरा डाळ-४ चमचे,
मेथी दाणे-१चमचा,
आलं,लसुण,हि.मिरची वाटणं-२चमचे भरून,
साखर,मीठ-चवीप्रमाणे,
ताटलीला लावायला थोडे तेल.
**कृती :** तांदूळ, डाळी,पोहे आणि मेथी दाणे सगळे एकत्रच पाण्यात भिजत घालावे. साधारण ८-१० तास भिजवावे . मग गंधगाळ वाटून घ्यावे.घट्ट झाकून चांगले फसफसेपर्यंत ठेवावे.जास्तीत जास्त बारा तासात फसफसते असा अनुभव आहे.
लसुण आलं मिरचीच वाटणं,साखर ,मीठ घालून पीठ चांगले हलवून घ्यावे.ताटलीला तेल लावून त्यात पिठ ओतावे.ताटली हलवूनच सारखे करावे आणि वाफवायला ठेवावे . साधारण १५ मिनिटात ढोकळा तयार होतो.कधी लवकरही होतो.वाफेचा रंग आणि वासावरून अंदाज करता येऊ शकतो.या कृतीने ढोकळा अगदी पांढरा आणि हलका होतो.
बाहेर काढल्यावर ५ मिनिटांनी सुरीने रेघा पाडून वरून मोहरी आणि हिंगाची फोडणी घालावी. हवी असल्यास बारीक चिरून कोंथिबीर घालावी.

**-ओमनी फीचर्स**